मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका


युगवाणी

ऑ–नो–डि -२०१७



अनुक्रमणिका

अभिनंदन




लक्ष्मीकांत देशमुख
९१व्या अ.भा. मराठी संमेलनाच्या
अध्यक्षपदी निवड



श्रीकांत देशमुख
साहित्य अकादमी
पुरस्कार २०१७



कल्पना दुधाळ
ललित ग्रंथ पुरस्कार
'धग असतेच आसपास' या
कवितासंग्रहासाठी
महाराष्ट्र फाऊंडेशन २०१७



अनिल अवचट
साहित्य जीवनगौरव
महाराष्ट्र फाऊंडेशन
पुरस्कार २०१७



अजित दळवी
नाट्य पुरस्कार
महाराष्ट्र फाऊंडेशन
पुरस्कार २०१७



गंगाप्रसाद अग्रवाल
समाजकार्य जीवनगौरव
महाराष्ट्र फाऊंडेशन
पुरस्कार २०१७



चेतना गाला-सिन्हा
असंघटित कष्टकरी या
विभागातील कामासाठी
महाराष्ट्र फाऊंडेशन
पुरस्कार २०१७



अरविंद गुप्ता
डॉ. नरेंद्र दाभोळकर
स्मृति पुरस्कार
महाराष्ट्र फाऊंडेशन २०१७



रुबिना पटेल
मुस्लिम महिलांच्या
प्रबोधनासाठी
महाराष्ट्र फाऊंडेशन २०१७



सई परांजपे
अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार
'सय' आत्मकथनात्मक पुरस्कार
महाराष्ट्र फाऊंडेशन २०१७



अरुण जाधव
सामाजिक प्रश्नांच्या
(दलित व भटके-विमुक्त)
संघर्षासाठी महाराष्ट्र
फाऊंडेशन २०१७


मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे
वाङ्‌मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७२ वे

ऑक्टोबर । नोव्हेंबर । डिसेंबर २०१७



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७२ वे

ऑक्टोबर । नोव्हेंबर । डिसेंबर २०१७

प्रकाशक
विलास मानेकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

अक्षरजुळवणी, मांडणी व मुद्रण
माधव लोखंडे
मलय ग्राफिक्स
सुभाषनगर, नागपूर
भ्रमण : ९३२६९९९०१५

या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये
वार्षिक वर्गणी : २०० रुपये
त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये
वि. सा. संघाच्या आजीव सभासदांसाठी वर्गणी : ३०० रुपये

पत्रव्यवहार
संपादक युगवाणी
विदर्भ साहित्य संघ
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७
ई-मेल : yugwani.nagpur@gmail.com



▫ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.


अनुक्रमणिका

अं त रं ग

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

ऑक्टोबर । नोव्हेंबर । डिसेंबर २०१७





| लेख

लक्ष्मीकांत देशमुख यांचे ललितगद्य व इतर लेखन

डॉ. अजय देशपांडे

लक्ष्मीकांत देशमुख यांनी विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन केले आहे; याशिवाय इंग्रजी भाषेतूनही त्यांनी काही लेखन केले आहे. 'नाते जपून ठेवा' आणि 'स्त्री सूक्त' ही त्यांची ललितगद्य लेखनाची दोन पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. त्यांच्या काही कथांवर चित्रपटनिर्मिती होणार आहे. विविध नियतकालिकांतून त्यांचे वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतील विपुल लेखन प्रकाशित झाले आहे. सातत्याने, निष्ठेने, गंभीरपणे दर्जेदार साहित्यनिर्मिती करणारे लेखक म्हणून लक्ष्मीकांत देशमुख यांचा लौकिक आहे. त्यांना नॅसकॉम सोशल ऑनर पुरस्कार (२०१०), मंथन (२०११), दक्षिण आशियाई पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा सर्वोकृष्ट कादंबरीचा पुरस्कार यांसह अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

चतुरस्र लेखक असणाऱ्या लक्ष्मीकांत देशमुख यांच्या ललितगद्य व इतर लेखनाची चिकित्सा करीत आशय व रूपबंधाची वैशिष्ट्ये अधोरेखित करणे हे या निबंधाचे एक उद्दिष्ट आहे. त्यामुळे ललितगद्य व इतर स्फुट लेखनाव्यतिरिक्त अन्य लेखनाचा विचार या निबंधात केलेला नाही.

'लक्षदीप : निवडक लक्ष्मीकांत देशमुख' संपादक : डॉ. रणधीर शिन्दे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे या ग्रंथात देशमुख यांचे प्रवासवर्णनपर लेख, आत्मपर लेख, प्रशासनपर लेख, ललित लेख, वैचारिक लेख, चित्रपट व नाटक यांचा आस्वाद घेणारे लेख आहेत; शिवाय 'मधुबाला ते गांधी' हे ललितगद्य लेखनाचे देशमुख यांचे पुस्तक आहे. तसेच 'अखेरची रात्र' आणि 'दूरदर्शन हाजीर हो' ही दोन नाटके आहेत. यापैकी प्रशासनपर लेखन वगळता इतर ललितगद्य, स्फुट व नाट्यलेखनाची चिकित्सा या निबंधात करावयाची आहे.

॥१॥

'लक्षदीप'मध्ये देशमुख यांचे 'देवबंदचं दारूल उलुम', 'काश्मीरियत : एक तत्त्वज्ञान, एक जीवनशैली', 'लिंग असमानतेची विविध रूपे अर्थात लिगंभेदावर आधारित भारताची सामाजिक फाळणी' हे तीन वैचारिक लेख आहेत.

'देवबंदचं दारूल उलुम' या लेखात उत्तर प्रदेशातील सहारणपूर जिल्ह्यातील 'देवबंद' या गावातील 'दारुल उलुम'चे वर्णन केले आहे. या ठिकाणाला प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर लिहिलेला हा लेख होय. 'दारुल उलुम' या शब्दाचा कोशागत अर्थ विश्वविद्यालय असा आहे. 'दारुल उलुम' हा पूर्व आशियातील सर्वांत मोठा मदरशा होय. तेथील व्यवस्था, व्यवस्थापन, धर्मशिक्षण, खानपानरीती, जीवनरीती, शिस्त व कार्यपालनपद्धती या साऱ्या बाबी विशद करताना पारंपरिक धार्मिक चाकोरीबद्ध विचार व जीवनशैलीबद्दल काही प्रश्नही लेखकाने उपस्थित केले आहे. दारुल उलुमचे सामर्थ्य तेथील निरंतर ज्ञानसाधना आहे. परंतु या

अनुक्रमणिका

ज्ञानसाधनेला आधुनिक मानवताकेंद्री विचारांची जोड देण्याची गरज आहे, अशा आशयाचे मतही लेखकाने मांडले आहे. गुणांचे वर्णन करताना वैगुण्याकडेही अंगुलिनिर्देश करण्याचा लेखकाचा निर्भीड बाणा या लेखात दिसतो. देशमुख लिहितात, ''... त्यातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न फतव्यासंबंधीचा होता. इमरानवर तिच्या सासऱ्यांनी बलात्कार केला, म्हणून तिचा नवरा, तिचा मुलगा झाला. त्यामुळे तिने सासऱ्यांशी निकाह करावा, हा फतवा मनात होताच. तसंच अलीकडे फोटोग्राफीवर बंदी घालणारा फतवाही देवबंदने काढलेला आहे. ऐंशीच्या दशकातील सिनेमाबंदीचा फतवाही गाजला होता. या संदर्भात माहिती घेतली तेव्हा कळलं- मुस्लिमांना धर्माचे व जगण्याचे प्रश्न पडतात, तेव्हा ते दारुल उलुमकडे जातात. ते धर्मशास्त्राप्रमाणे निवाडा देतात. त्यांनाच फतवा म्हटलं जातं. इथं कुर्‌आन-ए-शरीफचं शब्दप्रामाण्य आणि हदीसच्या परंपरांचा आधार घेतला जातो. पण तर्कप्रामाण्याचं (इज्तेहाद) प्रमाण धर्मसुसंगत असलं तरी त्यांची परंपरा क्षीण आहे. बदलत्या काळानुसार व आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या दुनियेत कालसुसंगत निवाडा करण्याचे अधिकार इज्तेहादच्या संकेतानं धर्मगुरूंना प्राप्त झाले आहेत. त्याचा आधार घेऊन देवबंदने तसलिमा नसरीनचा शिरच्छेद करण्याच्या फतव्याची निंदा केली आहे, हे उल्लेखनीय आहे. वेळोवेळी मुफ्ती आणि मौलवी-उलेमांनी काढलेल्या फतव्यांचं संकलन लेखनबद्ध करण्यासाठी एक वेगळा स्वतंत्र 'दारूल इफ्टा' नावाचा विभाग देवबंदला काढला आहे व सुमारे एक लाख फतव्यांचं संकलन झाल्याची माहिती त्यांच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे. तरीही काही फतव्यांमधली कट्टरता व तर्कशुद्धतेला दिलेली सोडचिठ्ठी अस्वस्थ करून जाते.'' (लक्षदीप, पृष्ठ ३९८,३९९) येथे देशमुख यांच्या वैचारिक लेखनातील तटस्थता, विचारांची सुस्पष्टता आणि विषयाच्या अगदी तळाशी जाऊन सूक्ष्म ताणेबाणे टिपण्याची वृत्ती या गुणांचा प्रत्यय येतो. देशमुख यांचे वैचारिक लेखन सामाजिक प्रश्नांच्या गुंतागुंतीचा शोध घेणारे आहे.

'काश्मीरियत : एक तत्त्वज्ञान, एक जीवनशैली' या लेखात 'काश्मीरियत' या संकल्पनेचा चिकित्सक वेध घेतला आहे. हा ललित लेख अभ्यासपूर्ण असा आहे. अनेक संदर्भ त्यात नमूद केले आहेत. देशमुख काश्मीरियत या संकल्पनेविषयी नोंद लिहितात, ''काश्मीरियत ही मूलतः काश्मीर लोकांची एतद्देशीय राष्ट्रवादी जाणीव, सामाईक स्वरूपाचं भान आणि सांस्कृतिक मूल्यांची प्रखर जाणीव असलेली सहअस्तित्वाची जीवनशैली आहे... तिची वैशिष्ट्ये धार्मिक व सांस्कृतिक सामंजस्य, आपल्या हिमालयाच्या डोंगराळ व निसर्गसुंदर प्रदेशावरची प्रखर देशभक्ती आणि अभिमानही आहेत.'' (लक्षदीप पृष्ठ ४०७, ४०८) साधारणपणे सोळाव्या शतकापासून विकसित होत आलेल्या काश्मीरियत या जीवनशैलीचा शोध घेत तिच्या आजच्या वास्तवाचे आकलन या लेखात मांडले आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्थित्यंतरांचा वेध घेत, काश्मीरी भाषा व वाङ्‌मयाच्या आधाराने लिहिलेला हा लेख जसा वाचनीय आहे तसाच तो संग्रहणीयदेखील आहे.

''लिंग असमानतेची विविध रूपे अर्थात लिंगभेदावर आधारित भारताची सामाजिक फाळणी'' हा लेख स्त्री-पुरुष असमानतेच्या गंभीर प्रश्नाची चिकित्सा करणारा आहे. स्त्री-पुरुष असमानतेच्या प्रश्नाची भारताच्या संदर्भातली ही चिकित्सा म्हणजे समकालीन भारतीय वास्तवाची चिकित्सा होय.

लक्ष्मीकांत देशमुख यांचे वैचारिक लेखन अनेक सामाजिक संदर्भांनी परिपूर्ण झाले आहे. हे लेखन वेगवेगळ्या विषयांना स्पर्श करणारे असले तरी त्यांच्या एकूणच वैचारिक लेखनामागे संविधानाच्या मूलभूत तत्त्वाशी बांधिलकी सांगणारा विचार आहे. समाजातील सर्व प्रश्नांचा शोध संविधानाने आखून दिलेल्या सामाजिक निकषांच्या कसोट्यांवरच घेतला पाहिजे, ही भूमिका देशमुख यांच्या वैचारिक लेखनाचे एक सामर्थ्य होय.

॥२॥

लक्ष्मीकांत देशमुख यांच्या ललितलेखनात अनेकदा आत्मपरता येते; पण आत्मप्रौढीचा दोष या लेखनात नाही. 'झपाटलेपण ते जाणतेपण' आणि 'परभणी व कोल्हापूरचे दिवस' हे दोन लेख यासंदर्भात लक्षणीय आहेत.

'झपाटलेपण ते जाणतेपण' या लेखात लेखक लक्ष्मीकांत देशमुख यांच्या जडणघडणीचा तपशील आला आहे. लेखकाच्या मुळाचा शोध या लेखात लागतो. लेखकाची जडणघडण, संस्कार, विचार, लेखन प्रक्रिया, बांधिलकी हे सारे या लेखात उलगडून दाखविले

आहे. लक्ष्मीकांत देशमुख का लिहितात? या प्रश्नाचे सविस्तर उत्तर येथे सापडते.

'परभणी-कोल्हापूरचे दिवस' या लेखात लेखकाच्या मनात रुजलेल्या या दोन्ही गावांची स्मृतिचित्रे रेखाटली आहेत. परभणी या गावी लेखकाची साहित्यिक कारकीर्द खऱ्या अर्थाने सुरू झाली. परभणीत लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रशासकीय व सांस्कृतिक दृष्टीने फुलून आले. परभणीची स्मृतिचित्रे सुंदर आहेत. तेथे केलेल्या प्रशासकीय व सांस्कृतिक कार्याचा तपशील वेधक आहे.

देशमुख यांचे आत्मपर लेखन प्रांजळ आहे, निखळ आहे, म्हणून ते मनाला भावणारे आहे.

॥३॥

लक्ष्मीकांत देशमुख यांनी भरपूर प्रवास केला आहे. त्यांचे 'मधुबाला ते गांधी' हे पुस्तक वाचताना अथवा वैचारिक लेखन वाचतानाही त्यांनी केलेल्या प्रवासाची प्रचिती येते.

मेघालयातील चेरापुंजी, श्रीलंकेतील पिनावाल एलिफंट ऑर्फनेज, अमेरिकेतील नायगारा या आणि अशा काही ठिकाणी भेट दिल्यानंतरचा सविस्तर वृत्तांत कथन करणारे काही लेख देशमुख यांनी लिहिलेले आहेत. या लेखांतील निसर्गाचे वर्णन करताना लेखक अक्षरशः भारावून जातो. पण निसर्गसौंदर्यात न्हाऊन घेत असतानाही एकेका स्थळाचा इतिहास, तेथील दंतकथा, माणसांचे कालचे आणि आजचे जगणे असे सारे काही प्रचंड उत्सुकतेने लेखक टिपत राहतो. एका स्थळाची दुसऱ्या स्थळाबरोबर कधी तुलना नकळत केली जाते. चेरापुंजी परिसरातील 'मॅक्समाई' या लेणीबद्दल लिहिताना अजिंठा-वेरूळचे स्वाभाविक स्मरण करीत लेखक म्हणतो, ''आपल्या मराठी माणसाच्या नजरेपुढे लेण्या म्हटलं की अजिंठा-वेरूळ येतं, तेथे प्रज्ञावंत कलावंतांनी डोंगर कोरून जे उत्तुंग शिल्प साकारलंय - विशेषतः कैलासलेणं व अजिंठ्याची रंगिला गुंफा त्याला तोड नाही. पण मॅक्समाई लेण्यांचं वैशिष्ट्य म्हणजे ती निसर्गनिर्मित आहे. हा निसर्ग किती महान कलावंत आहे, याचा साक्षात्कार इथं आम्हास झाला आणि मन भरून तृप्तावलो.'' (लक्षदीप, पृष्ठ २७३). निसर्गात रमणारा हा लेखक अमेरिकेतील स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा पाहूनही भारावून जातो. 'हे स्वतंत्रते भगवती' या लेखात स्टॅच्यू ऑफ लिबर्टीशी मुक्तसंवाद साधला आहे. काव्यात्म पातळीवरच्या या संवादात वास्तवदेखील मार्मिकपणे अधोरेखित केले आहे. ''वास्तविक स्वातंत्र्य, समता व बंधुभावाचा उद्घोष करणाऱ्या फ्रेंच जनतेची गुलामीची जुलमी प्रथा संपवणाऱ्या व नव्याने स्वतंत्र झालेल्या अमेरिकेला तुझा अप्रतिम पुतळा घडवून दिलेली अजोड व अनमोल भेट होती. त्यामुळेच तू जगाची स्वातत्र्यदेवता बनली होतीस. पण भारतात जशी कायद्यानं अस्पृश्यता व जातपात नाही, अद्याप गेली नाही, तशीच तुझ्या देशात, हे भगवते, निग्रोंची मानहानी व गुलामी श्वेत अमेरिकन्सच्या मनातून-विचारातून कुठे गेली होती? म्हणून माझ्या संवेदनक्षम अबोध मनात तुझी काजळलेली प्रतिमा घर करून राहिली असावी.'' (मधुबाला ते गांधी, पृष्ठ ३७,३८) वास्तवाचे, दुःखाचे, व्यथेचे, गुलामीचे, गरिबीचे कायम स्मरण आणि भान देशमुख यांच्या प्रवासवर्णनपर लेखनातही आढळते. निसर्ग, कलाकृती, व्यक्ती, साहित्य या बाबींच्या सहवासात आणि प्रभावाखाली असतानाही आपल्या भवतालाची-वास्तवाची प्रखर जाण लेखकाच्या मनात कायम असते; ती लेखनातून स्पष्टपणे व्यक्त होत राहते.

॥४॥

लक्ष्मीकांत देशमुख यांच्या ललितलेखनात अनेक व्यक्ती येतात. ही माणसे कधी त्यांच्या प्रत्यक्ष सहवासातली असतात, तर कधी चित्रपट, गीत, संगीत, कविता, कादंबरी, नाटक, कथा, चित्र, नृत्य, शिल्प यांचा उत्कट आस्वाद घेत असताना लेखक ती कलाकृती निर्माण करणाऱ्या कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचे काही ज्ञात-अज्ञात पैलू टिपतो, प्रत्यक्ष सहवासातली नाही पण कलाकृतींतून मनात घर करणारी ही माणसे आहेत. डॉ. गिरीश कर्नाड, गुरुदत्त, शैलेंद्र, साहिर, दुष्यंतकुमार, भाऊसाहेब पाटणकर, गदिमा, पाडगावकर, यांच्यापासून तर गांधी, सावरकर, यांच्यापर्यंत अनेक लेखक, कवी, संगीतकार, गीतकार, दिग्दर्शक, कलावंत आणि भाष्यकार, विचारवंत अशा अनेक माणसांविषयी अत्यंत आदराने, आत्मीयतेने आणि अगदी भरभरून लिहिले गेले आहे. व्यक्ती आणि त्यांच्या कलाकृतींविषयीचे हे लेखन आस्वादात्म पातळीवरचे असले तरी ते गंभीर आशय आणि जगण्याच्या सकारात्मक विचारांचे जागरण करणारे आहे. यासंदर्भात 'गिरीश कर्नाड : भारतीय रंगभूमीचा एक जायंट' हा लेख लक्षणीय आहे. गिरीश कर्नाड यांच्या नाटकांविषयीचे विश्लेषण करीत लेखकाने शेवटी

काही निरीक्षणे नोंदविली आहेत. समीक्षकाने अभ्यास करून सकस, गंभीर लिहावे तसा हा लेख आहे. ज्या विषयावर लिहायचे, त्याविषयीचे सखोल वाचन व चौफेर चिंतन देशमुख करतात. त्याचा प्रत्यय हा लेख वाचताना येतो.

॥५॥

'मधुबाला ते गांधी' या ललित लेखसंग्रहामध्ये एकूण पंचेचाळीस लेख आहेत. 'लोकसत्ता' या वृत्तपत्राच्या मराठवाडा वृत्तांत या पुरवणीतून हे लेखन प्रकाशित झाले आहे. विविध विषयांवर केलेले हे मुक्तचिंतन आहे. काही चित्रपट, काही प्रतिभावंत, काही कलाकृती, काही पुस्तके आणि काही सामाजिक विषय आदी अनेक बाबींविषयीचे हे लेखन आहे.

उत्कटता, रंजकता, काव्यात्मता आणि विविध विषयांची संदर्भबहुलता या लेखनात आढळते. या लेखांमध्ये विषयपरत्वे सामाजिक वास्तवाबाबतची चर्चा, चिकित्सादेखील केलेली आहे. 'हिरवळ आणिक पाणी' या लेखात देशमुख लिहितात, ''युद्ध, मूलतत्त्ववाद आणि व्यक्तिस्वातंत्र्यावरचा घाला यामुळं देशांतर करून निर्वासित झालेल्यांच्या समस्या व सुखदुःखाची जातकुळी आणखी वेगळीच आहे. त्याचं सर्वांत ठळक उदाहरण म्हणजे तिबेटचे बौद्ध धर्मगुरू दलाई लामा व त्यांचे हजारो नागरिक.'' (मधुबाला ते गांधी, पृष्ठ २१). धरणांमुळे विस्थापित होणाऱ्या माणसांच्या व्यथा लिहिताना स्थलांतरितांच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नाचे स्वरूप सहज पण अत्यंत गंभीरपणे विशद केले गेले आहे.

'तुझ्याच घामाचा बळी गेला' या लेख विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे दुःख व्यक्त करणारा आहे. 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात?' या विषयावर भाषण देऊन पहिला क्रमांक मिळवणाऱ्या अकोटच्या दीपाली कोल्हे या शेतकऱ्याच्या मुलीने आत्महत्या केल्याच्या घटनेपासून सुरू होणाऱ्या या लेखात शेतकरी आत्महत्यांचे समाजशास्त्र, अर्थशास्त्र माडणाऱ्या कविता, कादंबरी व चित्रपटांची चर्चा केली आहे. हा लेख समकालीन वास्तवाचे उदास, असहाय, भकास रूप दाखविणारा आहे.

समाजातील दुःख देशमुख यांना अस्वस्थ करीत राहते. त्यामुळे कळत नकळत सामाजिक प्रश्नांविषयीची चर्चा ते अनेकदा करीत राहतात.

'मधुबाला ते गांधी' या पुस्तकातील लेखन अनेकदा काव्यात्म पातळीला जरा स्पर्श करते. अर्थपूर्ण अशी सुंदर विधाने या पुस्तकात जागोजागी आढळतात. 'इतरांना जाणणं ही बुद्धिमत्ता आहे. पण स्वतःला ओळखणं हा शहाणपणा आहे.' (पृष्ठ १४). 'हिरवळ आणि पाणी हीच शाश्वत विकासाची दोन सूत्रे आहेत' (पृष्ठ २२), 'गंगेचा इतिहास म्हणजे भारताचा इतिहास. भारतीय संस्कृती व परंपरेची गौरवशाली वाटचाल. एकूण भारतीयत्वाची गंगा म्हणजे खूणगाठ; जणू आंतरिक जिव्हाळ्याची रेशीमगाठ!' (पृष्ठ २९) 'स्वतःचा शोध ही माणूसपणाची निरंतर प्रक्रिया आहे.' (पृष्ठ १४), 'स्त्री एकवेळ पतीसाठी वाईट, व्यभिचारी असेल, पण मुलासाठी ती अंतर्बाह्य माताच असते' (पृष्ठ ७४), 'माणसाचा ताण हा भौतिक बाबींपेक्षाही माणसाच्या वागणुकीशी अधिक निगडित असतो' (पृष्ठ १७८), 'माणूसपण जपणं हेच माझ्यासाठी जगण्याचं सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञान आहे.' (पृष्ठ १८२).

...एका सत्याचा आपल्याला कधी विसर पडता कामा नये. ते सत्य म्हणजे या जीवनसृष्टीचा मी म्हणजे एक लहानसा बिंदू आहे. एक ठिपका-अनंत यात्रेच्या वाटचालीत पुसला जातो व त्याची जागा नवा ठिपका घेतो' (पृष्ठ १९२). अशी सुंदर विधाने, कधी काव्यात्मता तर कधी विचार प्रकट करतात. त्यामुळे या लेखनाचे सौंदर्य आणि विचारशीलता वाढली आहे.

'मधुबाला ते गांधी' या पुस्तकातील साऱ्या लेखनातून माणूसपण जपण्याच्या तत्त्वज्ञानाचा विचार वेगवेगळ्या तऱ्हेने मांडला गेला आहे. देशमुख यांचे हे मुक्तचिंतन आहे; पण या मुक्तचिंतनातून लेखकाचे वाचन, आस्वादकता, वैचारिकता, गुणग्राहकता, कलाप्रेम, अभिरुची, जीवनविषयक दृष्टिकोन व्यक्त होत राहते. त्यातून देशमुख यांचे संस्कारी, संपन्न, विचारशील, सृजनशील व्यक्तिमत्त्व व्यक्त होत राहते. चित्रपट, साहित्य, विविध वास्तू, निसर्ग, संगीत या साऱ्यांचा मुक्तपणे पण अत्यंत सजगपणे घेतलेला उत्कट आस्वाद म्हणजे 'मधुबाला ते गांधी' हे पुस्तक होय. चित्रपट, संगीत, गीत, चित्र, नाट्य, शिल्प, कविता व साहित्य यांचे खूप संदर्भ या लेखनात आले आहे. संदर्भसमृद्ध असणारे हे लेखन आशयसौंदर्य असणारेदेखील आहे.

॥६॥

'दूरदर्शन हाजीर हो' आणि 'अखेरची रात्र' ही दोन नाटके देशमुख यांनी लिहिली आहेत.

अनुक्रमणिका

'दूरदर्शन हाजीर हो' हे बालनाट्य आहे. दूरदर्शनच्या आहारी गेलेल्या लहान मुलांच्या संदर्भात ज्या विविध समस्या निर्माण झाल्या आहेत, त्यांची चर्चा व सोडवणुकीचे उपाय अशा विषयावरचे हे नाटक आहे. दूरदर्शनने लहान मुलांच्या मनमेंदूवर राज्य करीत त्यांचे भावविश्वच बदलवून टाकले. पुढे मुले दूरदर्शनच्या एवढी आहारी गेली, की अगदी दूरदर्शनची गुलाम झाली, त्यांच्या मानसिक, बौद्धिक, शारीरिक पातळीवरच्या समस्या वाढत गेल्या. दूरदर्शन व्यक्तिमत्त्वाच्या घडणीसाठी की त्यांना बिघडवण्यासाठी, असा प्रश्न निर्माण झाला. मग दूरदर्शनच्या विरोधात राजाच्या पुढच्या न्यायालयात खटला भरण्यात येतो. या प्रश्नाची चर्चा होते. दूरदर्शनच्या संदर्भात शेवटी न्यायमूर्ती निकाल देतात. दृक्श्राव्य माध्यमांची उपयुक्तता महत्त्वाची आहे तशी अतिरेकी निरंकुशता मात्र अनिष्ट आहे. भारतासारख्या लोककल्याणकारी राज्यात अतिरेकी चंगळवाद खपवून घेतला जाणार नाही अशा आशयाची सूचना दूरदर्शनला देतानाच मुलांनी आणि पालकांनीही संस्कार, विचार अंगी बाळगून दूरदर्शनचे लाभ मिळवावेत असा निकाल दिला जातो. बालनाट्यातही एका सामाजिक प्रश्नाची चर्चा लेखकाने केली आहे.

'अखेरची रात्र' या दोन अंकी नाटकाचे कथानक गुरुदत्त या हिंदी चित्रपटसृष्टीतील नटाच्या शोकांतिकेवर आधारित आहे. गुरुदत्तच्या असफल प्रेमकहाणीतून कलावंताच्या आयुष्यातील वेदना अभिव्यक्त झाली आहे. मद्याच्या नशेत असणारा गुरू शेवटी कंपोजच्या गोळ्या खाऊन आत्महत्या करतो. कलावंताची प्रतिभाशक्ती आणि त्याची आंतरिक घुसमट या नाटकात प्रभावीरीत्या आविष्कृत झाली आहे. चित्रपट सृष्टीतील वातावरण, संबंध, कलावंतांच्या खासगी जीवनातले ताणेबाणे यांचे वास्तवदर्शी चित्रण या नाटकात आले आहे.

लक्ष्मीकांत देशमुख यांच्या एकूणच ललितगद्यलेखनाचा व इतर लेखनाचा संक्षिप्त आढावा घेतल्यानंतर काही वैशिष्ट्ये, काही निरीक्षणे हाती येतात. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या ललितगद्य व इतर लेखनाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) लक्ष्मीकांत देशमुख यांचे ललितगद्य हे स्वानुभवकथनाच्या, निवेदनाच्या पातळीवर जाणारे लेखन आहे. एखादी कलाकृती, एखादी व्यक्ती, एखादे स्थळ यासंदर्भातील स्वानुभव कथन करीत असताना लेखक त्या विषयाच्या अंतरंगात प्रवेश करतो. इतिहासाची चिकित्सा करतो, समकालीन वास्तवाशी असणारे अनुबंध शोधतो. असे करीत असताना आपला मूळ अनुभव शबलीत होऊ न देणे, हे या लेखकाचे सामर्थ्य आहे.

२) देशमुख यांनी कथा-कादंबऱ्यांतून मुस्लिम जीवनसंस्कृतीचा शोध घेतला आहे. त्यांच्या ललितगद्य व वैचारिक लेखनातूनही मुस्लिम जीवनशैलीबाबत काहीएक मौलिक चिंतन केले गेले आहे. मुस्लिम जीवनसंस्कृतीचे लेखक अभ्यासक आणि भाष्यकार आहेत. भारतीय मुस्लिम जीवनशैलीपासून अफगाणमधील मुस्लिम जीवनशैलीपर्यंतचा मोठा परीघ त्यांच्या लेखनाला आहे. वस्तुनिष्ठता, सहिष्णुतादृष्टी, जिज्ञासा, तटस्थता, खोट्या संस्कृतीभिमानाची चौकट तोडून माणुसकीच्या पातळीवरचा विचार ही या लेखनाची काही वैशिष्ट्ये आहेत. मुस्लिम साहित्याचे वाचन आणि त्या धर्माचा निःपक्षपातीपणे केलेला अभ्यास या लेखनाचा एक आधार आहे तर प्रत्यक्षानुभव हे या लेखनाचे सामर्थ्य होय.

३) देशमुख यांनी बराच प्रवास केला आहे. त्यांचे प्रवासवर्णनपर लेखन स्वानुभवकथन करणारे आहेच; पण केवळ स्वानुभवात रमणारे नाही. स्वानुभवकथनाला इतिहासाच्या अध्ययनाची आणि वास्तवाच्या आकलनाची साथसंगत आहे. त्यामुळे त्यांचे प्रवासवर्णनपर लेखन वाचनीय झाले आहे.

४) लक्ष्मीकांत देशमुख हे आजचे वास्तव टिपणारे लेखक आहेत. तळपातळीवरच्या सामान्य माणसांच्या व्यथेशी देशमुख यांच्या लेखनाचे नाते आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील मध्यमवर्गीयांसह तळपातळीवरच्या माणसांची भावनिक, मानसिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्व पातळ्यांवर जी कुतरओढ झाली, जी फरफट झाली, अकारण कोंडी झाली आणि विनाकारण कुचंबणा, मुस्कटदाबी झाली, त्यांचा समूळ शोध घेण्याचा प्रयत्न करीत देशमुख उद्याच्या सुंदर दिवसांसाठी संविधानाच्या विचारव्यूहातील आशावाद व्यक्त करतात.

५) सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पर्यावरणाविषयी काहीएक भाष्य करीत असताना या देशातील लोकशाही व्यवस्था, संविधान, समता-बंधुता-न्याय या प्रकाशत्रयीचा विचार आदी बाबींचे एक

अनुक्रमणिका

विचारसूत्र देशमुख यांच्या लेखनात कायम असते, या विचारसूत्रापासून हे लेखन तसूभरही दूर ढळत नाही. अगदी आस्वादात्मक लेखातही हे विचारसूत्र बरेचदा कायम राहाते.

६) देशमुख यांच्या लेखनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे थीमबेस्ड कथात्मता हे होय. कथात्म लेखनाच्या त्यांच्या या वैशिष्ट्याला त्यांचे वैचारिक व ललितगद्यलेखनही अपवाद नाही. 'स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय नोकरशाही, पांढरा हत्ती की वेगवान अश्व?', स्वातंत्र्योत्तर भारतीय प्रशासनाची साठ वर्षे सिक्स थिंकिंग हॅटच्या तंत्राद्वारे', 'काश्मीरीयत : एक तत्त्वज्ञान, एक जीवनशैली,' 'लिंग असमानतेची विविध रूपे अर्थात लिंगभेदावर आधारित भारताची सामाजिक फाळणी' या आणि अशा काही लेखांमध्येही थीमबेस्ड कथात्मता आढळते.

७) देशमुख यांच्या आत्मपर लेखनाचे एक वैशिष्ट्य असे की भूतकाळातील स्मरणचित्रे रेखाटताना निखळ प्रांजळपणा तर आढळतोच; पण आपण ज्या समाजात राहतो, त्या समाजाचेही पर्यायाने आपल्या भवतालीचेही स्मरणचित्र ते रेखाटतात. माणूस आणि त्याचा भवताल असे अतूट बंध त्यांच्या आत्मपर लेखनात आढळतात.

प्रशासकीय अधिकारी म्हणून केलेल्या कार्याविषयी लिहिताना या आत्मपर लेखनास आत्मप्रौढीची किंचितही बाधा होत नाही. या आत्मपर लेखनातून देशमुख यांच्या साहित्यनिर्मितिप्रक्रियेचे बंध-अनुबंध उकलत जातात आणि त्यांच्या एकूणच जीवनधारणेची-विचारसरणीची ओळख होत जाते.

८) बरेचदा देशमुख यांचे ललितगद्यलेखन रिपोर्टाजच्या जवळ जाते. सामाजिक वास्तवाचे चित्रण करीत असताना बरेचदा वृत्तांकनाची काहीशी शैलीही स्वीकारली गेली आहे. यामुळे हे लेखन रूक्ष अथवा नीरस मात्र झालेले नाही. रिपोर्टाजच्या शैलीचा किंचितसा अवलंब करताना मूळ विषयातील लालित्य हरवू न देणे उलट प्रसंगी काव्यात्मतेने अथवा वेगवेगळ्या कवींच्या कवितांतील ओळींच्या उपयोजनाने लेखन रोचक आणि आशयाच्या अनेक पापुद्र्यांनी परिपूर्ण करणे, हे या गद्यलेखनाचे वैशिष्ट्य आहे.


९) मराठी भाषेतील लेखनात हिंदी, उर्दू, इंग्रजी साहित्यातील अवतरणे, कवितेच्या ओळी विषयपरत्वे पेरणे आणि आशयसमृद्धी वाढविणे हे देशमुख यांच्या ललितगद्यलेखनाचे एक वैशिष्ट्य होय. केवळ अवतरणे, कवितेच्या ओळी एवढेच नाही तर विविध क्षेत्रांतील महनीय, दिग्गज व्यक्तींच्या आयुष्यातील प्रसंग, त्यांच्या कलाविष्कारांतील अनेक लहानमोठ्या बाबी, कलाविष्कारांची सूक्ष्म वैशिष्ट्ये या अशा अनेक घटकांनी देशमुख यांचे लेखन संदर्भप्रचुर झाले आहे; पण त्यामुळे या लेखनाच्या आशयाची श्रीमंती वाढलेलीच आहे आणि लालित्य जराही ढळलेले नाही. मूळ विषयसूत्र सुटू न देता; उलट त्यास पूरक असे अनेक संदर्भ देत लेख अधिक रंजक व खुमासदार करण्याचे कसब देशमुख यांच्याजवळ निश्चितच आहे. 'मधुबाला ते गांधी' या ललतिगद्यसंग्रहातील अनेक लेख यासंदर्भात लक्षणीय आहेत.

१०) देशमुख यांचे बालनाट्य समकालीन प्रश्नांचा वेध घेणारे आहे तर 'अखेरची रात्र' हे नाटक कलावंताच्या नाटकांचे नाते समाजवास्तवाशी आहे. समाजवास्तवाचे निरंतर भान हे देशमुख यांच्या एकूणच लेखनाचे वैशिष्ट्य त्यांच्या नाट्यलेखनातही आढळते.

लक्ष्मीकांत देशमुख यांची लेखनाची एकूणच भूमिका समाजव्यवस्थेच्या निरीक्षकाची आहे. हा समाज आहे त्यापेक्षा अधिक चांगल्या अवस्थेत असावा. संविधानाच्या संदर्भचौकटीला स्वीकारणारी, विज्ञान आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या प्रकाशमूल्यांचे जतन-संवर्धन करीत ती अंगीकारणारी असावा हा हेतू या लेखनामागे कायम दिसतो. समाजाचा अवकाश एकजिनसी असणार नाही, तसे वास्तवही एकजिनसी असणार नाही, त्यामुळे सामाजिक आकलनाचे अनेक स्तर आणि पापुद्रे असणार आहेत हे आकलन मांडत असताना इतिहास व वर्तमानाचे वस्तुनिष्ठ भान लेखकाजवळ असले पाहिजे. लक्ष्मीकांत देशमुख यांच्याजवळ हे भान आहे म्हणून त्यांचे लेखन वास्तवदर्शी असूनही अतिरंजक झालेले नाही. समकालाविषयी आणि येणाऱ्या काळाविषयीचा अत्यंत निकोप, सकारात्म आदर्शवादी आणि संविधानपूरक असा आशावादी दृष्टिकोन देशमुख यांच्या लेखनातून सतत व्यक्त होत राहतो. हा आशावादी दृष्टिकोन लक्ष्मीकांत देशमुख यांचे लेखनाचे सामर्थ्यही आहे आणि सौंदर्यदेखील आहे.

• • •

अनुक्रमणिका



। लेख

आसाराम लोमटे यांची कथासृष्टी

गजानन मालोकार

कहाणी हा प्रकार मानवी संस्कृतीएवढाच पुरातन आहे. मनोरंजन व अभिव्यक्तीच्या पहिल्या कलाविष्कारांपैकी एक. संस्कृतीच्या बाल्यावस्थेतील मौखिक व नंतर लिखित कहाण्या ह्या बर्हिमुख होत्या. लक्षवेधी कथानक व रोमांचक घटनाक्रम याभोवती गुंफलेल्या. रंजकतेवर भर देणाऱ्या व एखाद्या 'लार्जर दॅन लाईफ' नामकाच्या पराक्रमाचे व सद्‌गुणाचे गौरवीकरण करून कुठलेतरी नैतिक प्रबोधन करणाऱ्या. परंतु प्राचीन कहाणी वा गोष्ट व आधुनिक लघुकथा यामध्ये मूलभूत फरक आहेत. कथा वा वाङ्मयप्रकाराचा प्रवास हा हळूहळू बहिर्मुखतेमधून अंतर्मुखतेकडे होत गेलेला दिसतो. आधुनिक लघुकथा ही प्राचीन कहाणीशी फारसं नातं सांगत नाही. माणसाच्या बाह्य कार्यकर्तृत्वाचा पट मांडण्याऐवजी ती त्याच्या अंतर्मनाचे अनवट पापुद्रे सोलताना दिसते. आधुनिक लघुकथा, आपल्या मर्यादित चौकटीमध्ये, माणसाच्या संपूर्ण जीवनाचा आलेख मांडत नाही. तर ती एखाद्या विवक्षित परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर माणसाच्या जगण्याचा एखादा तुकडा वा प्रसंग सादर करते. हे करत असताना ती माणसाच्या आत्म्याचा, त्याच्या भावजीवनाचा उभा-आडवा छेद काढताना दिसते.

कथासंग्रहासाठी २०१६ चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त, परभणी येथील दैनिक 'लोकसत्ता'चे वार्ताहर आसाराम लोमटे यांचे आतापर्यंत दोनच कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. पहिला 'इडा पीडा टळो' व दुसरा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त 'आलोक' दोन्हीमध्ये प्रत्येकी सहा - सहा दीर्घकथा आहेत. 'इडा पीडा टळो'च्या पहिल्या दोन आवृत्त्या देशमुख आणि कंपनीने काढलेल्या आहेत. तर तिसरी २०१० साली 'शब्द' प्रकाशनाने काढली आहे. आलोकच्या दोन्ही आवृत्त्या शब्द प्रकाशनाने काढल्या आहेत. 'इडा पीडा टळो'मधील कथा १९९६ ते २००४ पर्यंत पूर्वप्रसिद्ध झालेल्या आहेत. तर 'आलोक' मधील कथा २००७ ते २००९ या कालावधीत पूर्वप्रकाशित झालेल्या आहेत. एकंदरीत मागील दोन दशकांतील बदलत्या ग्रामीण जीवनाचा आलेख या कथांमधून शोधता येतो, जाणता येतो. सगळ्याच कथा बऱ्यापैकी दीर्घ आहेत.

'इडा पीडा टळो' मधील पहिली कथा 'बेइमान.' कथानायक ओ.बी.सी. आरक्षणामुळे सरपंच झालेला, सरळमार्गी शेतकरी भगीरथ. आधीच्या दोन मुली, पत्नी परत गर्भारशी. चार महिने होऊन गेलेले. ज्या नेत्याने राजकारणात आणले त्याचाच आग्रह गर्भपात करून घ्यावा नाहीतर सरपंचपद जाईल. महागडी सरकी पेरून पावसाअभावी पेरणं उलटलेलं. त्यात कर्ज झाल्याने भगीरथ आधीच अस्वस्थ. गर्भपातासाठी परत कर्ज काढावे लागणार, पत्नीचा ठाम नकार. त्याचसोबत मुलाची आससुद्धा. भगीरथची मानसिक घुसमट अशा वेगवेगळ्या कारणांनी तीव्र होत राहते.

लोमटेंच्या कथा एकपदरी, सरळ एका धाग्यात गुंफलेल्या नाहीत. एका घटनेचे अनेक पदर उलगडत राहतात. शेवटी सरपंचपदाचा मानमराबत प्रभावी ठरतो. पत्नीला सोनोग्राफी करायची, मुलगा असेल तर ठेवायचा, असे सांगून, सोनोग्राफी न करता गर्भपात करवून घेतो. पत्नीचा त्रास पाहून व काढलेला गर्भ मुलाचा होता हे समजल्यानंतर पुरताच ढासळतो व त्याला डोळे पुसणे म्हणजेसुद्धा बेइमानी वाटू लागते. गावखेड्यामधील लोकांमध्ये वाढत असलेली जबरदस्त राजकीय महत्त्वाकांक्षा अधोरेखित करणारी कथा.

दुसरी कथा 'जिनगानीचा जाळ.', कथानायक मच्छिंद्र. भडकाऊ भाषण देणाऱ्या कामगार नेत्याने मुंबईला मोर्च्यात नेलेल्या व गोळीबारात हकनाक मारल्या गेलेल्या प्रयागबाई. या कामगाराचा कॉलेजमध्ये शिकत असलेला मुलगा. कथेचा दुसरा पदर, मच्छिंद्रची नवऱ्याने टाकून दिलेली बहीण देवकी. पोरक्या झालेल्या मच्छिंद्र व देवकीची उपासमार व परवड तसेच कामगार नेत्याने केलेले प्रयागबाईच्या मृत्यूचे गलिच्छ, स्वार्थी भांडवल या दोन बिंदूंभोवती कथा फिरत राहते. 'निचरा' कथेचा नायक तात्यासाहेब देशपांडे, माजी मंत्री सत्ता, वैभव असेपर्यंत मग्रुरी व निष्ठुरपणासाठी प्रसिद्ध. परंतु आता पोटच्या मुलाने केलेल्या अपमानाने हतबल झालेला, हट्टाने मळ्यात एकटा राहणारा. अगतिक, विकल म्हातारा, शेवटी ज्या सज्जन कार्यकर्त्याने त्यांचा पराभव केला, त्याच्याचकडे मनातील सगळ्या घुसमटीचा निचरा करतो. शेक्सपिअरच्या 'राजा लिअर'ची आठवण करून देणारी कथा.

'चरक'चा नायक नागनाथ. उसाची शेती करणारा शेतकरी. ऊस वाळून चाललेला पण कारखाना ऊस तोडून नेत नाही. प्रशासक आमदाराच्या दबावाखाली ठेकेदारांची बिले काढतो; पण कामगारांचे पगार करीत नाही. संप होते, कारखाना बंद पडतो. काळजीने खंगून आधीच अर्धांगवायू झालेला नागनाथ कारखाना बंद पडण्याच्या धक्क्याने दवाखान्याच्या वाटेवरच प्राण सोडतो. साखर कारखाना, त्यावरील प्रशासक, आमदाराचा स्वार्थी हस्तक्षेप, कामगारांचा आडमुठेपणा या सर्वांचा उभा-आडवा भेदक छेद घेणारी कथा.

'इडा पीडा टळो' या शीर्षक कथेची नायिका सीताबाई. शेतकरी संघटनेची सक्रिय कार्यकर्ती. दिवाळीचे दिवस, भाऊ विभिषण माहेरी न्यायला आलेला: वडील अस्वस्थ. परंतु सीताबाई माहेरी न जाता आजूबाजूच्या गावात फिरून शेतकरी संघटनेचे रास्ता रोको आंदोलन यशस्वी करण्यासाठी झटते. लाठीमार होते. आंदोलकांना भाऊबीजेची रात्र जेलमध्ये काढावी लागते. कथेचा शेवट मात्र गोड. सरकार भाववाढीची मागणी मान्य करते व सर्वांची जेलमधून सुटका होते.

शेवटची कथा 'होरपळ' दलित विरुद्ध सवर्ण संघर्ष हाताळणारी. सरपंचपदाची निवडणूक हरलेला माजी सरपंच, नानासाहेब मालधुरे दलित समाजातील हारीला हाताशी धरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा वेशीवर बसण्याचे राजकारण करतो. गाव जाती संघर्षात दुभंगते. सवर्णांच्या अघोषित बहिष्कारामुळे हारी व त्याच्या समाजाची होणारी होरपळ हे कथेचे मुख्य सूत्र. कथन अत्यंत संयत व त्रयस्थ. कुठेही आक्रस्ताळेपणा नाही व कुठलाही राजकीय अभिनिवेश नाही.

'इडा पीडा टळो'मधील सर्वच सहा कथांचे निवेदन तृतीयपुरुषी आहे. सर्वव्यापी, सर्वसाक्षी लेखकाला त्याच्या अनुभवातील ग्रामीण सृष्टी निर्माण करताना त्रयस्थ, अलिप्त-दृष्टिकोन सोयीचा होत असेल, परंतु कथानायकाच्या अंतर्मनातील ढवळाढवळीचा, घुसमटीचा वेध घेताना हेच निवेदन बऱ्यापैकी प्रथमपुरुषी रूप घेते. विशिष्ट परिस्थितीच्या कचाट्यात सापडलेली पात्रं, स्वत:विषयी कुठलाही आडपडदा न ठेवता बोलत राहतात. स्वत:चं अंतर्मन सगळ्या भावभावनांसह उघड करत राहतात. सगळ्या सहा कथांमधील समान सूत्र म्हणजे राजकारणाची पार्श्वभूमी. मग ते राजकारण शेतकरी संघटनेचं असेल, कामगार नेत्याचं असेल, गावपातळीवरील सरपंचपदाचं असेल, साखर कारखान्याचे असेल किंवा सवर्ण विरुद्ध दलित संघर्षाचे असेल. परंतु या राजकीय कथा नाहीत. राजकारणाच्या कचाट्यात सापडलेल्या माणसांच्या दु:खभोगाच्या, व्यथावेदनांच्या कथा आहेत. महाराष्ट्रातील आताच्या राजकारणाचे अध:पतनच त्यातून प्रकर्षाने जाणवत राहते.

'आलोक'मधील कथा, अधिक अंतर्मुख व व्यामिश्र होत गेलेल्या दिसतात. कथानक मात्र अधिकच आक्रसलेले दिसते. तसाही लोमटेंच्या कथांमध्ये कथानकाचा फार पसारा नसतो. पहिली कथा 'चिरेबंद.' वडिलांसोबत दूरच्या शहरात कॉलेजमध्ये शिकत असलेला नातू, खेड्यातील पिढीजात, चिरेबंदी वाड्यात

एकट्या राहात असलेल्या आजीकडे काही दिवसांसाठी राहायला येतो. आजोबा हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यात हुतात्मा झालेले. मुक्तिसंग्राम दिनाला शासनाने हुतात्म्यांच्या विधवा पत्नींचा विशेष गौरव करावयाचे ठरविले म्हणून आजीला जिल्ह्याच्या ठिकाणी सोबत करायला आलेला. निवेदन प्रथमपुरुषी. छोट्या छोट्या फ्लॅशबॅकमधून कथानक उलगडत राहते व चिरेबंद वाड्याचा भयाण, भकास पाया उघडा पडत राहतो. आजोबा खरंतर हुतात्मा नाहीतच. आजोबांची सावकारी. व्याजात व हिशेबात पक्के. गोरगरिबांच्या जमिनी लुबाडलेल्या. त्यामुळे कथानायकाचे वडील लहान असतानाच रामोशांनी खून केलेला. कथेचा मुख्य भर पतीच्या पश्चात मोठ्या हिमतीने संसार सावरलेल्या आजीचे एकाकीपण व कथानायकाचे गावकुसापासून, मूळ जमिनीपासूनचे तुटलेपण यावर.

"इथं आल्यापासून आपल्या मनात एक परकेपणाची भावना आहे, ती काही जाता जात नाही. गेल्या दोन दिवसांत जे काही ऐकतोय त्यानं तर या मातीत आपली मुळं रुजतील असं वाटत नाही. झाडापासून तुटलेल्या पानानं गरगरत येऊन कोसळल्यासारखं मला होत होतं." "आता एवढा पिढीजात वारशाचा वाडा सोडतोय तरीही काहीच कसं वाटेना? आपल्यातली ओलच आटलीय की या वाड्याचे चिरेबंद आपल्याला पाझरू देत नाहीत?"



दुसरी कथा 'ओझं'. निवेदन परत प्रथमपुरुषी. कथानायक आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचा शहरात स्थायिक झालेला प्राध्यापक भाऊ. कथानक भावाच्या आठवणींशी गुंफलेले. त्याच्या शाळेत शिकत असलेल्या मुलीची व विधवा वहिनीची चिंता. बायकोचे स्वार्थी व्यवहारी धोरण. परंतु विधवा वहिनीच त्याला आपल्या हिमतीने धीर देते व भावाने टाकलेले ओझे त्याला थोडे सुसह्य होते. 'ओझं' कथेमध्ये दोन भावांमधील तरल भावबंध अतिशय संवेदनशीलतेने मांडलेला आहे. रोमँटिक कालखंडातील ललित निबंधकार चार्ल्स लॅम्ब एका आत्मकथात्मक ललित बंधामध्ये आपल्या अकाली मरण पावलेल्या भावाविषयी असेच भरभरून बोलताना दिसतो. शेतकरी आत्महत्या या शेतकऱ्यांच्या मुख्य समस्येच्या मुळाशी जाणारी कथा. कथेमध्ये कुठंही भडक वा सवंग भाष्य नाही. सगळा विषय अतिशय संवेदनशीलतेने हाताळलेला आहे. निवेदनाचा सहज साधेपणा वाचकाच्या मनाच्या तळाशी पोहचतो व कथेचं ओझं कायमचं मनावर ठेवून जाते.

'कुभांड'मध्ये ॲक्ट्रॉसिटीच्या कायद्यामुळे निर्माण होणारे ताणतणाव व संबंधितांची परवड. मळ्यामधील मोसंब्या चोरल्या म्हणून श्रीधरराव माली पाटील गवळणबाईच्या पोराला मारतात. गावातील राजकीय विरोधक गवळणबाईला हाताशी धरून पाटलावर ॲक्ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करतात. गवळणबाई अंगणवाडी सहायिका. माली पाटील गावातील पोरांना हाताशी धरून तिच्यावर तांदूळ चोरीचा आरोप लावतात. या सगळ्या राजकीय सांडबाजीत गवळणबाईच्या कुटुंबाची झालेली वाताहत. 'जीत' ही राजकीय डावप्रतिडावावर आधारित निवडणूक कथा. गावातील ग्रामपंचायतीची निवडणूक पंचायत समिती सभापती यासाठी अतिशय प्रतिष्ठेची. ग्रामपंचायत विरोधी पक्षाच्या सरपंचाच्या ताब्यात. अचानक त्यांचा एक सभासद हरी भोसलेचं अकाली निधन. त्यामुळे रिक्त झालेलं पद. ती जागा जिंकली तर सरपंचाचं सरपंचपद जाणार. सरपंच धूर्तपणे स्वच्छ चारित्र्याचा, वारकरी असलेल्या पंढरीला उभा करतो. सभापती त्याला शह देत, मरण पावलेल्या हरी भोसल्याची बायको कौसाबाईला उभं करतो. कथा एका बाजूने राजकीय मल्लांचे शह काटशह तर दुसऱ्या बाजूने सरळमार्गी पण आता निवडणुकीतील प्यादी बनलेल्या उमेदवारांची कुचंबणा व घुसमट या अंगाने फुलत राहते.

शेवटची कथा 'वळण' धनगरवाडीत राहणाऱ्या व शिक्षणाची प्रचंड आस असणाऱ्या प्रयाग काळे या शाळकरी मुलीची कथा. बापाचीही पोरीनं शेळ्या मेंढ्याच्या मागे न जाता, खूप शिकावं ही इच्छा. प्रयाग रानातून शाळेत येताना कुणाचा तरी खून होताना पाहते. शिक्षकाच्या सल्ल्यानुसार पोलिसांना जबाब देते. दोन्हीकडून दबाव येऊ लागतो. एक पक्ष साक्षीवर ठाम राहायला सांगतो तर दुसरा साक्ष फिरवायला. शाळाही दबावाखाली प्रयागला टी.सी. देऊन मोकळी होते.

प्रयागचे शिक्षण थांबते. परंतु गुरुजी जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्याचा पत्ता देऊन जिल्हाधिकाऱ्याला भेटायला सांगतात. जिल्हाधिकारी प्रसंगाचे गांभीर्य ओळखून संवेदनशीलपणे प्रश्न सोडवतात. प्रयागला जिल्ह्याच्या शाळेत प्रवेश देऊन तेथील शासकीय वसतिगृहात तिची राहण्याची सोय करतात. शेवटची ही कथा सकारात्मक शेवटामुळे विशेष लक्षात राहते.

लोमटेंच्या कथांमध्ये घटनाप्रधान कथानकाला फारसे महत्त्व नाही, आश्चर्यकारक शेवट नाही की धक्कादायक प्रसंग नाहीत. ह्या सगळ्या कथा जगण्याच्याच संथ गतीने पुढे जात राहतात. प्रत्येक कथेला कुणीतरी मध्यवर्ती कथानायक आहे. क्वचितप्रसंगी कथानायिकासुद्धा. परंतु ह्या कथा व्यक्तिकेंद्रीपेक्षा अधिक कुटुंबकेंद्री व गावकेंद्री आहेत. माणसाचे त्याच्या जवळच्या माणसाशी असलेले भावनिक नाते, रागलोभ, हर्षखेद याचा विस्तृत पट मांडताना कुटुंबासह अख्खं गाव या कथा जिवंत करतात. यामध्ये कुणी परंपरागत नायक नाहीत की खलनायक नाहीत. आहेत ती परिस्थितीच्या रेट्याने खंगलेली, पिचलेली माणसं. जगण्याची धडपड करणारी, पडझड, पराभूत झालेली. परंतु जगण्याची जिद्द असणारी व परत उभे राहू पाहणारी. दुर्दैवाने या जिद्दीला बळ देणारी आर्थिक, राजकीय, प्रशासकीय व्यवस्था एखादा क्वचित अपवाद वगळता फारशी दिसत नाही. निर्लज्ज निगरगट्ट राजकारण, असंवेदनशील निष्ठुर प्रशासन, स्वार्थी कामगार-शेतकरी नेते यांचे दर्शन मात्र जागोजागी होत राहते. असे असले तरी माणुसकीचे झरे आटलेले नाहीत. स्वत:चा ओढग्रस्तीला आलेला संसार सावरत समोरच्याला जमेल तशी मदत करणारे शेजारी आहेत. मन मोकळं करता येतील असे मित्र आहेत. मराठवाड्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे, कामगारांचे, स्त्रियांचे जिते जागते नांदते जग आसाराम लोमटे यांच्या या कथांमधून रसरशीतपणे जिवंत होते.



लेखक म्हणून लोमटे यांची ताकद दिसते ती त्यांनी निर्माण केलेल्या पात्रांच्या अंतर्मनात डोकावण्याची त्यांची जबरदस्त अंतर्दृष्टी. लोमटे त्यांच्या नायकाचे सगळे अंतरंग सशक्तपणे वाचकांसमोर उघड करतात. Stream of consciousness तंत्राचा सहज सढळ वापर केलेला. निवेदन हे प्रथमपुरुषी असो की तृतीयपुरुषी मुख्य भर हा पात्रांची विचारमालिका ठसठशीतपणे मांडण्यावर दिलेला. 'चरक'मधला नागनाथ शेतात ऊस वाळून चालला म्हणून त्रस्त झालेला. साखर कारखान्याचे राजकारण कारखाना बंद पडू देण्याकडे झुकलेले. शेतातील उभ्या उसाचा विचार मनात आला की नागनाथ गर्भगळीत होतो.

''आपुन आपल्याच अशात हलके वाटलोत. कव्हाकव्हा आंग निस्त मुरमुऱ्याच्या पोत्यासारखं पोकळ वाटायला लागतं. अंगाला आतून कीड लागल्यागत झालंय.आधी आपलं काळीज घट होतं, पण अशात कोणाचं काही वाईट आयकिलं की मनाला हादरा बसतो. काही केल्या पांगलेले मन थाऱ्यावर येत नाही. आज असं चार माणसात येऊन बसलं की जरा बरं वाटते. पण पुन्हा उसावर गप्पा आल्या की मन भिकाऱ्यावानी अंग चोरून सगळं ऐकतं. मस्तकाला तिडीक लागते. अन्न - पाण्यावर वासना राहत नाही. निस्त पोट फुटोस्तोर पानीच ढोसावा वाटतं. तरी घसा कोरडाच.''

लोमटेंच्या आकर्षक निवेदन शैलीचे मर्म त्यांच्या संयत तटस्थतेत भरलं आहे. लोमटेंनी निर्माण केलेलं जग हे बऱ्यापैकी वेदनांनी, यातनांनी भरलेलं आहे. पेरलं तर ते उगवलं का ? उगवलं तर ते टिकेल का ? टिकलं तर बाजारापर्यंत पोहचेल का ? व पोहोचलं तर योग्य भाव भेटेल का? या कायम विवंचनेत असलेले शेतकरी, कर्जाचे डोक्यावर डोंगर. जवळच्यांच्या साध्या इच्छा पूर्ण करता येत नाहीत यातून आलेलं भकासपण. प्रत्येकाच्या दु:खाची 'कहाणी' आणि 'प्रत' वेगळी. प्रख्यात रशियन कादंबरीकार टॉलस्टॉय आपल्या 'ॲना कॅरेनीना' या कादंबरीच्या सुरुवातीलाच म्हणतो, "All happy families are alike, each unhappy family is unhappy in its own way" लोमटेंच्या पात्रांचे दु:ख मुख्यत: त्यांच्या शेतकरी, शेतमजूर वा कामगार

असण्यातून येत असलं तरी प्रत्येकाच्या वेदनेचा पदर वेगळा. लोमटेंचं सहृदय संवेदनशील मन या सर्वांमधून डोकावत राहतं. या उद्‌ध्वस्त माणसांच्या हताश जगण्याविषयी त्यांची आस्था व जिव्हाळा जाणवत राहतो. तरी त्यांचा एकंदरीत सूर हे सगळं तटस्थपणे टिपत राहतो व मांडत राहतो व म्हणूनच तो वाचकाच्या मनाला संवेदनशीलपणे भिडत राहतो.

लोमटेंचं लेखन हे त्यांच्या अस्सल जीवनानुभवावर आधारित आहे. हे संगळं त्यांनी भोगलेलं व जगलेलं असावं म्हणूनच त्यांच्या लेखनात बारीकसारीक तपशील संगतवार येत राहतात. दैनंदिन जगण्यामधल्या साध्या साध्या कृती ते आपल्या तपशीलवार शैलीने खुलवत राहतात. साधी शेतावर चहा करण्याची क्रिया परंतु तपशिलासह ती माणसाच्या मनामधले द्वंद्वसुद्धा अधोरेखित करते :

''चहासाठी केलेल्या तीन दगडांच्या चुलीवर त्यानं चहाला आंधण ठेवलं. तात्या एकटक त्या आधणाकडं पाहत राहिले. नामदेव जाळत असलेल्या काठ्या पुढे पुढे सारीत होता. हळूहळू पातेल्यातून वाफ येऊ लागली. मग एक - दोन बुडबुडे उठू लागले. सगळीकडून उठाव व्हावा तसं पातेल्यात आधण शिजून आलं. तात्यांची नजर अजूनही हटली नाही.''

लोमटेंच्या कथांमधील प्रतिमा - प्रतीक त्यांच्या पात्रांच्या दैनंदिन जगण्यामधूनच येतात. सगळं आयुष्य लाल बावट्यासाठी घालवलेला कार्यकर्ता मुलीच्या लग्नाचा पैसा जमा करण्यासाठी काँग्रेस आमदाराच्या आमिषाला बळी पडतो व काँग्रेसमध्ये सामील होतो. अंतर्मनाची टोचणी असह्य झाल्याने तो ज्या आप्पापासून दुरावला त्यांच्याकडे जातो. आप्पा त्याला सुनावतात, ''मला लोकांचं नवल वाटतं. दुसऱ्याच्या दावणीला चारापाण्याची सोय झाली की लगेच पळतात. काही ढोरंच इतके हावरट की खुंटा उपटून पळायची तयारी.'' भगीरथ, बायकोला गर्भपात करायला कसं सांगावं या कल्पनेने घामाघूम झालेला. ''त्याचं अंग चारीबाजूंनी कोऱ्या मडक्यासारखं पाझरत होतं.'' बायकोने ठाम नकार दिल्यानंतर ''भगीरथ रागानं तव्यावरच्या भाकरीसारखा फुगला.'' आबाची बायको कौसाबाईचा प्रचार करताना कौसाबाईंच्या वैधव्याचा खुबीनं वापर करायची. ऐकताना बायका भान हरपून ऐकायच्या. ''आबाच्या बायकोचं बोलणं जणू मातीतल्या मुळ्यासारखं खोलवर पसरत चाललेलं.'' गाव शिवाराच्या माणसांच्या दैनंदिन जगण्यातल्या या प्रतिमा लोमटे यांच्या अस्सल जीवनानुभवातूनच येतात.

लोमटेंचं ग्रामीण जीवनाचं चित्र समग्रच असलं तरी काही उणिवा मात्र खटकत राहतात. गावकऱ्याच्या जगण्याची नाळ वारकरी संप्रदायाशी जुळलेली असते. पंढरीची वारी, विठ्ठलाचं दर्शन, रोजचे हरिपाठ, अभंग, नाही म्हटलं तरी त्यांच्या असहाय, हताश जगण्याला सोशीकपणाचं बळ देत असतात. 'बेइमान' कथेमध्ये भगीरथची सासू दिंडीत सामील होण्यासाठी भगीरथच्या गावाला येते किंवा 'जीत' या कथेमध्ये धूर्त सरपंच आपल्या फायद्यासाठी वारकरी पंढरीला निवडणुकीत उभं करतो. असे एक-दोन संदर्भ सोडले तर ते अंग फारसे कथांमध्ये येत नाही. तसेच मोबाईल, सोशल मीडियाशी जुळलेल्या, एक वेगळीच भाषा बोलणाऱ्या आधुनिक तंत्रस्नेही तरुणांचं जगही फारसं प्रतिबिंबित झालेलं दिसत नाही आणि संपूर्ण कथांमध्ये एकही वाक्य किंवा प्रसंग विनोदी अंगानं मांडलेला दिसत नाही. अगदी 'ब्लॅक ह्युमर'सुद्धा नाही. त्यांच्या कथांमध्ये इरसाल, भोचक नमुने भेटतात. परंतु तो इरसालपणा विनोदाच्या वळणाने फारसा जात नाही. लोमटे जे वेदनांचे विश्व सादर करतात, त्यामध्ये हलकेफुलकेपणाला फारशी जागा नाही. कदाचित लोमटेंच्या गंभीर जीवनदृष्टीला तो मानवत नसेल.

लोमटेंच्या लेखनामागे एक खास वैचारिक बैठक आहे. ''स्त्रिया, शेतमजूर, दलितांच्या जगण्याची होरपळ कवेत घेणारी कथा लिहावी. माझा प्रत्येक शब्द शोषणमुक्त समजाच्या निर्मितीसाठी असावा. लेखन हे व्यवस्थेला अर्थपूर्ण हस्तक्षेप असते.'' हा त्यांचा ठाम विश्वास आहे. लोमटे यांची कथा ग्रामीण जीवनाचं रोमँटिक गौरवीकरणही करत नाही व शेतशिवाराविषयी गुरेजनावरांविषयी भाबडी भावनिक गुंतवणूकही दाखवत नाही वा फसवं हळवं चित्रणही करत नाही. जागतिकीकरणाच्या, शहरीकरणाच्या रेट्याखालील बदललेल्या वर्तमान ग्रामीण संस्कृतीचे यथार्थवादी दर्शन या कथा घडवतात. भूतकाळातील स्मरणरंजनात न रमता या कथा जगण्याच्या 'आज' व 'आता'शी भिडतात. ग्रामीण कथाच नाही तर एकंदरीत मराठी कथेची विस्तृत परंपरा या कथा एक पाऊल पुढे घेऊन जातात.

• • •

अनुक्रमणिका



। लेख

आदिवासी कवितेतून व्यक्त होणारे विचारविश्व

डॉ. रमाकांत कराड

आदिवासी नव्हे तर जगाच्या पाठीवरील कुठल्याही जनसमूहाचे विचारविश्व त्या समाजाच्या साहित्य, कला, लोककला, संगीत याद्वारे आविष्कृत होते, व्यक्त होते. स्वातंत्र्योत्तर काळात साहित्यात बदलत्या जीवनसंदर्भामुळे नवे प्रवाह प्रवाहित झालेले आहेत. त्यातीलच आदिवासी साहित्य हे एक महत्त्वाचे सांस्कृतिक घटित आहे. महाराष्ट्रातील कोकण, उ. महाराष्ट्र, विदर्भ अशा सर्व प्रदेशांतून आदिवासी साहित्यिकांची पिढी उदयाला आलेली दिसते. या आदिवासी समाजातूनच पुढे आलेल्या पिढीच्या साहित्यिकांची साहित्यनिर्मिती मराठी साहित्यविश्वाचे लक्ष वेधून घेत आहे. आदिवासी साहित्याविषयी विचारमंथन सुरू झालेले आहे. या आदिवासी साहित्यनिर्मितीतून आदिवासी विचारविश्व समजावून घेणे संयुक्तिक ठरते. माणूस हा समाजशील प्राणी आहे; त्याचप्रमाणे माणूस हा विचारशीलही प्राणी आहे. त्यामुळे विचार हा मानवी आविष्कारामागील महत्त्वाचा भाग किंवा गाभा असतो असे म्हणता येईल.

स्वातंत्र्योत्तर काळातील लोकशाही राजवट, पंचवार्षिक योजना, इतरही अनेक शासकीय विकास योजना यामुळे डोंगरदऱ्यांतील, जंगलातील आदिवासींपर्यंत विकासयोजना राबविण्याचे प्रयत्न झाले. शिक्षण, दळणवळण, आरोग्य, कृषी यासंदर्भातील विकास योजना लोकशाहीप्रणालीतील निवडणुकांतून पुढे आलेले आदिवासी समाजातील नेतृत्व जाणीवपूर्वक आणण्याचे व अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न होऊ लागले. स्वातंत्र्योत्तर काळ, त्यानंतरचा महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतरचा काळ, या काळात समाजातील आदिवासी समाजासारखा मोठा जनसमूहही जागृत होऊ लागला. सुशिक्षितांची पिढी सक्रिय झाली. त्यातून सामाजिक व राजकीय कार्यकर्ते तयार झाले. हळूहळू एकूणच आदिवासी चळवळ आकाराला आली. आपल्या अस्तित्वाचे भान आले. आपल्या हक्काची जाणीव होऊ लागली. सभोवतालच्या वास्तवाचे भान आले. १९७५ नंतरच्या काळात आदिवासी समाजातील नवजागृत, आत्मभान आलेल्या, संवेदनशील अशा नव्या पिढीचे लेखन प्रसिद्ध होऊ लागले व यातूनच आदिवासी साहित्याचा प्रवाह अस्तित्वात आलेला आहे.

मराठी साहित्याच्या आजवरच्या वाटचालीत आदिवासी जीवनचित्रण अगदी क्षीण स्वरूपाचे दिसते. आदिवासी साहित्य चळवळ प्रवाह निर्माण होण्यापूर्वी आदिवासी समाजाच्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न काही मराठी साहित्यिकांनी केलेला दिसतो. त्यामध्ये गो. नी. दांडेकर, आचार्य भिसे, र. वा. दिघे, बा. ग. कर्णिक, प. त्रि. सहस्रबुद्धे, मधुकर वाकोडे, सुरेश द्वादशीवार इत्यादींचे कादंबरीलेखन महत्त्वाचे आहे. या लेखकांनी सामाजिक सेवेच्या बांधिलकीतून, सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून, आदिवासी जीवनाबद्दलच्या आकर्षणातून अशा भिन्न

भिन्न प्रेरणांनी हे लेखन केलेले आहे. आदिवासी समाजजीवनाला मराठी साहित्यातून परिचित करून देण्याचे वाङ्मयीन कार्य या लेखकांनी केले, हे त्यांचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे. परंतु आदिवासी साहित्याचे अभ्यासक याविषयी फारसे समाधानी नाहीत असे दिसते. यासंदर्भात डॉ. वाल्हेकर म्हणतात, ''मराठी साहित्यिकांच्या प्रतिभा कक्षात आदिम जमातींचे प्रतिबिंब उमटलेच नाही. १९६० पूर्व आणि नंतरच्या कालखंडात कलावाद, सौंदर्यवाद मराठी साहित्यात जोरकस ठरल्यामुळे अबोल आदिम जमातीच्या व्यथा, वेदना, अन्याय, निसर्गाधीन संघर्षमय जीवन मराठी साहित्यिकांच्या प्रतिभा आवाक्यात येऊ शकले नाही.''[१]

१९७५ नंतर सुरू झालेल्या आदिवासी साहित्य चळवळीने साहित्यनिर्मिती- बरोबरच आदिवासी जीवनाच्या सर्वच स्तरांवरील संघर्षाला वाचा फोडणारी व त्याचेही नेतृत्व करणारी ही चळवळ व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली. आदिवासी साहित्यिक हे फक्त साहित्यिक न राहता आदिवासींच्या जीवनसंघर्षाच्या चळवळीचे नेतृत्वही ते करू लागले. कार्यकर्त्याच्या भूमिकेत ते मनःपूर्वक जगताना दिसत होते. आदिवासी साहित्यनिर्मिती करून आदिवासी साहित्यिकाने थांबून चालणार नव्हते. कारण सभोवतालचे समाजवास्तव भीषण होते. आदिवासींच्या विकासयोजना व्यवस्थितपणे गरजू आदिवासींपर्यंत पोहचत नाहीत. आदिवासींचे शोषण काही थांबत नाही. अज्ञान, अंधश्रद्धा पूर्णपणे नाहीशी होत नाहीत. आरोग्याचे, राहणीमानाच्या निकृष्ट दर्जाचे प्रश्नही गंभीर होताना दिसत आहेत, अशा परिस्थितीत आदिवासी साहित्य चळवळीला व साहित्यिकांना केवल साहित्यलेखन करून चालणार नव्हते; तर त्यांना आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी, अन्याय निर्मूलनासाठी चाललेल्या कार्यात झोकून देणेही गरजेचे वाटत होते. आदिवासी समाजावरील साहित्यनिर्मिती-प्रमाणेच आदिवासींचे शिक्षण, सर्वांगीण विकास यासाठी बिगर आदिवासी सेवाभावी माणसेही कार्यरत होती. पण आता बदलत्या परिस्थितीत आदिवासी समाजातूनच पुढे आलेल्या माणसांनी आदिवासीच्या सर्वच क्षेत्रांतील कार्याचे नेतृत्व करावे. तेच आदिवासींना प्रगतीच्या प्रवाहात आणू शकतील असा विचार आदिवासी समाजात व्यक्त होऊ लागला आणि हा विचार योग्यही होता. आदिवासी साहित्यनिर्मितीत वाढ झाल्यानंतर संमेलने सुरू झाली. आदिवासी साहित्य परिषद साहित्याच्या प्रेरणा, स्वरूप, वाटचालीबद्दल विचारमंथन करू लागली. आदिवासी साहित्यावरील वाढत्या जबाबदारीचे भान त्यांनाही येऊ लागले. प्रसिद्ध आदिवासी कवी व विचारवंत भुजंग मेश्राम यासंदर्भात म्हणतात, ''आपल्याला आपली वाट, आपली दिशा निश्चित करणे महत्त्वाचे आहे. आदिवासी साहित्य कृतिशील बनवून त्यास आत्मसन्मानाच्या चळवळीशी जोडणे आवश्यक आहे. आम्हाला आदिवासींच्या आत्मसन्मानाची चळवळ तीव्र करायची आहे. आदिवासी साहित्य हे तिचे अविभाज्य अंग आहे.''[२] प्रस्थापित साहित्यातील कलावाद, रंजनाची तंत्रे, आविष्काराच्या पद्धती आदिवासी साहित्याला मारक ठरतील. आज साहित्यातही प्रतिगामी विचार अस्तित्वात आहे. त्यापासून आदिवासी साहित्यालाही मोठा धोका आहे. सध्याच्या परिस्थितीत सामाजिक, वैचारिक क्षेत्रांत मतांतराचा जोर वाढलेला आहे. मेश्रामांसारख्या बंडखोर विचारवंत कवीला वाटते की हिंदुत्ववादी, साम्यवादी, ख्रिस्ती मिशनरी, नक्षलवादी, सर्वोदयवादी या सर्वांनीच आदिवासींभोवती कडे केलेले आहे. परंतु या सर्वांच्या मुखवट्याआड नेमके काय आहे? सर्वच आदिवासींच्या उत्थानाचा विचार मांडताना अशा वेळी काय खरे, काय खोटे हेच कळेनासे होते. म्हणून स्वतः आदिवासींनी आपला विचार, दिशा, मूल्ये पक्की केली पाहिजेत. त्या दिशेने आदिवासी प्रगतीची चळवळ व साहित्यनिर्मितीत सातत्य ठेवले पाहिजे. कार्यकर्त्यांचेही वैचारिक प्रदूषण होऊ नये. हे असे या कवीचे विचारसूत्र आहे आणि ते योग्य आहे.

उदाहरणादाखल काही आदिवासी कवितांतील व्यक्त होणाऱ्या विचारातूनही आदिवासी विचारविश्वाचा मागोवा आपणाला घेता येईल. आदिवासी कवितेच्या प्रांतात अनेक नामवंत कवी-कवयित्री आहेत. विनायक तुमराम, उत्तम धोंगडे, वाहरू सोनवणे, भुजंग मेश्राम, वामन शेळमाके, गोविंद गारे, उषाकिरण आत्राम, सुनील कुमरे या कवींची कविता विचारांनी समृद्ध आहे. सामाजिक जाणिवांनी ही कविता ओतप्रोत भरलेली आहे. आदिवासी बोलींचे सामर्थ्य किती अनंत आहे; हे या कवितांच्या भाषेने दाखवून दिलेले आहे. सामाजिक जाणिवांचं सौंदर्य या कवितेला लाभलेलं आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, आधुनिकता, विज्ञाननिष्ठा, मानवतावाद,

बुद्धिप्रामाण्यवाद या पुरोगामी मूल्यांचा स्वीकार आदिवासी साहित्याने केलेला असल्याचा आदिवासी कवितेतील विचार नीट अभ्यासल्यानंतर समजून येते. स्वातंत्र्य मिळून आज ७० वर्षे झालेली असूनही दुर्गम भागातील आदिवासी बांधवांपर्यंत या स्वातंत्र्याची फळे मिळालीच नाही,. अशी जाणीव होऊन आदिवासी कविमनात विद्रोहाची जाणीव निर्माण होणार नाही तर काय होईल? यासंदर्भात आपण कवी माधव सरकुंडे यांच्या 'स्वातंत्र्य' या दीर्घकवितेचा विचार करू. या कवितेत ते लिहितात :

कुठल्या स्वातंत्र्याची गोष्ट करतोस यार तू? ज्याला तू स्वातंत्र्य समजतो मी त्याला हिडीस हेळना समजतो; जिथं मूठभर मवाली खातात पोटभर मेवा; सरकारी दुधावर पोसल्या जातो गुंडांचा थवा.

स्वातंत्र्य मिळाले, लोकशाही राजवट आली. लोकप्रतिनिधी सरकारमध्ये सामील झाले. शासकीय अधिकारी वर्गातील मूल्यभ्रष्टता, आमदार, खासदार, मंत्री यांचेही सत्तेत रममाण होऊन शेवटच्या स्तरातील माणसांच्या विकासाकडे होत असलेले दुर्लक्ष, शासकीय कंत्राटदार हा वर्ग तयार होणे या सर्वांमुळे स्वातंत्र्याची फळे पाड्यापाड्यांवरील आदिवासी बांधवांना खऱ्या अर्थाने अजूनही मिळत नाही. ही वेदना या कवितेत आहे आणि या वेदनेतूनच मग विद्रोहाचा जन्म होतो. हा विद्रोह प्रस्थापित, जुलमी व्यवस्थेशी संघर्ष करून न्याय्य हक्क पदरात पाडून घेतो. आजवर अबोल असलेल्या आदिवासी बांधवांना संघर्षविद्रोहाचाही मार्ग धरून स्वातंत्र्याची गंगा पाड्यापाड्यांपर्यंत न्यावी लागेल. हे या कवीने सुचविलेले आहे.

आदिवासी समाजात आदिवासी स्त्रीचे प्रश्न तर आपल्या भयानक स्वरूपाचे आहे. ती युगानुयुगापासून शोषित, पीडित आहे. प्रसिद्ध आदिवासी कवयित्री उषाकिरण आत्राम यांनी समाजातील सर्वांत मागासलेल्या आदिवासी स्त्रीच्या वेदनेला वाचा फोडलेली आहे. आदिवासी स्त्रीला समाजात स्थानही नाही आणि मानही नाही. डोंगरदऱ्यात राहणारी आदिवासी स्त्री काबाडकष्ट करून मरते. या स्त्रीच्या अंगावर पुरेसे वस्त्र नाही. शहरी समाज तिच्याकडे उपहासाने पाहतो. या स्त्रीला कवयित्री विद्रोहाची लाल आग धारण करायला सांगत आहे. परिवर्तनाची वाट धरायला सांगत आहे. शिक्षणाचा मार्ग धरून आपणच आपल्या प्रगतीचे शिल्पकार होऊ या! हा संदेशही कविता देते.

आदिवासी कवी-कवयित्री आपल्या कवितेतून आदिवासींना आपल्या इतिहासाची नेमकी मर्मस्थळे दाखवून देतात. आदिवासींमधील शूर, लढवय्ये स्त्री-पुरुषांचा ऐतिहासिक वारसा व्यक्त झालेला दिसतो. पराक्रमी पुरुष रावण, एकलव्य. क्रांतिकारक बिरसा मुंडा, संग्रामशहा, या सर्वांच्या क्रांतिकार्याची जाणीव करून दिलेली आहे. त्यातून आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा आजच्या पिढीला देण्याचे सामर्थ्य या कवितेत आहे.


एकंदरीत आदिवासी कवितेच्या निर्मितीकडे, आशय-आविष्काराचा शोध घेतला तर आपल्याला ही कविता विचारसंपन्न, आशयसंपन्न आहे हे लक्षात येते. आदिवासींच्या ऐतिहासिक काळापासून तर आजपर्यंतच्या जगण्याचा संघर्ष या कवितेत आहे. या कवितेने आधुनिक, पुरोगामी मूल्यांचा-विचारांचा स्वीकार केलेला आहे. थोर आदिवासी क्रांतिकारक, थोर लढवय्या स्त्रिया यांच्या गौरवाबरोबरच महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याही आधुनिक व समाजविकासाच्या मूल्यांचा व विचारांचा पुरस्कार केलेला आढळतो.

आदिवासी कवितेत वेदना, दुःख यांचा आविष्कार आहे. आदिवासींचे जे समाजवास्तव आहे ते पाहून या वेदनेचा या कवितेतून आविष्कार झालेला आहे. वेदनेतून नकाराचा व विद्रोहाचा जन्म होतो. प्रस्थापित व्यवस्थेतील विषमता, शोषण, अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार नष्ट व्हावा यासाठी विद्रोहाचा आविष्कार आहे. नवसमाजरचनेचे स्वप्न पाहणारी, तो विचार मांडणारी ही आशावादी कविता आहे.

विद्यमान काळातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक या सर्वच क्षेत्रांत जे काही घडत आहे, त्याचे भान व या घडामोडींवर अर्थपूर्ण भाष्य या कवितांमधून व्यक्त होताना दिसते. ही आदिवासी कविता आणि कवी-कवयित्रीही सामाजिक बांधिलकीचा स्वीकार केलेले आहेत. या बांधिलकीमुळेच आदिवासींच्या समग्र जगण्याचे, अस्तित्वाचे भान त्यांना आहे. त्यांचे प्रश्न त्यांना या कवितांतून मांडावेसे वाटतात. अशारीतीने आदिवासी कवितेतून आदिवासी विचारविश्वाचा शोध घेण्याचा अल्पसा प्रयत्न या निबंधातून केलेला आहे.

• • •

अनुक्रमणिका



। लेख

रा. ग. जाधव यांचा दलित साहित्यविचार

प्रा. डॉ. शशिकांत लोखंडे

दुसऱ्या महायुद्धामुळे जीवन आणि कलासाहित्य यांच्या मूल्यकल्पनांमध्ये बदल, पुनर्विचार, नवप्रस्थापना झाली. 'मानवी अस्तित्व' हाच चिंतनाचा विषय झाला. मानवाची तथाकथित जीवनमूल्ये उद्ध्वस्त झाली. यंत्रयुगाच्या महात्मतेमुळे मानवी मनांचा कोंडमारा झाला. जीवनाची भयाकुलता आकाराला आली आणि त्याचा परिणाम साहित्य व साहित्यविचार यांच्यावर झाला. असे असले तरी महायुद्धोत्तर जीवनात साहित्यात-साहित्यविचारात नव्या पिढीने सांस्कृतिक-वाङ्मयीन परंपरेला संपूर्ण नकार दिला नाही. संस्कृतीशी विद्रोह केला गेला नाही.

१९६० नंतरच्या दलित साहित्यात मात्र पुन्हा एकदा जीवन आणि कला-साहित्य यांच्या मूल्यकल्पना पारखायला लावल्या. आधुनिक श्रद्धा, नवनीती समाजरचना, राजकारण व जीवन यातला संबंध, कलाभिव्यक्तीचे निकष, सौंदर्यवादी संकल्पनांचा व्यूह इत्यादींचा पुनर्विचार करायला लावला आणि पुन्हा एकदा 'सत्यं-शिवं-सौंदर्या'च्या फेरतपासणीसाठी आठवण करून दिली.

मर्ढेकरोत्तर कालखंडात - १९६० नंतर - दलित साहित्याचा आविष्कार झाला. मराठी साहित्याच्या एकूण परंपरेत दलित साहित्याचे 'वेगळेपण' दिसू लागले. त्याचे स्वरूप आणि प्रयोजन अगोदरच अस्तित्वात असलेल्या साहित्याच्या स्वरूपापेक्षा, प्रयोजनापेक्षा त्याचे स्वरूप आणि प्रयोजन 'वेगळे' असल्याचे जाणवू लागले.

दलित साहित्य प्रत्यक्ष जीवनातून निर्माण झालेले असून ते जीवननिष्ठ आहे; हा एक गुणविशेष दिसू लागला. मर्यादित अनुभवविश्वात वावरणाऱ्या मराठी साहित्याच्या कक्षा या साहित्याने समर्थपणे रुंदावल्या गेल्या हेही दिसू लागले.

गावकुसाबाहेर राहणाऱ्या आणि शतकानुशतके पददलित ठेवल्या गेलेल्या एका प्रचंड समाजाचे दुःख, दैन्य, वेदना, उद्वेग, क्रोध, कारुण्य इत्यादींनी मुक्त असलेल्या जीवनानुभवांचा जिवंत प्रवाह मराठी साहित्यात आणण्याचे महनीय कार्य दलित साहित्याने केले आहे. स्वतःच्या जीवनानुभवांचा प्रामाणिकपणे आविष्कार करणे महत्त्वाचे मानले. अर्थात ते साहित्य जीवननिष्ठ असल्याचे म्हटले जाऊ लागले. मानवकेंद्रित व मानवनिष्ठ मानले गेले. दलित साहित्य हे व्यक्तिनिष्ठ नाही समाजनिष्ठ आहे असेही म्हटले गेले.

दलित साहित्याने 'जीवनाशी बांधिलकी' मानली ते नकार, विद्रोह आणि मानवता या तत्त्वक्रियेतून.

अनुक्रमणिका

दलित साहित्याने मानवी जीवनातील मानव-विकास, विघातक देव-दैववाद, विषमतापोषक अध्यात्ममूल्ये, परंपरा, स्थितीवाद, पोथीनिष्ठा यांना नाकारले आहे. माणुसकीला नष्ट करणाऱ्या, माणसामाणसांत भेद करणाऱ्या व्यवस्थेशी हे साहित्य विद्रोह करते आहे आणि इहवाद-बुद्धिवाद-विज्ञानवाद, परिवर्तनवाद, नास्तिकता व स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचा स्वीकार करते. दलित साहित्यात अस्तित्वहीन केलेल्या मानवी मनांचा भोवतालच्या परिस्थितीशी लढा आहे. आक्रोश आहे. प्रचंड दुःख आहे. अमानुषता, विषमता, अन्याय यातून मिळालेले हे प्रचंड दुःखच जीवनमूल्यांची फेरतपासणी करू लागले आहे. नकार, विद्रोह यातून सम्यक मानवतावादाचा हक्क मागणारे दलित साहित्य डॉ. आंबेडकरांच्या विचारप्रणालीचे मूर्त रूपच होय.

''डॉ आंबेडकरांच्या प्रेरणेतून बळ घेऊन (या) शोषित समाजाने वाङ्मयात आपल्या अनंतसंदर्भी अस्तित्वाचे आकार कोरले. त्याचा हा निषेध. हा विद्रोह त्याला शूद्र करणाऱ्या, अस्पृश्य करणाऱ्या जीवनमूल्यांच्या विरुद्ध आहे.'' हेच दलित साहित्याचे 'स्व' रूप होय. तेच त्याचे प्रयोजन होय. येथे साहित्याला पुन्हा एकदा आत्मसंरक्षक साधनात्मकता लाभली.

जीवन आशय व अपारंपरिक लेखनाभिव्यक्ती, जीवनाशयाभिव्यक्ती, १९६० पर्यंतच्या मराठी साहित्यात 'अभिनव' आहे.

दलित साहित्याने जीवनातील अमानवी व व्याप्त जीवनमूल्यांनाच नकार, विद्रोह दर्शविला आहे असे नसून कला व तिची परंपरा, तिचे मूल्यादर्श यांनाही नकार दर्शविला. कला ही जीवनासाठीच आहे. कला ही नीती आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता या नीतिमूल्यांची प्रस्थापना कलाच करते असे मानून 'अ-दलित' समाजातील-संस्कृतीतील - पारंपरिक नीतिमूल्ये नाकारली गेली. रूढ साहित्यशास्त्रही नाकारले गेले.

आपल्या जीवनानुभवाची पूर्वचित्रे रंगवून दलित लेखक समाजजीवनाला नवी जाग आणण्याचा प्रयत्न करतो आहे; याचा अर्थ साहित्याचा परिणाम जीवनावर, जनमानसावर होतो. मानवतावादाचा परिणाम व्हावा ही झळही शिवत्वाच्या जवळपास येणारी आहे. अखिल मानवाचे हित 'असांकेतिक रूढी, नियम-नीती व मानवता, समता, बंधुता, स्वतंत्रता' यात आहे. हे सांगणे, दलित साहित्यातही आहे असे दिसते.

जिने दलितांना माणूस म्हणून जगणेही नाकारले त्या प्राचीन संस्कृतीला दलित साहित्याचा नकार आहे.... ज्याने दलितांना कधी आपला विषय बनवले नाही आणि बनवले तेव्हा त्यांचे विकृत चित्रणच केले त्या पारंपरिक साहित्याला दलित साहित्याचा नकार आहे. ''भारतीय संस्कृतीने आजतागायत दलितांना जी वागणूक दिलेली आहे ते पाहता त्यांना असा नकार द्यावा असे वाटणे अत्यंत स्वाभाविकच आहे.''

सम्यकपणे मानवी जीवनाचे दर्शन साहित्यात यावे हीच या नकारामागे भूमिका आहे. जीवनातील 'सत्य' हे निव्वळ वास्तवतेच्या दर्शनातून प्रतीत होण्यापेक्षा मानवतावादातून साक्षात ठरावे ही आकांक्षा त्या भूमिकेमागे आहे.

दलित साहित्यातून नव्या पुरा-कथा (Myths) त्यासाठीच येतात. त्यातून मानवतासूचक भाष्ये. मानवाची विश्वात्मक दुःखे (भूक, अन्याय, पिळवणूक इ.) प्रकट होतात.

दलित साहित्यामुळे जीवनमूल्यांचा पुनर्विचार होऊ लागला तसा साहित्यमूल्यांचा, सौंदर्यविचारांचा पुनर्विचार होऊ लागला.

दलित साहित्य आशयप्रधान आहे. मनाविष्कारी आहे, त्यामुळे साहित्यकृतीच्या रचनात्मक अंगाचा 'कला'दृष्ट्या विचार आज गौण मानला जात आहे. कलाभिव्यक्तीच्या रूढ साचांना दलित कवितेने हादरा दिला आहे. (उदा. नामदेव ढसाळ यांचा 'गोलपिठा' हा कवितासंग्रह). कलेची सौंदर्यमूल्ये दलित जीवनानुभवाच्या अभिव्यक्तीला जाचक व अपुरी ठरत असल्याचे हे द्योतक आहे.

दलित साहित्यात प्रत्यक्ष प्रचारात्मक नीतिदर्शन, बोधकथन नसले तरीही स्वातंत्र्य, समता, बंधुतादींचा पुरस्कार त्यात आहे.


संपूर्ण वास्तवाचे (अतिवास्तवासह) चित्रण करू पाहणारे दलित साहित्य परिणामदृष्ट्या समतापूर्ण मानवतावादाचा पुरस्कार करू पाहते व संपूर्ण जीवनाचे सम्यक चित्रण रेखाटताना, अपारंपरिक, अनुकरणरहित, परसंस्काररहित असे स्वतःचेच 'कलादर्श' निर्माण करू इच्छिते.

दलित साहित्य अस्पृश्यता, सांस्कृतिक, परंपरा नाकारीत आहे. ते जुन्या, बुरसटलेल्या अ-मानवी कल्पनेच्या विरुद्ध आहे. 'अस्पृश्यता', 'अन्याय',

अनुक्रमणिका

'जातीयता', 'भेदाभेद', 'अमानुषता', 'पिळवणूक' इत्यादी गोष्टी ह्या समाजातील 'अ-शिव' आहेत आणि त्यांच्या विरुद्ध लढा दलित साहित्याचा आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, माणुसकी इत्यादी मूल्यांची नवी प्रस्थापना म्हणजे 'अ-शिवत्व' नष्ट होऊन 'शिवत्वा'ची प्रस्थापना होय.

दलित साहित्यात एक अनोखे अनुभवविश्व व्यक्त होते, त्यातून दलित जाणिवेचे दर्शन घडते, त्यातून शतकानुशतके भोगलेल्या वेदना साकार होतात. अन्याय, छळ, अपमान या विरुद्ध चीड व्यक्त होते. अशा या साहित्याकडे आकृतिवादी (Formalist) भूमिकेतून पाहता येत नाही. डॉ. वानखडे म्हणतात त्याचप्रमाणे जीवनाचा आणि कलाकृतीचा काही संबंध नाही असे प्रतिपादन करणाऱ्या आकृतिवादी भूमिका घेणाऱ्या टीकाकाराला दलित साहित्याचे मूल्यमापन करताना आपली भूमिका बदलावी लागेल. आज आकृतिसौंदर्यापेक्षा दलित साहित्याकडे आशयघनता व त्या आशयघनतेची उंची हेच निकष विचारात घ्यावे लागतात. 'कलाकृतीच्या सौंदर्या'संबंधी दलित साहित्याने पुनर्विचार करायला लावला आहे.



डॉ वानखडे लिहितात, ''पांढरपेशा लेखकांनी आणि समीक्षकांनी ठरविलेली मूल्ये, सिद्धान्त, कार्य आणि सौंदर्याची साक्षेपी मूल्ये दलित लेखकाने झुगारून दिली पाहिजेत.''

हे खरे असले तरी दलित साहित्य शिवत्वाला नकार देते हे खरे नाही. जीवनातील - मानवी विकासाला विघातक ठरणाऱ्या नीतिकल्पना, अंधश्रद्धा, दैववाद, जातीयता, विषमता, अन्याय, पारंपरिक जीर्ण आदर्श, साचेबंदपणा इत्यादी असत्य गोष्टी दलित साहित्य नाकारते... अशिवत्व निदर्शक गोष्ट नाकारताना दलित साहित्य जेव्हा विज्ञाननिष्ठा, मानवता, समता, न्याय, स्वातंत्र्यादी गोष्टींचा स्वीकार करू पाहते तेव्हा जणू व्यापकदृष्ट्या शिवत्वाचाच मार्ग आक्रमू पाहते असे म्हणावेसे वाटते.

मर्ढेकरपूर्व कालातही असत् (goodless) कल्पनांना मान्य केले गेले (उदा. आगरकर, र. धों. कर्वे, म. फुले, वा. म. जोशी, केतकर यांचे लेखन) असले तरी संस्कृतीची चौकट व पाया अ-बाधित ठेवला गेला; परंतु दलित जाणिवांतून अवतरलेल्या साहित्याने सांस्कृतिक परंपरा व संस्कृती-संचित-निर्भयपणे स्वतःहून नाकारले. किमानपक्षी स्वतःहून स्वतःला भारतीय व हिंदू-पारंपरिक संस्कृतीपासून अलग राखण्याची बांधिलकी स्वीकारली. मर्ढेकरपूर्व कालात 'असत्'चा निषेध संस्कृतीचा पाया न उखडता झाला तर मर्ढेकरोत्तर दलित साहित्याने मूलतः संस्कृतीचा पायाच नाकारला हेही लक्षात घेणे आवश्यक आहे.

'नकार', 'विद्रोह', 'मानवता' ह्या तत्त्वसूत्रांचा आविष्कार आपल्या लेखनकृतीतून करताना दलित लेखकांनी त्या लेखनकृतीला वैचारिक अधिष्ठान दिले. त्यामुळे दलित साहित्यात 'विचारा'ला महत्त्व मिळाले. या लेखनांतर्गत विचारामुळे त्यांच्या लेखनकृतीला स्वभावतः विचार-वहनाचे, विचारसर्जनशीलतेचे, साधनात्मक असे स्वरूप येत गेले आहे. गंगाधर गाडगीळांनी साहित्यातील 'विचाराला' कलात्मतेच्या दृष्टीने कलाबाह्य ठरविले आहे ('खडक आणि पाणी') परंतु दलित साहित्यात मात्र ह्या विचाराविष्काराला समाज प्रबोधनदृष्टचा आपल्या कृतीत अपरिहार्यता दिली आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे दलित साहित्यावरील चर्चेत दलित जीवन व दलित साहित्य यांचे परस्पर संबंध काय आहेत हे सिद्ध केले गेले आहे. (१) भारतीय समाजव्यवस्थेतील अस्पृश्यता आणि तिचे सामाजिक, सांस्कृतिक परिणाम, (२) अस्पृश्यांनी केलेला बौद्धधर्माचा स्वीकार, (३) महाराष्ट्रातील डॉ. आंबेडकरांची चळवळ व इतर चळवळी, (४) मराठी साहित्य परंपरेत दलित साहित्याचा विचार, (५) दलित म्हणजे काय?, (६) दलित साहित्याची आवश्यकता, वेगळेपण व त्या अनुषंगाने होणाऱ्या साहित्य घडामोडी, (७) नवीन समीक्षामूल्यें व सौंदर्यमूल्य, (८) नवीन पुराणकथा, (९)अनुभवाविष्कारातील साचेबंदपणा, (१०) कलात्मक तटस्थता, (११) साहित्य आणि समाजक्रांती, (१२) दलित साहित्य आणि निग्रो साहित्य, (१३) बुद्ध-मार्क्स-आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान,

अनुक्रमणिका

(१४) दलित साहित्य अलगतावादी नाही. मराठी साहित्य प्रवाहाचाच एक प्रवाह आहे. (१५) नीतिविचार व दलित साहित्य. (१६) सत्यम्, शिवम्, सुंदरम् इत्यादी गोष्टींना महत्त्व मिळाले आहे.

दलित साहित्यात व्यष्टी नव्हे तर समष्टी व्यक्त होते. अशा वेळी ''दलित साहित्य रसप्रतीती आणून देते की नाही हा प्रश्नच गौण'' असल्याचे एक दलित-साहित्य-विमर्शक म्हणतात. ते पुढे लिहितात, ''दलित लेखकाचे अनुभव स्वतःचे घाट घेऊन येतील... आपल्याला जे सांगायचे आहे ते जर 'अर्थपूर्ण' असेल तर ते स्वतःचा 'घाट' घेऊन येईल. तर काही विमर्शक सांगतात. ''दलित समाजातील नवीन लेखकाने आपण काय लिहितो, म्हणजे आपण जे लिहितो ते कथा, कादंबरी किंवा इतर 'फार्म'चे रूप घेते की नाही याचा विचारच करू नये. त्याचा जो काही raw experience आहे तो इतका अर्थपूर्ण आहे की, तो कुठला फॉर्म घेतो याला महत्त्व नाही. त्याला फॉर्म येणारच आहे.'' म्हणजे दलित साहित्य जर स्वतःचा फॉर्म घेऊन येणार असेल तर त्याचे मूल्यमापन, त्या त्याच्या अंगभूत 'फॉर्म'वरूनच करावे. ... त्या साहित्याचे मूल्यमापन तो अनुभव किती 'मूल्यवान' आहे त्याच्या संदर्भात व्हावे असेही एक मत आहे... आणि लेखकाचा प्रकृतिधर्म लक्षात घेऊन त्या अनुभवाची मूल्यात्मकता ठरवावी.'' ज्याचा जसा धर्म तसा त्याचा लेखनप्रवास.''

यावरून हेच लक्षात येते की, विद्रोही साहित्याचे मूल्यमापन रूढ साहित्यविषयक निकषाने करता येत नाही आणि अशीच दलित लेखकांचीही भूमिका आहे. त्या साहित्याची विद्रोही प्रकृती लक्षात घेऊनच मूल्यमापन केले पाहिजे.

त्यामुळे ह्या चर्चेतून दलित साहित्यविचारात नव्या अर्थाने, नव्या परिभाषेने, नव्या रूपाने साहित्य व समाज यांच्या संबंधाला स्थान मिळण्याची शक्यता निर्माण होत आहे असे दिसते.

या पार्श्वभूमीवर यानंतर दलित साहित्याचे एक प्रमुख विमर्शक रा. ग. जाधव यांच्या साहित्य-विचारासंबंधी विवेचन करणे येथे प्रस्तुत आहे.

रा. ग. जाधव यांनी 'साहित्य, समाज व सामाजिकता' यांचा परस्पर संबंध कल्पून 'वास्तववाद' व 'मानवतावाद' ह्या संदर्भाने आपला साहित्यविचार मांडला आहे. ते स्पष्टच म्हणतात, ''समाजापुढे साहित्यकृती आली की, तिला अनेक सामाजिक संदर्भ प्राप्त होतात. नवजात बालकाला ज्याप्रमाणे कुटुंब, समाज, देश अशा घटकांनी क्रमाक्रमाने, हळूहळू पण अटळपणे एक स्वत्व (आयडेन्टिटी) प्राप्त होत जाते; त्याचप्रमाणे अभियुक्त झालेल्या साहित्यकृतीलाही सांस्कृतिक घटकांनी स्वत्व प्राप्त होते. या स्वत्वाचा शोधबोध करून घेणे, हेच समीक्षेचे कार्य आहे. अखेरपक्षी जीवनाला मूल्य आहे या धारणेतून साहित्यकलेचे मूल्य निष्पन्न होते.'' आजचे दलित साहित्यही ह्याच साहित्यविचाराच्या, ह्या सामाजिक दृष्टीच्या आधाराने वाढते आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही सामाजिक मूल्ये मानली आहेत. दलित साहित्य ह्या मूल्यांचा पुरस्कार करताना परंपरेला, पारंपरिक समाजरचनेला 'नकार' देऊन तिच्याशी 'विद्रोह' पुकारत आहे तेव्हा 'विद्रोहा'स 'नकार' ही मूल्येही शिव निर्देशक आहेत; कारण त्यांची प्रेरणा स्वातंत्र्य, समता, बंधुता ह्या मूल्यांच्या अपेक्षेतूनच निर्माण झाली आहे.

साहित्य एक सांस्कृतिक घटना असते. हा दृष्टिकोन स्वीकारून रा. ग. जाधव यांनी सामाजिकतेचा संदर्भ घेऊन साहित्याची जी चर्चा केली आहे ती सत्य, शिव या मूल्यांचे सूचन करणाऱ्या नव्या परिभाषेतच. ही परिभाषा-संज्ञा आहे : 'सामाजिक बांधिलकी' अशी. व्यक्तिस्वातंत्र्याचे जे सामाजिक रूप असते त्यातूनच बांधिलकीची संकल्पना निर्माण होते असे ते म्हणतात. ही सामाजिक बांधिलकी पारंपरिक नीतितत्त्वांशी नसून सामाजिक उद्दिष्टांशी असते, लोकशाहीनिर्मितीशी असते. बांधिलकीच्या संकल्पनेचा विचार करताना कुठल्या तरी परम अर्थाच्या तत्त्वज्ञानाचा, श्रेयसचा, आदर्शवादाचा समाजास विचार करावयास लावणे अत्यंत इष्टच नव्हे तर आवश्यक आहे.'' ही भाषा शिवतत्त्वविचाराच्या जवळ येऊन ठेपणारीच आहे. ज्या साहित्यातून सामाजिक परिवर्तनाचा पुरस्कार असतो ते साहित्य बांधिलकीचे असते ही ह्या भाषेमागील भूमिका आहे. बांधिलकी ही व्यक्तीचा एक नैतिक निर्णय आहे. यावर ते भर देतात; कारण ती नैतिक सामाजिक तत्त्वसरणी आहे. समाज प्रबोधनाचे ते एक साधनच आहे. वाङ्मयीन बांधिलकीपेक्षा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची अटळ सामाजिकता हे वाङ्मयीन बांधिलकीचे अटक वॉरंट नव्हे.'' याची त्यांना जाणीव आहे. याच बांधिलकीतून साहित्याने 'मानव्याची इष्ट अवस्था' निर्माण करणे त्यांना आवश्यक वाटते. आणि

अनुक्रमणिका

त्यांच्या साहित्यविचाराचे हे एक प्रमुख सूत्र आहे. ''सामाजिक वास्तवाशी अधिक डोळसपणे, अधिक व्यापकतेने, अधिक जिज्ञासेने आणि जिव्हाळ्याने एकरूप होऊन ललित साहित्य निर्माण झाले पाहिजे ही त्यांची अपेक्षा त्यांच्या सूत्राशी सुसंगतच आहे. हे सूत्र आणि ही अपेक्षाच ललित साहित्याला क्रांतिप्रवणतेकडे नेते ही त्यांची उत्पत्ती आहे.'' विद्रोहता हे त्या क्रांतिप्रवणतेचे एक बलस्थान आहे.

दलित साहित्यात जशी सामाजिक जाणीव आहे. तशी सौंदर्यदृष्टीही आहे. दलित सौंदर्यदृष्टीचा एक महत्त्वाचा प्रश्न म्हणूनच सामाजिक जाणिवांच्या आत्यंतिक गोवणुकीतून (इनव्हॉल्व्हमेंट) सुटका करून घेणे व कलात्मक ताटस्थ्य प्राप्त करणे हा आहे, असेही त्यांना वाटते.

दलित साहित्य, ते निर्माण करणारे सर्जनशील मन आणि त्याचा अंतर्बाह्य परिसर यांच्यात प्रकटपणे वा प्रच्छन्नपणे जाणवलेली प्रयोजन-प्रेरणांची, वृत्ति-प्रवृत्तींची, अडचणी-अडथळ्यांची, सिद्धी साधनांची जी वैशिष्ट्ये आहेत त्यांचा शोधबोध 'निळी पहाट' या ग्रंथातून घेतला आहे तो सामाजिक जाणिवेतूनच, हे विशेष होय.

• • •

संपर्क :
विदर्भ साहित्य संघ
सांस्कृतिक संकुल, चौथा माळा,
राणी झाशी चौक, सीताबर्डी,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७
Email :yugwani.nagpur@gmail.com



। कथा

जाणीव

▫ प्रमोद नामदेवराव बोरसरे

वसंत संपून ग्रीष्माचा उष्मा भरून उरला होता. सगळीकडे उकाडाच उकाडा होता. नुसतं उन्हच उन्ह. पत्तासिजन संपला होता. बोदभरले ट्रक, फळीकडून आलापल्ली, आष्टी, चामोर्शी मार्गाहून गोदामांकडे ये-जा करू लागले होते. आलापल्लीहून भामरागडकडे जाऊ लागले की आठ-दहा बोदभरल्या ट्रकांच्या डोलाऱ्याला जायला वाट द्यायला आपलं वाहन रस्त्याखाली घ्यावं लागायचं.

शिशिरात गळून पडलेलं रान वसंतात पालवलं होतं. ग्रीष्मापर्यंत वसंतात भरून न आलेल्या रानाच्या पोकळ्या पोकळ्याच राहिल्या होत्या. त्यातून रस्त्याकडेवरचं रान चार-सहा फुटांवरचंच दिसायचं, एरवी रानही गच्च... गच्च आणि गच्च. निबिड... निबिड आणि निबिड... दाट आणि घनदाट.

लियाकत हुसैनची वरात असंच घनदाट रान ओलांडून पर्लकोटा नदीचा विनाकठड्याच्या पुलावरून भामरागडमध्ये दाखल झाली. वरातीनंही बोदभरले ट्रकचे डोलारे जाऊ देऊनच भामरागड गाठलं होतं. ''ही कसली वराती?'' असं वाटलं होतं चार चौघांना. तरीही सारे गपगुमान राहिले.

भामरागड कशी तरीच वस्ती, हेमलकसाहून पुढे ह्या वस्तीचं कसंतरीपण सुरू होतं आणि ते तसंच राहतं. सांडपाणी रस्त्यावर, गुराम्हशींचे रस्त्यावरचे शेणाचे सुके-ओले पोवटे, एखादी जुनाट बस, दोन-चार ट्रक, काळीपिवळी, एखादी पांढरी टाटासुमो आणि त्यातून चौफेर काकदृष्टीनं फिरत असलेले गणवेशधारी सशस्त्र पोलीस... चहाच्या टपऱ्या, उकळता चहा, गॅस-स्टोव्हचा धूर, सूर्यप्रकाश हे सारं कासावीस करीत जात असलेले.

माणसंही अशीच कातावलेली, जीवनाचा कर्तव्याभिमुख कवडसा भोग म्हणून भोगत असलेली माणसं, कर्मचारी, पोलीस आणि सारं गुमान, चिडीचूप, गप्पगार. त्यातही आळसावलेपण असलेले नक्षलग्रस्त गाव म्हणजे भामरागड.

त्या तिथे लियाकत हुसैनची वरात नऊ-साडेनऊच्या सुमारास येऊन पोहचली. एका पडक्या शाळेत दाखल झाली. वरातीच्या टाटासुमो बेशिस्तीनं उभ्या राहिल्या. लियाकत हुसैन मोठ्या आनंद, उत्साहानं शामियान्याच्या आत असलेल्या लाल फायबर खुर्चीवर जाऊन बसला. मित्रांनी त्याची बडदास्त ठेवायला सुरुवात केली.

लियाकत हुसैन असेल बावीस-चोवीसचा तरुण. अहेरीत कुंभारवाड्यात हलता, डागडुजी न झालेला पानठेल्याचा मालक, चालक.

''सलाम वालेकूम!'' कुणीतरी म्हणून गेलं.

त्यानंही ओळख-अनोळख न पाहता सलाम स्वीकारला आणि उजव्या हाताच्या मनगटाला बांधलेला मोगऱ्याचा गजरा हुंगला. काजळ भरले त्याचे डोळे अधिकच काळे दिसत होते.

''भाईजान चाय.''

सलाम करणाऱ्या एका तरुणानं चहा आणला आणि त्याला दिला. लियाकत हुसैननं ऐटीत चहा संपवला अन् वरातीच्या थांब्यावर पोलिसांची जीप येऊन थांबली. त्यांची लगबग आणि गती पाहून लियाकत हुसैनची बोबडीच वळली. ''क्या बात है?'' त्यानं शंका मनातच व्यक्त केली.

चार मशीनगनधारी पोलीस जीपमधून उतरले. सरळ लियाकत हुसैनच्या खुर्चीजवळ जाऊन विचारते झाले. ''क्या आप में कोई बडेबुजुर्ग है?''

''जी हाँ! क्यों क्या बात है साब?''

लियाकत हुसैन गडबडत म्हणाला.

''उन्हेही बतायेंगे.''

अवतीभवती त्याची बडदास्त ठेवणाऱ्या मित्रांना तो म्हणाला, ''जरा मामू को बुलाओ.''

''जी!'' म्हणत त्यापैकी एक गेला.

''क्या बात है साब?''

''बताईंगे... जरुर बताईंगे... लेकीन उन्हे... आपको नाही...''

''क्यों?''

''इसका जबाब हमारे पास में भी नही है...हमे जैसा कहाँ गया है, वैसेही करेंगे...आपको मराठी आता है?''

''हाँ, काय झालं साहेब?''

''सांगतो...''

साहेबांचा आवाज गारठल्यासारखा होता. वाळू निसटतेय मुठीतली अशी भीतीच होती जणू. साहेबही भीतीनं डवरलेले, शहारलेले, भीतीचा काटा अंगावर फुललेला.

मामू आले. पोलिसांनी बोलावलंय् म्हटल्यावर वरातच्या वरातच तिथं गोळा झाली. काहीतरी कुठंतरी उसवलं होतं. नक्षल्यांच्या दाट भीतीचा हा भाग. कुठंही, काहीही घडू, घडविल्या जाणारं इथलं पर्यावरण, पर्यावर्णीय घटित ओरखडा मनावर उमटवीत, समाजाची घडी विस्कटणारी इथली भयसंस्कृती. दुर्बोध आणि क्लेशदायी.

''पहा, आता आता भामरागड पोलीस मदत केंद्राला संदेश आलाय, छत्तीसगड सीमेकडून महाराष्ट्रात येणाऱ्या वरातीला नक्षल्यांनी उडवलं आहे. बारा निष्पाप जीव गेले त्यात. क्रूर आणि क्रूर थट्टा आहे ही जीवनाची. जीवन हे असं सहज साध्या, सोप्या पद्धतीनं संपवलं जातंय. जीवन असं चिरडलं जातंय. सावध रहा. तुमची सगळ्यांची नावं आमच्या माणसाकडे द्या. लग्न लवकरात लवकर आटोपा आणि दिवस बुडायच्या आधी कसंही करून आलापल्लीपर्यंत पोहचा. तुम्हाला काही झालं तर आम्ही काहीही करू शकत नाही. आलं लक्षात?''

पोलीस बोलत होते, त्याकडे सारेजण जीवाचे कान करून ऐकत होते. भीतीचं सावट साऱ्या वरातीवर पसरलं. सारे मरणभीतीने उदासले होते. अनिश्चितता जीवनाचा एक अकल्पित डाव असतो. कधी काय होईल हे सांगता येणार नव्हते, सारे भीतीनं थरारले होते.

''लवकर लग्न आटोपा आणि आपल्या गावाकडे निघा.'' साहेब पुन्हा बोलले.

''हम समझ सकते है.'' एक बुजुर्ग मध्येच बोलला.

घाई होऊ लागली. लियाकत हुसैनच्या मनोराज्यावर अकल्पितानं अशी कुरघोडी केली होती. त्यानं गजऱ्याकडे पाहिलं. तो कोमेजला होता. त्याला हुंगावासा वाटला नाही. सापच हुंगून गेला होता साऱ्या वरातीला.

ही बातमी नवऱ्या मुलीच्या वडिलाला कळली. पोलीस नवरदेवाशी बोलत असल्याचे कळले आणि धावतच त्यानं ते स्थळ गाठलं. सलाम घ्यायलाही विसरला तो घाईघाईत. येताच म्हणाला,

''क्या हुआ?''

सगळी हकिकत कळल्यावर तो हतबद्ध झाला. ''चलो, जल्द निकाह कर हमें रवाना करो.'' कुणीतरी त्याला समजावलं.

''इन्शाअल्लाह'' करीत तो घराकडे पळतच गेला. साऱ्या वरातीत हीच चर्चा होती. पाखांजूरची वरात कुणाची? काय दोष होता वरातीचा? सकाळी सातच्या सुमारास इतका भीषण हल्ला कसा करू शकतात हे लोक? इतक्यात नक्षली उत्पातांची संख्या किती वाढलीय? कोणाचीच डोकी ठिकाणावर नाहीत काय? खरं म्हणजे स्फोटांनी निर्दोष जग हादरवून सोडण्यामागचं कारण काय? स्फोटांच्या मालिकाच मालिका घडताहेत त्याचं काय? कोण देईल या प्रश्नांची उत्तरं? सरकार, पोलीस की खुद्द नक्षली? कोणाला काय

अनुक्रमणिका

देणंघेणं सामान्यांशी? आम्ही असेच भरडले जाणार का? आमची गत अशीच वाऱ्यावरच्या असंबंधित पाचोळ्यासारखी राहणार का? चर्चेला ऊत आला होता. चर्चा विवश आणि अधिक विवश होत गेली.

अगतिक वरातीनं कसंबसं लग्न लावलं. नवऱ्या मुलीच्या आग्रहानं घाईगडबडीनं जेवणं आटोपली. पाठवणी करणार इतक्यात अजून एक बातमी येऊन थडकली. जवळच्याच रानात पोलीस-नक्षली यात चकमक उडाली. दोन पोलीस गंभीर जखमी आहेत. ढोलांचे आवाज वाऱ्यावर तरंगत येत आहेत इतकी सहज आली ही बातमी. नक्षली दहशतीनं थरकाप उडाला.


''आता कसं?''

''रुख जाओ आप लोग यही पे!''

कुणीतरी बुजुर्ग अव्यवहारी बोलला.

''नही, यह कैसे हो सकता है, अभी एक बजा है, निकल जायेंगे हम लोग.''

''याऽऽ मेरे खुदाह'' नवऱ्या मुलीच्या आईनं खुदाला याद केलं.



वरात भामरागडच्या मध्य चौकात आली. वरातीच्या गाड्या अहेरीकडे तोंड करून उभ्या होत्या. संपूर्ण भामरागडला छावणीचं स्वरूप आलं होतं. सशस्त्र पोलीस दल अक्षय दक्षता आणून पाळत राखत होते. वरातीच्या गाड्या तपासल्या गेल्या. काही जुजबी चौकशी झाली आणि ''जाने दो''चा इशारा झाला. पोलिसांचा थकवा आणि रुबाब दणाणून सोडत होता. आममाणूस वाचा बसल्यागत निमूटपणे हे सारं पाहात होता.

लियाकत हुसैन घाबरून गेला होता. पोरवय - लग्न लवकर होत होतं. त्यात अशी बनचुकी नियती आडवी आली होती. नियतीचा हा रंग त्याच्या वयाच्या समजेपलीकडचा होता. त्याची नवीनवेली बेगम नटण्यामुरडण्याऐवजी भीतीनं डवरून निघाली होती. दुपार एक-दोनच्या घटकेचा ग्रीष्म. तिला भरदिवसा चांदणं दिसू लागलं. तिचं मन थाऱ्यावर नव्हतं.

''काय नशीब!''

पण नशिबाचीच बात होती काय?

विचारांचं युद्ध म्हणे हे! आणि दळलो जातोय ते आपण... तिनं आपल्या नवऱ्याकडे डोळ्यांच्या कोनातून पाहून आपला घुंघट ओढून घेतला. गाड्या निघाल्या. उन्ह भरीस भर आलं होतं. लियाकत हुसैनला रानाशी बोलत यायला आवडलं असतं. पण त्याला रानाचा आनंद घ्यावासा वाटला नाही. गाड्या रान कापत पुढे जाऊ लागल्या.

मेडपल्ली आलं. तिथं रस्त्यावर पोलिसांचा सशस्त्र ताफा उभा होता. त्यांनी गाड्या तपासल्या. गाड्या पुढे जात होत्या. पाखांजूरच्या रानात वरातीच्या गाड्या उडवल्या. बारा निष्पाप जीव संपले. चिंधड्या झाल्या. तसं आपलं झालं तर? आपल्याही गाड्या चपेटीत येतील तर? मरण तसं दाखल झालं तर? अंगावर काटा येत होता. लियाकत हुसैनच्या मनात काहूर उठलं होतं.

गाड्यांनी आलापल्ली गाठलं आणि लियाकत हुसैननं निःश्वास टाकला. लग्नाच्या भरदिवसा काळी रात्र भरून आली होती. त्याचा अंधार हटला होता. वरात येऊन पोचली त्याच्या अंगणात... साऱ्यांनी परवरदिगंबरला याद केलं.

वलीम्याचा दिवस होता. सकाळच.

तयारीला वेग आला. कर्त्या माणसांची लगबग पाहून सारे मदतीला उत्सुक होते. वर्तमानपत्राची लियाकत हुसैन मोठ्या आतुरतेनं वाट पाहात होता. त्याचा पानठेला आज उघडणार नव्हताच. तिथं टाकलं जाणारं चार रुपयाचं वर्तमानपत्र कुणीतरी त्याच्या हातात आणून कोंबलं. पाखांजूरची अमानवी हिंसा आज सचित्र झळकणार होतीच. शीर्षकावरून भिरभिरती नजर टाकून त्यानं वृत्त वाचलं.

अलीकडे पोलीस नक्षल्यांना ओळख पटू नये म्हणून पांढऱ्या टाटासुमोतून गस्त घालू लागले होते. वरातीला पोलीसच समजून स्फोट घडवून आणले गेले. टाटासुमो वीस-बावीस फूट उंच उडून क्षतिग्रस्त झाली. त्यात बारा जणांचा मृत्यू झाला. मरण पावलेल्यांमध्ये समावेश असलेल्यांची नावं आणि वय.

अनुक्रमणिका

"मला काही झालं असतं तर? माझंही नाव जगानं असं सहज औदासीन्यानं वाचलं नसतं का?" असा प्रश्न पडला त्याला. नक्षली आणि पोलीस यांच्या द्वंद्वाला चिरंतन उत्तर हवं होतं. जे कोणाहीकडे नव्हतं. तो निराश झाला. आत्मसंवादाला गती आली होती त्याच्या.

संध्याकाळी वलीमा भरीस आला. मामू महत्त्वाचा कर्तापुरुष म्हणून साऱ्यांच्या डोळ्यांत भरत होता. तो लियाकत हुसैनच्या जवळ आला आणि म्हणाला,

"क्यो बेटे?"

"मुझे उन बारा लोगों की याद आ रही है मामू."

गदगदून लियाकत हुसैन म्हणाला, "मुझे भी."

मामू म्हणाला.

"क्यो मालूम है?"

"नही."

"आपकों क्यों गदगदा रहा है, मालूम है?"

"नहीं."

"मुझे एहसास हो रहा है।"

"एहसास की ही बात है यह..."

मामू जड अंतःकरणानं म्हणाला.

जाणीव... त्यांच्या ठिकाणी आपण असतो तर... जी जाणीव लियाकत हुसैनच्या डोळ्यांतून सांडत होती त्याला गदगद करून सोडत होती. त्याला निःशब्द करीत होती. कुरतडत होती. आढ्याला कवटाळून रडत होती.

• • •

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्‌मयीन नियतकालिक 'युगवाणी'बद्दल वार्षिक निवेदन

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाची मालकी व इतर बाबी यांच्यासंबंधी वृत्तपत्रे आणि पुस्तक नोंदणी अधिनियम, कलम डी १९(बी) आणि वृत्तपत्रे नोंदणी (केंद्रीय) नियमावली १९५६, नियम, ८, नमुना ४, यांना अनुसरून केलेले निवेदन.

०१. **प्रकाशनस्थळ :**
नागपूर, महाराष्ट्र

०२. **प्रकाशनाची कालनियतता :**
त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)

०३. **प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता :**
विलास गंगाधर मानेकर, भारतीय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, नागपूर - ४४० ०१२.

०४. **मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता :**
माधव प्रकाश लोखंडे, भारतीय, मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर - ४४० ०२२.

०५. **मुद्रणस्थळ :**
मलय ग्राफिक्स, सुभाषनगर, नागपूर - ४४० ०२२.

०६. **संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता :**
अनिल सेवकराम नितनवरे, भारतीय, 'जातक', स्नेहनगर, नागपूर मार्ग, भंडारा-४४१ ९०४.

मी विलास गंगाधर मानेकर, असे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

विलास गंगाधर मानेकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर (प्रकाशक)

अनुक्रमणिका

कविता

सुनीता झाडे यांच्या पाच कविता

१

हाडाचा योगी

हाडांच्या घरात गच्च गर्दीतील मांस म्हणजे शरीर
शरीर कोवळं, शरीर प्रौढ
शरीर म्हातारं होत चाललेलं...
त्वचेला सोडून मोकळे होत जाणारे सांधे
पांथस्थ
सैल पडत चाललेलं मांस
चेहऱ्यांवरील कवटीचा आकार स्पष्ट दिसू लागलेला
त्या कवटीला काजळ, लिपस्टिक लावलेल्या बाया
दाढी घोटलेल्या लोंबत्या गालावर पावडर लावलेले पुरुष
खालच्या त्वचेला वर सरकवत
घट्ट बांधत
सारा खेळ मातीचा मातीसाठी
हयातीत हाडं तेवढी शिल्लक
फुलं म्हणून घेण्यासाठी

शेवटपर्यंत हाडाच्या या योगीयासोबत
आत्मधून साधता येत नाही...

• • •

२

शब्दांच्या पसाऱ्यातील अर्थांच्या आत्महत्या

सभोवताली शब्द आहेत, फक्त शब्द
वेगवेगळ्या विषयांचे, वेगवेगळ्या विचारांचे, व्यक्तींचे
आम्हाला वाचा, आम्हाला वाचवा म्हणत
वेगवेगळ्या जाती, धर्मांचे, पंथांचे...
काहीही उघडा
बाहेर पडण्यासाठी दबा धरून बसलेले
बदा बदा सांडायला लागतात
एकमेकांच्या माऱ्याने रक्तबंबाळ
आपापल्या विचारयुद्धात
शहीद होत असलेल्या सैनिकांसारखे
काही जखमी
काही अपंग
काहींची मुंडकी छाटली गेलेली
तरीही वळवळत, विव्हळत, व्याकूळ होत
वाचवा
शब्दांच्या
पसाऱ्यातील
अर्थांच्या
आत्महत्या...

• • •

अनुक्रमणिका

३.

फक्त बाई व्हायचं होतं...

मी खूप दिवसांत बाई होत होते
... या बहुलिंगी आयुष्यात
बहुधर्मात
माझ्या वाटच बाईपण कसं?
पण सरलं मिटलं
मी समोरून एक बाई
आतून पुरुष
अशा संसारात नांदत...

या भिंतींना
माझ्यातलं बाईपण पोसणं
परवडण्यासारखं नव्हतं
एकच टाळी होती वाजवायला
म्हणून मग
एका हाताने टाळी वाजवत
बाजार मागत मीही...

मी खूप दिवसांनी बाई होणार होते
गहिवरून चिंब होत
ओथंबून पाझरत
सळसळत वेडावत
सुसाट तुझ्यापर्यंत...

तसा पायबंद घालत
बांधल्या शब्दांत पुरुष उवाच
मला तुझ्यातील ती
कणखर पुठ्ठ्याची स्त्री हवीय
प्रेमासाठी अशी व्याकूळ, विव्हळ
असहाय, लाचार, लेचीपेची स्त्री नकोय

मी...

मला खूप दिवसांत फक्त बाई व्हायचं होतं.

• • •

४.

भूक

कोणीतरी पाहावी
कोणालातरी दिसावी
मायेची भूक
मायेला पारखा असलेला जीव
मायेसाठी किती माया पेरतो
पण पारखला जातो प्रत्येक वेळी
व्यवहारात

घट्ट बिलगण्याच्या विषयाचे
कधी वासनेत रूपांतर होते?

त्याच्याकडून सुरू झालेल्या कहाणीला
तेच तिथेच कापत अगदी धीमेधीमे

आपण फक्त दाराशी घुटमळत
सहजीवन सहचर्याचे
छत्तीस कोटी अर्थ पोटात दडवून उभे
पण पाठीवरून हात फिरेलच
असे नाही
मग पोटातला जीव
नुसताच कातडीतून थरथरत

कितीदातरी ऐकते
काय लहान मुलांसारखे करतेस
तर ते लहान मूल
शरीराचा पडदा खसकन सरकवत
'आत हो!' म्हटल्यागत हिरमुसलेलं
पोरकं वाटतं फार
कुणी कुणी माया करीत नाही म्हणत
गुडघ्यात मान खुपसून रुसून

मनवेल कोण?

मायेच्या भुकेखाली झालेल्या चुकांना
माफी नाही दोस्त...

• • •

अनुक्रमणिका


५.

तुझे ओठ आठवले की...

तुझे ओठ आठवले की, जिवंत होतं मन
काळजात विजेची लकेर उठत, ओठांत दाटते
ओठांत घुसमटून फुटलेला एक अस्फुटसा आह
अबिलग ओठांची थरथर, थरारता समाधी भंग
अशा वेळी कुठे असतोस तू?
जाणवत असतो का तुलाही हा दाह प्रवाह...
उत्तरं द्यायला नसतोसच कुठे तू
तुला शोधायचं म्हणजे डोळे मिटावे लागतात
मग सैरभैर मन तुला शोधण्यासाठी झप झप
एक पाऊल इकडे, एक पाऊट तिकडे देत,
इथे-तिथे पण इथेही नाहीस तू तिथेही...
कधी हाती लागला नाही, कधी हाती लागत नाहीस तू

तुझ्या ओठांच्या मिठीत बिलगलेल्या क्षणापुरता राहिलास
आणि तेवढाच उरलास...

• • •



अनुक्रमणिका

किशोर कवठे यांच्या सहा कविता

कोलमाईनच्या कविता

१.

रहीमकाका आणि बकरी

कळपात भरकटलेली
रहीमकाकाची बकरी
घराचे दार शोधत
गेली कोलमाईनच्या बोगद्यात
बोगदा
'आ' वासून पहुडलेला
माणसांची वाट बघत...


केव्हाच संपला त्याच्या पोटातला कोळसा
बुजवायचा राहून गेला अनवधानाने
बदफैली पाण्याने मांडले ठाण
बोगद्याच्या तोंडाला सुटले अहंकाराचे पाणी
बकरी बोगद्यात झाली दीनवाणी.

कळपात भरकटलेली रहीमकाकाची बकरी...

रहीमकाकाने घेतला कानोसा
बोगद्याच्या आजूबाजूला साशंक
रहीमकाका गेला बोगद्याच्या दिशेने
खोल खोल ओल्या मातीत रुतत
आणि तोही गडप

पहिले बकरी
नंतर रहीमकाका
बोगदा
'आ' वासून पहुडलेला
माणसांची वाट बघत
अर्थहीन डोहासारखा...

•••



अनुक्रमणिका

२.
दगान

पटापट पडतात घरातील भांडे
थोडा वेळ आपणही हलतो
भूकंपाचे धक्के बसल्यागत...
वाटतो झाला असावा एखादा बॉम्बस्फोट
जेव्हा होते दगान

भुईच्या काळजाला
पडतात भेगा
अंकुराचा मागमूसही नसतो सभोती

कौलारू घरांची हलतात कौले
दुपारच्या भांडणाचा होतो भास
बिनदिक्कत उभ्या असणाऱ्या भिंतींना
पडतात चिरे
जेव्हा होते दगान

पूर्वेचा तांबडा सूर्य
मारतो थाप दारावरती
डोकावतो किरणांच्या स्वप्नांनी
भिंतींच्या चिऱ्यातून
काही काळ पसरते कवडशांचे गाव
अन्
उंबरठ्यात पुन्हा सुरू होते
रोजमर्रा जिंदगीची दगान...

• • •

३.
एक खाणग्रस्त

'जिसकी गई है खेती
वह उठा रहा है मिट्टी
जिसने खोया न कुछ भी
वह खाये तूप रोटी'
अशी वल्गना करीत जाणारा
एक फकीर
आमच्याच मोहल्ल्यात थांबला
मी म्हणालो,
'अशी गाणी गाऊ नकोस
लोक हातात तलवारी घेतील
इथे सांडेल रक्त
आपापसात उभ्या करतील भिंती
बंद पडेल जिंदगीचे व्यवहार'

तो म्हणाला,
'मी त्याचीच वाट बघतोय
पण तसे झाले नाही
हित उराशी बांधून
मृत्यूला कोणी कवटाळले नाही'

नंतर मी स्तब्ध तोही स्तब्ध

नजरेआड होता होता
तो पुटपुटला
'मी मातीची झूल पांघरलेला
एक खाणग्रस्त'

• • •

४.

बगळे आणि कावळे

पांढऱ्या शुभ्र बगळ्यांनी केलीय वस्ती
एकल नृत्य करणाऱ्या चिंचेच्या झाडावर
आधीच तिथे कावळ्यांनी थाटले होते
आपले उथळ संसार

अलीकडे बगळ्यांत आणि कावळ्यांत
फारसा फरक शिल्लक राहिला नाही
येथील ब्लॅक डस्टमुळे

बगळ्यांच्या पंखांना आलेय काळेपण
बगळे झटकत असतात ब्लॅक डस्ट
आपल्या पंखांतली

कावळ्यांना ती सोय नाही अजून तरी

आताशः
बगळे आणि कावळे विरोध करीत नाहीत
एकमेकांचा
राहतात एकाच झाडावर
सामीलही होतात एकमेकांच्या सुखदुःखात

कावळ्यांनाही बगळ्यांच्या दर्पविष्ठेची
सवय झालीय
आणि बगळ्यांना कावळ्यांच्या कर्कशक आवाजाची

• • •

५.

बाया आणि काळा कापूस

बाया झाडताहेत
रस्तावरील धूळ
नुकतीच कोल वॉशरीतून उडत उडत आलेली

पिकांवर, शरीरावर, मनावर केलाय ताबा तिने
पाण्याच्या काही थेंबांनी होताय
भवताल खपल्या न दिसणाऱ्या आतील जखमांवर

हिरव्या बोंडातून येणारा पांढरा कापूस
काळा पडलाहे रोजच्या धुळीने
बेभान खरीदल्या जात आहे
पिकांच्या काळ्याशार राशी

डोक्यातही डेनड्रप करू पाहात आहे कायम वसाहत
नीट खाजवता येत नाही डोळ्यांच्या पापण्या
शाम्पूंच्या पुड्या आणि ब्रँडेड कंपन्यांचे गॉगल्स
बेतुके पडले आहेत धुळीच्या कणांपुढे...

कोल वॉशरीमुळे खुंटत चाललंय
पीक, शिवार आणि आम्ही

तरी बायांना याचा मागमूसही नाही
त्या झाडताहेत रहदारीचा रस्ता
पुन्हा पुन्हा...

• • •

अनुक्रमणिका

६.

प्रत्येक माणूस झाला कारखाना

ह्या नगरातली माणसं
शेकून घेत आहेत सर्वांग
आळीपाळीने
धिम्या गतीनं जळणाऱ्या
कोळशालाही माहीत नाही
त्याचे काय होऊन राहिले म्हणून

हवेच्या स्पर्शाने फ्लाय ॲश उडते सभोवती
तरुण तुर्कांच्या आईलीश केसांवर
बसतात धुळीचे कण
अकाली वृद्धत्वाचे तरुण चेहरे
अस्वस्थ करीत आहेत वर्तमान

मी काय बघतो आहे
आजूबाजूला कारखान्यांचा बेसावध विस्तार
हे माणसांचे शहर आहे की
कारखान्यांचे
कळायला मार्गच उरला नाही
तूर्तास

दर शंभर मीटरवर दवाखाने आणि डॉक्टर
हातात सलाईन घेऊन उभे आहेत
प्रत्येक नव्या पेशंटच्या स्वागताकरिता

श्वास गुदमरतोय येथे
विचारांचं पटापट होत आहे ॲबॉर्शन
आवाजाने फाडलेत मन आणि मेंदू
धुळीने बुबुळावर फडकला लाल झेंडा


आवाज घोगरा बेताल
मौन स्वरांनी भागवली तहान
सारेच कसे सुसाट पळतात
मरेथान स्पर्धेत फोरलाईनवरून

धूळ खातात धूळ हागतात
पेपर मिलचे पाणी पितात
पाण्याचा टी.डी.एस. किती?
केमिकल किती?
सर्वांच्या जीन्समध्ये आलेत
कारखान्याचे गुणधर्म

आता प्रत्येकच माणूस झाला आहे कारखाना
अंगात वीज असेपर्यंत धडपडत राहणारा

जितका भणंग तितका भयानकही
आणि
संवेदनशून्य...

• • •



किशोर कवठे, विद्यानगरी, बामणवाडा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर

अनुक्रमणिका

प्रशांत पनवेलकर यांच्या चार कविता

१.
ओढ

आली कुंतलाला लय
सांज पाझरली सये
स्पर्श हलका बोलका
गंध शहारला बये

नदी नागमोडी जाय
नाद खळाळला कानी
खळी हसताना का ते
येई डोळ्यांमध्ये पाणी


क्षण ओले कसे झाले
कुणी पाहिले का दव
कुठे झळकले जळ
ऐकू येऊ पाहे रव

कवटाळताना वेली
खोडा प्रणयाचा स्पर्श
भृंगरव पद्मालयी
होई संध्येलाही हर्ष

कुणी पुकारली शीळ
पदर उडू पाहे बाई
वारा वाचाळ जातीचा
जगा सांगे काहीबाही

नभ उजाडले डोई
बये संपेना गं तृष्णा
गाई वना गेल्या तरी
राधा वेढू पाहे कृष्णा

• • •



२.
अस्तित्व

पाखरांची किलबिल
तो दोहोतानाचा ध्वनी
पाचोळ्यांची किरकीर
सत् अस्तित्वाची गाणी

वाऱ्याचा वाहता देह
पृथ्वी इतकाच जुना
त्या प्राचीन स्पंदनात
माझ्या अस्तित्वाच्या खुणा

नच दृश्य हवा तरी
रानात हालते पान
अदृश्याच्या अस्तित्वाचे
श्वासात फुलते गान

• • •

अनुक्रमणिका

३.

का दव उमटत नाही!

करून कागदी होडी
सोडली गोंदून नाव
पाण्याने चोळले मीठ
तरंगून आले घाव

घायाळ झालेल्यांपैकी
लाटेने फेकले काही
राखली तयांनी लाज
ज्यांची न भिजली शाई

जे जे थेंब झाली बाष्पे
ते आकाशी सामावले
न झरताच डोळ्यांनी
खूप काही गमावले

हे असेच गमावणे
सोसेल का ओहोटीला
का पडत नाही दव
अळवात पहाटेला?

• • •

४.

ओल

येता मिरगाचे थेंब
मृदा मोहरली सारी
गंध लुटला वाऱ्याने
तृप्त परतल्या घारी

झाडबोली ओली ओली
बुंधा ओलावला बरा
मेघ मल्हाराचा शब्द
ओला आला सये घरा

कोण्या गवयाचा गळा
मैफल मेघावली सारी
भाषा सतारीची रानी
मोर केकावली दारी

ओल्या कुंतलाची आण
बट अशीच ढळू दे
छेड पावसाची होती
द्वाड वाऱ्याला कळू दे

मेघ ओला काळा दूत
कोण्या चालला वं गावा
डोळा गर्भार लेकीचा
फडफडला गं डावा

• • •

प्रशांत पनवेलकर

अनुक्रमणिका

श्रीपाद कोठे यांच्या पाच कविता

१.

मिठाची बाहुली

मिठाची बाहुली
जाय सागरात
मोजावया खोली
समुद्राची

कसली बाहुली
कशाची ती खोली
त्यात विरघळे
आपोआप

तशाच या इच्छा
मनात येउनी
जातात विरोनी
सहजच

होते एकरूप
समुद्र बाहुली
तैसे मन-इच्छा
होतातची

उरेना काहीच
वेगळे बरवे
एकातून दुजे
येणेजाणे

• • •

२.

ओंडका

वसा ओंडक्याचा
कसा दूर सारू
ललाटी असे जे
त्या, कैसे अव्हेरू ?

कुठे जावयाचे ?
कुठे जात आहे ?
प्रवाहास ठावे
मला काय त्याचे ?

कुणी सोबतीला
येऊन मिळती
अकस्मात आणि
कुठे दूर जाती

क्षणांचीच नाती
क्षणांचा पसारा
प्रवाहास नाही
कुठेही किनारा

असा ओंडक्याचा
वसा लाभलेला
हवासा असो वा
नकोसा जरी हा

• • •

अनुक्रमणिका

३.

काजळशाई

काळीज कुस्करून काढलेली
काजळशाई
कवितेच्या हाती देताच
कवितेने
कुंचला शाईत बुडवला
कागदावर फिरवला,
कोऱ्या कागदाने
काळोखाच्या शपथा
कोरून घेतल्या
कागद काळा झाला
कालकूट प्राशन करून

• • •

४.

मेंदू आईनस्टाईनचा

कधीतरी,
आईनस्टाईन म्हणाला होता -
पाण्यात पोहणाऱ्या माशाची तुलना
आभाळी उडणाऱ्या पाखरांशी नका करू
आणि तो हेही म्हणाला होता-
आजची शिक्षण पद्धती तेच करतेय...
याने मासा राहणार नाही मासा
पक्षी राहणार नाही पक्षी
दिला होता इशारा त्यानेच;
आम्ही अभ्यासक्रमात
समाविष्ट केला
त्याचाच एक पाठ
आणि शिकवू लागलो
आपल्या मेंदूपेक्षा
कसा वेगळा होता
मेंदू आईनस्टाईनचा
सगळ्या माशांना आणि पक्ष्यांना...
• • •

५.

अज्ञात झऱ्यावर

अज्ञात झऱ्यावर
अबोल पक्षी येतो
अंधार दाटताना
आभाळ होत जातो...

अश्रूत गोठलेल्या
आलाप, सूर, ताना
अक्षय्य आर्ततेने
ओंजळीत धरतो...

आता तरी सरू दे
अंधारयुग माझे
आवाज देत ऐसा
ओढ्यास सोपवितो...

आवेग दाटुनिया
ओढा उचंबळे तो
आसावल्या दिठीने
अश्रूत साठवितो...

अश्रूस आवरेना
आकाश त्या पुरेना
अवकाश पाखराचा
आता कुठे उरे ना...

अद्भुत त्याच वेळी
आली उरात हाक
आकाश शब्द बोले
आलो पाहा मी खास...

आवाज ऐकता हा
आल्हाद त्यास झाला
अद्वैत विठ्ठलाचा
अलवार भास झाला...
• • •

अनुक्रमणिका



। ग्रंथचर्चा

‘उद्या’
भल्या पहाटेचे दुःस्वप्न

अनुराधा मोहनी

‘उद्या’ ही नंदा खरे ह्यांची नवी सामाजिक कादंबरी. नंदा खरे हे व्यवसायाने सिव्हिल इंजिनीअर, वृत्तीने शास्त्रज्ञ, त्यांच्या शैलीत सांगायचे तर शास्त्री. अर्थशास्त्री, समाजशास्त्री, व्यवसायामुळे वा अन्यथाही - भूशास्त्री, उत्क्रांतिशास्त्राचे अभ्यासक आणि महत्त्वाची ओळख म्हणजे लेखक. त्यांची दहा पुस्तके व त्यांमधील अंताजीची बखर, बखर अंतकाळची, नांगरल्याविण भुई इत्यादी कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांमध्ये त्यांनी अनुक्रमे पेशवाईचा ऐतिहासिक कालखंड, पेशवाईचा अंत आणि ब्रिटिश सत्तेचा उदय, कॉम्प्युटर भारतात बनले असते तर... असे विषय हाताळले आहेत. कादंबरीलेखनासाठी त्यांना भाऊ पाध्ये पुरस्कारही मिळाला आहे. परंतु हा आपला आजचा विषय नाही. त्यांच्या विद्वत्तेची, आकलनाची आणि उपयोजनाची व्याप्ती समजावी म्हणून हा थोडका परिचय.

तर ‘उद्या’ ही त्यांची सगळ्यात अलीकडची कादंबरी, जी जानेवारी २०१५ मध्ये प्रकाशित झाली. नावावरून लक्षात येते त्यानुसार, उद्याचे जग कसे असेल त्याचे, एका प्रतिभावान लेखकाच्या प्रज्ञाचक्षूंनी पाहिलेले चित्र त्यांनी ह्या कादंबरीत रेखाटले आहे. हे चित्र अत्यंत भीषण, भयावह आहे. माणसाचा आपल्या शरीरावर, आयुष्यावर, आपल्या स्वप्नांवरदेखील हक्क नाही. प्रत्येक ‘उद्या’ जसा ‘आज’च्यावर आधारलेला असतो, तसाच हा कादंबरीतला ‘उद्या’देखील वास्तवातील ‘आज’च्यावर उभा आहे. ह्याचा अर्थ असा की आज त्याची सुरुवात झालेली आहे. काही अंतरही पार झालेले आहे. हे असेच चालत राहिले तर येणारा उद्या फार कठीण आहे.

लेखकाने सुरुवातीच्या अर्धेपान मनोगतामध्ये व्यक्त केल्याप्रमाणे, हे एक दुःस्वप्न आहे. समजदार, विचारी माणसाला, आजवरून उद्याचे अनुमान काढू शकणाऱ्या माणसाला पडणारे, सतत पडत राहणारे, त्याचा पिच्छा पुरवणारे हे दुःस्वप्न आहे आणि इतरांना जर हे उमगत नसेल, आपल्याभोवती कोणते पाश आवळले जात आहेत हे त्यांना कळत नसेल, प्रगती, उन्नती, विकास, तंत्रज्ञान ह्यांच्यासारख्या शब्दांच्या मोहजालात अडकून ते आपला विवेक हरवून बसत असतील किंवा शोषित म्हणून जगत असताना अधिकाधिक खालच्या वर्गात ढकलले जाऊन सर्वहारा बनून संपून जात असतील तरी त्या दोन्ही वर्गांतील लोकांना त्यांच्या भविष्याची जाणीव करून देण्यासाठी, त्यापासून सावध करण्यासाठी लेखकाने हा लेखनाचा प्रपंच केला आहे. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, पुरेशा लोकांना ही पुढ्यातली परिस्थिती घाबरावायला लागली, तर ते ती टाळायला धडपडतील. नाहीतर आहेच, डिफॉल्ट ऑप्शन.

अनुक्रमणिका

सर्व्हेलन्स आणि घुसमट : कमीत कमी लोकांच्या हातात जास्तीत जास्त लोकांच्या नाड्या असणे, हा ह्या उद्याच्या जगातील मूलमंत्र. सर्व्हेलन्स किंवा पाळत ठेवण्याच्या माध्यमातून ते लोक हे घडवून आणतात. मुखपृष्ठच पाहा. अतिशय प्रखर दिव्यांचे झोत माणसावर टाकलेले आहेत. कॅमेरे लावलेले आहेत. सतत पाळत आहे त्याच्यावर. त्याला खाजगी आयुष्यच नाही.

त्याच्याखालोखाल आहे कंप्यूटरची बटणे. कंप्यूटर माणसापेक्षा अनेकपट वेगाने त्याची कामे करून देणारा, जगभरातील लोकांना क्षणार्धात एकमेकांशी जोडून देणारा, माहितीचा विस्फोट घडवून आणून स्पर्शमात्राने ती तुमच्यासमोर उलगडून दाखवणारा, भारताला एकविसाव्या, बाविसाव्या, तेविसाव्या शतकाकडे घेऊन जाणारा जादूगार. प्रत्यक्षात मात्र तो माणसाला माणसापासून तोडणारा, त्याचा खाजगी अवकाश संपवणारा, मोठमोठ्या कंपन्यांच्या हातातले बाहुले बनलेला असा आहे. कंप्यूटरमध्ये जे काही लिहिले जाते, ते ह्या साऱ्या सूत्रधारांना माहीत होते. तुमची कोणाबद्दलची मते काय, तुम्ही कसा विचार करता, कोणावर कशासाठी चिडता, कोणावर व कशासाठी प्रेम करता, हे सारे त्यावरून कळते. त्यानुसार तुमच्यावर लक्ष ठेवले जाते. तुमचा त्यांच्यासाठी कसा उपयोग करून घेता येईल ह्याचा विचार केला जातो. तुमचा जर त्यांना काहीच उपयोग नसेल आणि उपद्रव होण्याची थोडीही शक्यता असेल, तुम्ही त्यांच्यापेक्षा वेगळी मूल्यव्यवस्था मानत असाल, तुमचे काही वेगळे हितसंबंध असतील, तुम्ही त्यांच्याशी संघर्ष करण्याची तयारी ठेवून असाल तर ह्या कंप्यूटरच्या साहाय्याने तुम्हाला उडवण्याच्या योजना आखल्या जातात. कादंबरीच्या सुरुवातीलाच निवेदक सुदीप जोशी हा आवर्जून कागद व पेन वापरून लिहीत आहे का, तर कागदावरचा मजकूर अद्याप तरी त्यांच्या पाळतीखाली आलेला नाही.

कथा अनेक, व्यथा एक : 'उद्या' मध्ये संपूर्ण जगाचे प्रातिनिधिक चित्र असले, तरी त्यातील कथा मुख्यतः भारतातच घडते. जग जवळ आल्यामुळे, परदेशांचे संदर्भ सहजतेने येतात. कादंबरीचे कथानक वेगवेगळ्या वाटांनी सुरू होते व शेवटी एकात एक गुंफले जाते. अलगदपणे, पण पक्के. कारण शेवट एकच आहे - विनाश. अटळ विनाश. काहींना इच्छा असूनही जगता



येत नाही, तर उच्चशिक्षित, बुद्धिजीवी, सधन लोकांच्या आयुष्यात जगण्यासारखे काही उरलेलेच नाही. लोकसंख्यावाढ हा भयानक प्रश्न होऊन बसला आहे. सर्वांना पुरेशी संसाधने नाहीतच; पण त्याहून भयानक आहे, ती विषमता. 'मूल्यवृद्धी' हा इथला परवलीचा शब्द आहे. मला वाटतं, संपूर्ण कादंबरीत जास्तीत जास्त वापरलेला एक शब्द शोधायचा झाला, तर तो हाच असावा. ह्या मूल्याचा जीवनमूल्याशी काही संबंध नाही. मूल्य म्हणजे धन. पैसा, व्हॅल्यू ॲडिशन, माणसाची. वस्तूची, उत्पादनाची सगळ्याची मूल्यवृद्धी. पैसा मिळवायचा कसा, खेचून घ्यायचा कसा, टिकवायचा कसा, टिकवलेला वाढवायचा कसा, वाढवलेला पुन्हा टिकवून ठेवायचा कसा ह्याबाबत साम, दाम, दंड आणि भेद. पैशाचे मूल्य एवढे कमी झाले आहे, की तीनचार चहांसाठी दीडशे रुपये आणि एक वेळच्या रद्दी जेवणासाठी हजार रुपये द्यावे लागतात.

कादंबरीतील पहिलीच कथा मुंबई महानगरात घडलेली आहे. सुदीप जोशी एका अमेरिकन कंपनीत भाषांतराचे काम करतो. तसा तो जिंदादिल कवी, लेखक

अनुक्रमणिका

आहे; पण त्याच्या कामात काही राम नाही. एक दिवस त्याचे ओळखपत्र ऊर्फ अस्तित्व चोरीला जाते आणि विलक्षण बाका प्रसंग ओढवतो. त्या छोट्याशा प्लास्टिकच्या चौकोनी तुकड्यावर त्याचे जगणे अवलंबून आहे. त्याशिवाय त्याला ओळख नाही. ते स्वाइप न करता ऑफिसमध्ये येणे-जाणे, कँटीनमध्ये वा हॉटेलमध्ये जेवणे... काहीच शक्य नाही. ते परत मिळवण्यासाठी त्याला जंग जंग पछाडावे लागते, अनेक ठिकाणी अर्ज, अनेक लोकांना लाच, अनेक कामांसाठी बाबपुता करून लाचारी... सारं काही. कहर म्हणजे त्याचा काही संबंध नसलेल्या एका कोळ्यांच्या सेनेतही त्याला सामील व्हावे लागते. माणसाचे माणूसपण, त्याचे चैतन्य छाटून टाकून त्याचा केवळ एक चोवीस आकडी क्रमांक केला आहे इथल्या व्यवस्थेने!

पुढच्या कथेतील अरुण हा आयआयटीमधून आलेला आयपीएस अधिकारी आहे. एक्सप्रेशन ॲनॅलिस्ट. चेहऱ्यावरच्या भावांचे विश्लेषण करून त्यांचे अर्थ लावणारा. त्यासंबंधीचे कंप्यूटर प्रोग्रॅम बनवणारा माणूस. त्याची पत्नी अनू फायनान्स अँड लॉची तज्ज्ञ. जोडपे म्हणून ते सुखी आहेत. दोघांना चांगल्या नोकऱ्या आहेत. त्यांचे परस्परांवर प्रेम व विश्वास आहे. त्यांना एक मुलगाही आहे चांगला. पण... भोवताल सगळा बेभरवशाचा आहे. अविश्वासाचा आहे. माणसे म्हणून, दांपत्य म्हणून त्यांची बूज न राखणारा आहे. दुसरीकडे, पतिपत्नीला खाजगीपण न देणारे हे जग आपले सगळे व्यवहार मात्र अत्यंत गुप्तपणे करते. संदेशसुद्धा साध्या भाषेत पाठवत नाही. त्यासाठी वेगवेगळ्या, अधिकाधिक कठीण सांकेतिक भाषा निर्माण कराव्या लागतात. 'सुपर इनक्रिप्शन कोश'शिवाय बात नाही. इनक्रिप्शन म्हणजे प्रतिपक्षाच्या उपकरणांना, त्यांच्या संगणकांना वाचता येऊ नये अशा पद्धतीने इलेक्ट्रॉनिक संदेशांचे संकेतीकरण करणे.

तिसऱ्या कथेतील निवेदक सच्चिदानंद भाकरे हा साधा शाळामास्तर आहे; शिवाय मुलांना करिअर मार्गदर्शन, नैतिक शिक्षण वगैरे देऊन त्याने चांगल्या अर्थाने स्वतःची मूल्यवृद्धी साधली आहे. भयानक अपघाताने अपंगत्व येऊनही अत्यंत धीराने, चिकाटीने त्याने त्यावर मात केली आहे. पत्नीच्या बाहेरख्यालीपणाला उदार अंतःकरणाने क्षमा करीत घरटेही त्याने शाबूत ठेवले आहे. आपल्या होतकरू विद्यार्थ्यांना मोठे झाल्यावरही तो पाठबळ देत आहे. त्यांची प्रेमाने विचारपूस करून, वेळोवेळी चांगला सल्ला देऊन सांभाळून घेत आहे. असेही लोक आहेत त्या दुनियेत. अनेक आहेत. जीवाला जीव देणारे आहेत. पण शेवटी ह्या सगळ्यांचे काय होते? ते एका क्रूर, जगड्व्याळ व्यवस्थेचे भाग... खरं तर गुलामच आहेत. त्यामुळे त्यांच्या चांगुलपणाचा काहीही उपयोग होत नाही.

बॅचलर सुदीपला नातेवाईक एक बहीण आहे फक्त. तिचा नवरा व धाकटी मुलगी अचानक अपघातात गेल्याने त्याला गावी सांगलीला परत यावे लागते. (उद्याच्या जगात अपघात वगैरे आजच्यासारखेच होतात. एवढ्या पुढारलेल्या तंत्रज्ञानातही त्यांना काही चाप बसलेला नाही. रुग्णालय व्यवस्थाही सामान्यांना धार्जिणी नाही.) बहीण व तिची मोठी मुलगी ह्यांना मदत करण्यासाठी शेतीची कामे शिकून ती करत तो तेथेच राहतो. त्यातून मुंबईशी संपर्क तुटतो व तेथून काम मिळनासे होते. शेवटी मोठ्या मुलीलाही कुणाच्या तरी वासनेला बळी पडून जीव गमवावा लागतो. ह्या धक्क्याने आजवर धीर धरलेली बहीण आत्महत्या करते. तिचे वय असेल चाळीस. सुदीप शिल्लक आहे, पण तो आता कुठलाच नाही राहिला. - ना मुंबईचा, ना गावचा. धोबी का कुत्ता, न घर का न घाट का! अशी अवस्था. शेवटच्या प्रकरणाचे नावही तेच. कुत्र्याचेच जिणे आलेय जणू माणसाच्या वाट्याला.


सगळ्यांचेच आयुष्य उद्‌ध्वस्त होतेय आणि त्याच्या मध्यवर्ती आहे एक महाकाय कॉर्पोरेट कंपनी- भरोसा कॉर्प.

तर अरुण, अनू व त्यांची मैत्रीण स्मिता हे सर्वजण त्यांचे जुने आदरणीय प्राध्यापक दांपत्य बोससर आणि ब्लू मॅडम ह्यांच्याकडे भेटायला जातात. तेव्हा बोससर अल्झायमरने पीडित आहेत, तर ब्लू मॅडम भरोसामध्ये हेडहंटिंग करतेय. हेडहंटिंग म्हणजे चांगली गुणी माणसे त्यांच्यासाठी शोधून देणे. एकदा का तुमची निवड झाली, की तुम्हाला जावेच लागणार भरोसामध्ये. नाहीतर अत्यंत मचूळ बिनपैशाचे आयुष्य जगत बसा. ब्लू मॅडम सांगते, की तुम्ही तिघेही भरोसाला हवे आहात. त्यानंतर यथावकाश अरुण - अनू भरोसात रुजू होऊन गावीलगडात राहायला येतात. पण अनूचे मन त्या दगडी वातावरणात रमत नाही. त्यातून भरोसाला खरे तर अरुणच हवा होता, त्यासाठी आपला आमिषासारखा उपयोग केला गेला असेही तिला

समजते. ती तेथून बाहेर पडून पुन्हा सरकारी नोकरीत जाण्याचा खूप प्रयत्न करते; पण यश येत नाही. शेवटी अतिनैराश्यात येऊन ती आत्महत्या करते.

कादंबरीतील सगळ्यात कठीण, सगळ्यात निर्मम कथा आहे सानिकाची. ही कथा आपल्या मनातील माणुसकीचा शेवटचा अंकुरही तोडून टाकते. खरेच का इतका भयावह आहे आपला भविष्यकाळ? सानिकाचे, नागोदादाचे आणि इतर प्रामाणिक, कष्टाळू व निरागस चारगावकरांचेही जर हेच होणार असेल, तर काहीच मार्ग राहिलेला नाही आपल्याला वाचवायचा. अतिशय भयाण शेवट. ही कथा वाचून असे वाटते की कुठेतरी काळ्या ढगाला चंदेरी किनार राहू द्यायला हवी होती.

कादंबरीत काही गोष्टींचा अनुल्लेखाने सूचित केलेला अभाव आहे. उदा. संगीत, नृत्य, लोककला. संगीताशिवाय जनजीवन अत्यंत उजाड, भकास झालेले आहे. आणखी एक अभाव आहे, पण त्याचा स्पष्ट शब्दात उल्लेख आहे. तो आहे स्त्रियांचा. लोकसंख्या खूप वाढली आहे, पण 'मुलगाच हवा' ह्या लोकांच्या हट्टापायी मुलींची संख्या कमी झालेली आहे. शहरांत तर विशेषच. मुलींच्या अभावी अनेक पुरुष एकटे आहेत. त्यांना कुटुंबे नाहीत. कामावरून परतण्यासाठी जागा नाहीत. त्यांना शिजवलेले अन्न खायला मिळत नाही. पैसे कमावण्यासाठी तयार केलेले निकृष्ट, रुचिहीन जेवण जेवायचे आणि शरीराची भूक भागवायला मावशीबाईच्या पोरींकडे जायचे, हे सुदीपचे आयुष्य. पोलीस हवालदार सगणेने आपल्यासाठी कधी कुटुंब असेल ही आशा सोडून दिली आहे. ''मेलो तं आगीनबी बॉबे पुलीसच देएल.'' तो म्हणतो. मुंबईतील मोजक्या स्त्रिया जीन्स-टी शर्ट घालून पुरुषांच्या गर्दीत वेगळे न दिसण्याचा प्रयत्न करतात. अनेक कंपन्या स्त्रियांना घरी पोहचवायला सोबत देतात, तरीही दिवसाला बलात्काराच्या दहावीस बातम्या असतातच. विदर्भात एक 'गवळी सेना' म्हणून आहे. तीमध्ये कन्यावान पुरुष जात नाहीत. कारण सेनेचे अधिकारी कधीही त्या मुलींवर हक्क सांगू शकतात.



कादंबरीची भाषा : प्रमाण मराठी भाषा, कॉर्पोरेटमध्ये वापरली जाणारी मराठी-इंग्रजी संमिश्र भाषा, वऱ्हाडी बोलीभाषा, गोंडीचा प्रभाव असलेली गडचिरोलीमधल्या आदिवासींची भाषा ह्या सर्वांचा उपयोग त्या त्या ठिकाणचे यथातथ्य वर्णन करण्यासाठी त्या त्या ठिकाणी लेखक करतात. सर्व भाषा तितक्याच सहजतेने, तितक्याच शैलीदारपणे लिहितात, हे कादंबरीचे बलस्थान आहे. सच्चिदानंद भाकरे ह्यांच्या तोंडी घातलेली वऱ्हाडी फार सुंदर आहे. शहरातील लोकांना ज्या भावना व्यक्त करण्यासाठी इंग्रजीचा आधार घ्यावा लागतो, त्या ते सहजपणे मातृभाषेत सांगतात.

हे पुस्तक पोटतिडकीने लिहिलेले आहे आणि त्यातल्या बहुतेक शक्यता वास्तविकतेच्या अतिशय जवळ जाणाऱ्या आहेत. त्यामुळे त्या विचारात घेतल्याच पाहिजेत. विकासाच्या, आधुनिकतेच्या नावाखाली आज जो काही गोंधळ घातला जात आहे त्याचा अर्थच लावून पाहात नाहीय कुणी. सुशिक्षित, उच्चविद्याविभूषित लोकही हे करण्याचे टाळत आहेत. जे काही मूठभर लोक त्याला तपासून पाहण्याचे, त्यावर प्रश्न विचारण्याचे धैर्य दाखवतात, त्यांना आज तरी केवळ विकासाचे विरोधक म्हणून एक तर हिणविले जाते किंवा दुर्लक्षिले जाते. ते जे बोलतात, त्यावरची उत्तरे ना शासनाकडे आहेत, ना कॉर्पोरेट्सकडे.

आज हे जग घासूनपुसून लख्ख, चकाचक केले जात आहे. घरे चकाचक, कार्यालये चकाचक, वाहतुकीची साधने चकाचक. आज विदर्भ साहित्य संघाच्या खालीच मेट्रोचे काम सुरू आहे. नागपूरच्या ज्या रस्त्यांवरून एस.टी. गाडीही कधी नियमित धावली नाही, त्यावरून एकदम मेट्रो! आणि त्यासाठी किती गैरसोय सोसतोय आपण! कधी विचार तरी केलाय, ह्याची आपल्याला किती गरज आहे? आणि ह्या सगळ्यांसाठी कशाचा बळी देतोय आपण, तर प्रेमाचा, माणुसकीचा, मैत्रीचा, शेजारधर्माचा. ही सर्व मूल्ये जमिनीत गाडून त्यावर हे इमले उभारले जात आहेत. हे चकाचक जग पाहून साऱ्यांचे डोळे दिपत आहेत. तिकडे

जाण्यासाठी घोडदौड सुरू आहे सगळ्यांची. 'पुढे नाही तर काय मागे जायचे का मग?' असे सर्वजण विचारतात. पण पुढे जाऊन जर कडेलोट होणार असेल आपला, तर आपल्याला थोडे आजूबाजूला, थोडे मागे वळून पाहावेच लागणार आहे. हे आपल्या कधी लक्षात येणार? काहींचे खरेच त्या जगात हितसंबंध गुंतले आहेत; पण बाकीचे बहुसंख्य लोक तर असेच मेंढासारखे जाताहेत त्यांच्या मागे. ह्या जगाचे खरे स्वरूप त्यांना नीट आकळलेले नाही. ते त्यांना समजावून सांगण्यासाठी लेखकाने हा प्रपंच केला आहे.

एक गोष्ट सांगितल्याशिवाय मात्र राहावत नाही. कादंबरीतील चित्रण एवढे काळेकुट्ट करण्याची कलात्मक गरज लेखकाला का बरे पडली असेल त्याचे कारण स्पष्ट होत नाही. कारण वास्तवात असे घडत नाही. कितीही वाईट परिस्थिती आली, तरी मनुष्य, जीवजंतू त्यातून टिकून राहतात. जॉर्ज ऑर्वेलने १९४८ साली Nineteen Eightyfour हा dystropia लिहिला. परंतु प्रत्यक्षातील १९८४ मधून तगून राहून आज आपण सर्व आहोतच आणि बऱ्यापैकी आशावादीही आहोत. 'उद्या'मधील कॉर्प कल्चरबद्दल काहीच म्हणायचे नाही; परंतु निदान सानिका आणि चारगावची कथा तरी सकारात्मक शेवटाची लिहायला हवी होती. स्वतः पिकविलेले अन्न खाणारे, जमिनीशी लागेबांधे टिकवून ठेवणारे, मोन्सागिलसारख्या बहुराष्ट्रीय कंपनीच्या मोहजालात न फसणारे, उलट तिच्याशी दोन हात करू पाहणारे चारगावकर खरोखरच उद्याच्या जगात जगण्यास पात्र आहेत. कादंबरीत त्यांना वाचविले असते, तर ह्या मार्गाने गेल्यास आपल्याला भवितव्य आहे एवढी तरी खूणगाठ वाचकांना बांधता आली असती. चारगावमधील सामूहिक जीवनाचे इतके सुंदर चित्र कादंबरीत रेखाटले आहे, की तसे जगण्याची प्रेरणा देण्याची एक चांगली संधीही घेता आली असती. इतकेच नव्हे तर विदर्भातील गडचिरोलीमधील मेंढालेखा गावातील समूहाला मराठी साहित्यात अजरामर करता आले असते. आता लेखक म्हणतात की पुरेशा लोकांना उद्याच्या परिस्थितीची भयाणता कळली, तर ते ती टाळायला धडपडतील तरी. परंतु ती धडपड कशी करायची ह्याचा कादंबरीवरून काहीच बोध होत नाही. उलट काहीही केले तरी विनाशच वाट्याला येणार असेल तर धडपड करायचीच अशा निवृत्तिपर मार्गावरही ती नेऊ शकते.

हे सर्व असले तरी आजच्या झगमगाटाला भुलून जाणाऱ्यांच्या पुढ्यात काय वाढून ठेवले आहे हे सांगण्याच्या उद्देशाने लेखकाने ही कादंबरी लिहिली आहे आणि तो उद्देश पूर्णपणे साध्य झाला आहे ह्यात संशय नाही. कदाचित उद्याचे अत्यंत गडद दुःस्वप्नवत चित्र रेखाटल्याशिवाय लोक पुरेसे खडबडून उठणार नाहीत असेही लेखकाला वाटले असेल. चकाचक विकासाच्या मोहनिद्रेतून मराठी वाचकांना जागे करण्याचा प्रत्ययकारी प्रयत्न केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच. मराठी साहित्य आणि आपले भवितव्य ह्यांच्याविषयी आस्था असणाऱ्यांनी ही कादंबरी वाचण्याला पर्याय नाही.

• • •

अनुक्रमणिका



। ग्रंथचर्चा

'पायी चालणार ' : प्रफुल्ल शिलेदार यांचा सशक्त, आत्मनिष्ठ स्वर

सोमनाथ कोमरपंत

आजचे महत्त्वाचे कवी प्रफुल्ल शिलेदार यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला 'पायी चालणार' हा कवितासंग्रह वाचला. त्यातील कविता अत्यंत प्रभावी वाटल्या. समकाळातील संवेदनशीलतेपेक्षा वेगळ्या प्रकारच्या अनुभूतिविश्वाला ते कवेत घेताहेत. त्यांचा काव्यप्रवास प्रगल्भतेच्या दिशेने चाललेला आहे असे जाणवले. समोरच्या वास्तवातील आकांताचा वेध घेण्याची सहृदयता त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे. सद्यःस्थितीत निर्माण झालेल्या विरूपतेवर ते भाष्य करतात. पण त्यांची काव्यभाषा सर्वस्वी निराळी आहे. या कवितेचा तोंडवळा कवीच्या व्यक्तिमत्त्वासारखाच आहे. समकालीन वास्तवातील जटिल समस्यांना वाचा फोडताना जटिल प्रतिमांचे जाळे निर्माण करायला पाहिजेच असे नाही. कवीचा त्याविषयीचा उद्गार आंतरिक तळमळीचा आणि उत्कटतेचा असला तर योग्य तो परिणाम साधला जातो. कवीच्या अंतरीचे गूज कळते. बाकीचे बाह्य डोलारे कोलमडून पडतात. अशी संवेदनशीलता कवी प्रफुल्ल शिलेदार यांनी विकसित केली आहे. जीवनाच्या समग्रतेला आत्मनिर्भर वृत्तीने भिडण्याची ताकद त्यांच्या शब्दांत आहे. 'पायी चालणार' या साध्या शब्दांतून पुढील आश्वासक आशयाचा अंतःसूर त्यांनी निर्माण केला आहे. ''जमिनीशी नातं जपणारा प्रत्येकजण पृथ्वीचा खेळखंडोबा करण्याविरुद्ध पायी चालत असतो.'' हे त्यांच्या कवितेचे भरतवाक्य आहे. ते सर्वकाही सुचवून जाते. इथेच त्यांच्या आशयाची पुढची दिशा कळते. मनाच्या मुशीतील तप्तता कायम राखून शांत डोक्याने भवतालाविषयीचे चिंतन करता येते. बुद्धिनिष्ठ जाणिवा आणि भावनात्मक आंदोलनलयी यांच्या समुचित समन्वयातून अर्थपूर्ण अभिव्यक्ती होऊ शकते हे 'पायी चालणार' या संग्रहातील कवितांनी दाखवून दिलेले आहे. हा प्रवास 'स्व' कडून सुरू होणारा आहे आणि समष्टिचिंतनात तो परिणत होत गेलेला आहे. आधुनिक जीवनातील यक्षप्रश्नांचे सांदीकोपरे धुंडाळून जीवनजाणिवेचा तळ गाठण्याची क्षमता त्यांच्या प्रतिभेत आहे.

'तुटत जाण्याचा काळ असला तरीही' या पहिल्याच कवितेकडे आवर्जून लक्ष वेधावेसे वाटते. आजच्या वास्तवावर कवीने येथे अंतर्भेदी प्रकाश टाकलेला आहे. या जीवनभाष्यातून कवीची आत्मनिष्ठा कळते. जीवनधारणा कळते. सौम्य, संयत सुरात येथे कवीच्या अनुभूतीची प्रखरता जाणवते.

सडका वास नाकातून येतोय बाहेर
आत भरून घेतलेला गंध कुठे आहे
दोन हातांत मावेल एवढीच आहे पृथ्वी
हिरवेपण तोलणारे तळवे कुठे आहेत.

अनुक्रमणिका


आजच्या उद्ध्वस्त मनोविश्वाच्या, पर्यावरणविनाशाच्या आणि मनुष्यत्वाच्या होरपळीच्या संदर्भात कवीचे हे उद्‌गार पुनःपुन्हा विचारप्रवृत्त करणारे आहेत. ही सहज अभिव्यक्ती असली तरी अनेक अर्थवलये तिच्यात सामावलेली आहेत. अलीकडे विकसित झालेल्या अधिवासशास्त्रीय मीमांसेच्या आधारे त्यातील अर्थगर्भता शोधता येईल. प्रत्येकाला भेडसावणारे हे मूलभूत प्रश्न आहेत. त्या बाबतीतील कवीचे हे मूलभूत चिंतन आहे. व्यक्तिमानसाचा अक्ष ओलांडून ते सामाजिक मानसाकडे विस्तारत गेले आहे.

'राहू देतो कित्येकांना सोबत' या कवितेतील आशयसूत्र अंतर्मुख करणारे आहे. कोणत्या तरी अनामिक अंतःप्रेरणेने ऐहिक जगातील प्राणिमात्र जगत असतात. त्यांचे कवी केवळ तपशील देत नाही. त्यांच्या जीवनशैलीचे नेमक्या शब्दांत वर्णन करतो. कवीच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा येथे प्रत्यय येतो. कवितेचा शेवट तर त्याने विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवलेला आहे :

पाण्याचे साठे लहान मोठे
इथे तिथे तसेच ठेवून देतो
माती नेहमी थोडीशी
ओलसर राहू देतो
शब्दांना सावकाश उगवण्यासाठी
रक्तात ऊब वाहू देतो.

'रस्ते कसे' या कवितेत वाढत्या शहरीकरणाच्या प्रक्रियेचे चित्र कवीने रेखाटले आहे. 'एवढ्या कडवटपणाचं तू काय करणार आहेस' मध्ये ऱ्हासकालीन समाजातील मानवी जीवनाचे वास्तव चित्र त्याने रेखाटले आहे. तो उद्‌गारतो :

माणूसपणाची सीमा ओलांडून
भक्ष्य शोधत हिंडणाऱ्या
लांडग्यांच्या कळपातला
तू एक तरस झालास
....
ज्या कडवटपणात
वितळून जात आहेत
जगण्यातले गुलाबी आकाशी पोपटी रंग
ज्यामध्ये राख होत आहे
सगळा कोमलपणा विश्वास ओढ आणि आदर
त्या कडवटपणाचं तू काय करणार आहेस



या उपहासात्मक शैलीतून आजच्या समाजवास्तवाचे विदारक दर्शन घडते.

'दुर्मीळ गोळ्या', 'एक माणूस मारला', 'सायलेंट किलर', 'शाबुत', 'हद्दपार', 'जादुई वास्तव', 'ही घुसमट', 'बँडबाजा', 'सूर्योदय बघायला जमलेली माणसं' आणि 'कादंबरीत डोकावलो' इत्यादी कवितांत कवीने सामाजिक वास्तवच रंगविले आहे; पण ते एकाच ठशाचे नाही. विविधांगी जीवनाचे चित्र त्यात रंगविले आहे. 'कादंबरीत डोकावलो' या कवितेत कवी उद्‌गारतो :

भाषेला चमक होती
निराशेलाही धार होती
गवताच्या पात्यांनाही अनेक प्रसंग होते
कधी कुणाच्या पाठीखाली डोक्याखाली
कोवळ्या पावलांखाली जडजूड बुटांखाली
तरारण्याचे द्‌वारण्याचे थरारण्याचे
चिरडले जाण्याचे उखडून फेकले जाण्याचे
अनेक प्रसंग होते

लोकशाही जीवनपद्धतीत अस्तित्वात आलेली झुंडशाही, एकाधिकारशाही आणि त्यांच्या वरवट्यांखाली चिरडली जाणारी मानवी मूल्ये, तऱ्हेतऱ्हेचे विसंवाद कवीने येथे नेमकेपणाने टिपलेले आहेत.

हे सारे जरी खरे असले तरी कवीची जीवनश्रद्धा लोप पावलेली नाही. त्याचा 'स्व'शोध चालूच आहे. हिरवे पाते हे या जीवनश्रद्धेचे प्रतीक आहे :

भुईसपाट झाल्यावरही मान वर करण्याची मिजास
हिरवं पातं दाखवत होतं
पिवळं मातीत मिसळून जायला आतुर होतं
यात मी कुठं सरपटताना दिसतो आहे काय म्हणत
बारकाईनं निरखून पाहू लागलो
शोधता शोधता खोल विहिरीच्या
तळाशी जाऊन पोहोचलो
तिथून उंच विहिरीच्या तोंडावरचं
आभाळ न्याहाळू लागलो
त्या आभाळात मी कुठं उडताना दिसतोय का
ते पाहू लागलो

मुक्त कविमन आणि समाजाने निर्माण केलेली कृत्रिम, बंदिस्त चौकट यांमध्ये संघर्ष निर्माण होतो. समाजमनाने केलेल्या छळवादामुळे व्यक्तिमनाची घुसमट होते. अशा वेळी ते आक्रंदून उठते :

काचेच्या गोल नळकांड्यात
तुम्ही मला घालता
वरून छत खाली दाबत आणता
खेळ दाखवता सत्तेचा
ओलीस ठेवून घेता
अंगावरच्या सगळ्या कपड्यांसोबत
माझ्या भाषेत सगळे शब्द

ही घुसमट असह्य होते तेव्हा कविमन बंड करून उठते. शापवाणी उच्चारते :

खरं तर तुमचा आवाज
या हवेत नको
तुमची सावलीदेखील
या जमिनीवर नको
मला कुरतडताना लवकरच
तुमचा जबडा
वाकडा होऊन
निकामी होणार आहे

'कवीचा आत्मा', 'जोखीम पत्करून', 'कवितेचा अनुवाद', 'आणखी एक खर्डा', 'फक्त काळ्या खुणा/माझ्याच नव्हे', 'इथपर्यंत', 'विरागी', 'चुळबुळ' व 'कविता हसत हसत' या कविता काव्यनिर्मितिप्रक्रियेशी, कवीच्या काव्यविषयक अनुभूतीशी आणि काव्यनिष्ठांशी निगडित आहेत. कवीच्या जगण्याचे ते अविभाज्य अंग आहे. हा कवी जेव्हा कवितेविषयी चिंतन करतो तेव्हा तो आपल्या आत्म्याचे चिंतन करतोय, आत्मशोध घेतोय अशी जाणीव होते. वृत्तिगांभीर्य हा या अभिव्यक्तीचा स्थायिभाव आहे. स्वतःला आतून पाहण्याची ही प्रक्रिया अत्यंत प्रांजळ, पारदर्शी आणि सखोल अनुभूतींचे दर्शन घडविणारी आहे.

'कवीला पडलेले पुस्तक प्रकाशनविषयक दुःस्वप्न' ही कविता काव्यनिर्मितिव्यवहाराशी संबंधित आहे. तिचा स्वर बहिर्मुखतेचा आणि नर्मविनोदाचा आहे. उपहास हे या अभिव्यक्तीचे शस्त्र आहे. काव्यव्यवहारात शिरलेल्या अनिष्ट प्रवृत्तींवर या ठिकाणी कवीला भाष्य करायचे आहे. या सगळ्या गोंधळात कविमन कसे तुडविले जाते याकडे कवीने बोट दाखविले आहे.

काव्यनिर्मितीविषयीच्या या कवितांचा विचार सखोलतेने करण्याची आवश्यकता आहे. कवीच्या काव्यधर्माचा तो अभ्यास आहे. 'काळ्या खुणा' या कवितेत कवी उद्गारतो :

काळीजच नव्हे तर
सगळा देह पोखरून नष्ट करावा
काळ्या किड्यांनी
आणि उसळून यावे पांढऱ्याशुभ्र कागदावर
काळ्या खुणांनी
खुणवत राहावं
मागून येणाऱ्यांना
क्षितिजापर्यंत पसरलेल्या पांढऱ्याशुभ्र कागदावर

हा प्रतीकात्म आशय लक्षणीय वाटतो. कवितेचा भावी पिढ्यांवर कसा चिरस्थायी परिणाम होतो हे कवीने यातून सुचविले आहे.

अनुक्रमणिका

'कविता हसत हसत' या कवितेत कवितेचे सचेतनत्व अधोरेखित होते. ही तरल अनुभूती येते जाते. कवीला मात्र तिचा थांगपत्ता नसतो :

कवीजवळ पेन असतं
कागद असतात
बाहेर यायला
आतुर झालेली अक्षरं
शाईत लपून बसलेली असतात
कवी घाईत असतो
कविता हसत हसत
निघून जाते
....
आजूबाजूला आपण
घमघमत असलो तरीही
गंधच घेता येत नाही याला
काय करता चला
हसत हसत म्हणत
जाते निघून.

'आणखी एक खर्डा' या कवितेत कवीने कवितेसंबंधी काय करायला हवे ते नेमकेपणाने सांगितले आहे. शब्दांचा चपखलपणे त्यांनी वापर केला आहेः

सगळी सर्वनामं काढून टाकायची आहेत
नामांचं माहात्म्य वायफळ वापर टाळायचा आहे
विशेषणांचा वायफळ वापर टाळायचा आहे
क्रियापदांचा वेग वाढवायचा आहे
व्याकरणाच्या पिंजऱ्यातून सोडवलंय कवितेला
व्यवस्थेच्या जाळ्यात अडकली आहे
फडफडतेय
तिथूनही हलक्या हातानं सोडवून
निळ्या मोकळ्या आकाशात सोडायचं आहे.

'फक्त माझ्याच नव्हे' या कवितेत कवीने केलेल्या प्रारंभाकडे लक्ष वेधावेसे वाटते. शेवटी तो उद्गारतो :

कविता लिहिण्यासारखी परिस्थिती
फक्त माझ्याच अवतीभवती नाही
प्रत्येकाच्याच भोवती हवी
मग कुणीही कविता लिहिली नाही
तरी चालेल.

'इथपर्यंत' या कवितेतील काव्यनिर्मिति-प्रक्रियेविषयीचा आशय सूक्ष्म, घट्ट विणीचा आणि संपृक्त स्वरूपाचा आहे. मनावर होणारा तिचा संकलित परिणाम ध्यानात घ्यायला हवा. या कवितेत कवी म्हणतो :

...मला जाणवते तिच्यातली धग
माझ्या आतली आग विझू न देण्याची
आठवण करणारी
तिच्यात असतो माझ्या बोटांचा
डोळ्यांचा आतड्यांचा अंश
तिच्यात माझी ओळख पट जाते म्हणून
ती बोट सोडून निघून जाते तेव्हा तिला
पुन्हा स्पर्श करण्याकरता धावतो
ती डेरेदार आंब्याच्या झाडासारखी उभी राहते
मी पिवळे ऊन होऊन उतरतो तर ती
मासोळी
होते पाण्यात जाते ती सुळकन् पाठलाग
करू लागतो तर ती वारा होऊन झुळकते

या अर्थसघन ओळी वाचताना आणि प्रयोगशील रचनाबंध बघताना चित्तवृत्ती प्रसन्न होते. कविमनाचे हे अनोखे पाऊलठसे आहेत हे जाणवते.

'कवीचा आत्मा'मध्ये कवी उद्गारतो :
अनामिक राहणं हा कवीचा आत्मा
आत्म्याला होते अपेक्षांची मूळव्याध
मग एका जागी बसणं कठीणच
अमर्त्य होण्याच्या आकांक्षेचे
आतल्या असीम असुरक्षिततेचे
मोहनिद्रेत गेलेले किडे
जोरात वळवळू लागतात
सार्वजनिक शेणात कवीचा पाय पडल्यावर

या उद्गारांत सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भात कविमनाला कराव्या लागलेल्या संघर्षाची धार आहे. बाह्य आक्रमणाचा सतत मारा या कविमनाला सहन करावा लागलेला आहे. 'जोखीम पत्करून' ही या संग्रहातील अत्यंत प्रभावी कविता. प्रतीकात्मक आशय तिच्यामधून प्रकट झालेला आहे. उदा. :

संघटित होणं प्रतिकार करणं सूड घेणं लढा देणं
कवितेकडून तिला खूप आशा असतात
ती कवितेत शिरण्यासाठीच

अनुक्रमणिका

लेखकाच्या टेबलावर चालत येते
मात्र तेव्हाही तिच्या अवतीभवती
भय आणि आंधळेपण दाटून आलेलं असतं

हा आशय पुढील ओळींमुळे प्रगाढ आणि सखोल अनुभूतीचा प्रत्यय आणून देतो

ती जुन्या डिक्शनरीतला विस्मृतीत गेलेला शब्द
साखरेच्या दाण्यासारखा उचलून
आणून देऊ शकत नाही मला
कवितेत वापरण्याकरिता
ती कोऱ्या कागदावर आपल्या पायांनी
काढू शकत नाही
तिच्या सुखदुःखाची चित्रलिपी
तिला कवीकडून खूप अपेक्षा असतात
म्हणून अभिव्यक्तीची जोखीम पत्करून
ती कवितेत शिरण्यासाठी येते
कवितेत प्रवेश मिळण्याआधीच
चिरडली जाते.

'श्वासाला' या आत्मपर कवितेतही कवीच्या आत्म्याची होणारी तीव्र तडफड आणि त्याच्या सृजनात्मकतेला होणारा अडथळा याचे दर्शन घडते :

कोंडीच झाली जगता जगता
प्रियतम वाटू लागलं कोंडलेपण
त्याचेच कोड उठले अंगभर
अवचित आलेल्या ओळखीच्या
या पांढऱ्या पाखराला
हुसकून लावण्याचा प्रयत्न करू लागलो
पाणी कापत कापत
वर येऊ लागलो
श्वासाला हवा कुठे आहे
कुठे आहे हवा

अलीकडे मराठीत व्यक्तिचित्रात्मक आणि चरित्रात्मक कविता अभावानेच पाहायला मिळतात. लोकोत्तर व्यक्तींचा गुणगौरव करणाऱ्या कविता थोड्याफार लिहिल्या जातात. पण सामान्य माणसांमधील असामान्यत्व हेरणे आणि त्या व्यक्तित्वाचे सूक्ष्म कंगोरे कवितेत गुंफणे कठीणच. प्रफुल्ल शिलेदारांनी पुरुषोत्तमदास या रेकॉर्ड्स विकणाऱ्या अवलिया माणसाचे व्यक्तिचित्र आठ पृष्ठांच्या दीर्घकवितेत उत्कृष्टरीत्या रंगविलेले आहे. मराठी कवितेतील व्यक्तिचित्रणात्मक कवितांत ते संस्मरणीय ठरावे. सुरुवातीलाच कवी उद्गारतो :

पुरुषोत्तमदासचं मनगट थरथरतं
वाऱ्यानं फडफडणाऱ्या ज्योतीसारखं
रेकॉर्ड्सचा गठ्ठा उचलताना
तो अख्खा भूतकाळच उचलत असतो
त्याच्या एका हातानं

मोठ्या कष्टाने, मिनतवारीने मुंबई ते कलकत्त्यापर्यंत पायांना भिंगरी लावून पुरुषोत्तमदासने रेकॉर्ड्स गोळा केल्या. त्याची कुळकथा पुरुषोत्तमदास रंगवून सांगतो. श्रीमंतांचा हा शौक आपल्यासारख्या शेतकऱ्याने जीव ओतून निगुतीने कसा केला त्याचे तपशील रोमांचकारी आहेत. ते मूळ कवितेतूनच वाचायला हवेत. कुंदनलालची दुर्मीळ रेकॉर्ड त्याला कलकत्त्याच्या बाजारात मिळाली. आतून कागदात गुंडाळलेला एक अल्बम काढला असता त्याने त्यातून रत्नजडित ऐवजासारखी अठ्ठ्याहत्तर आरपीएमची एक रेकॉर्ड काढली. हा लताचा रेकॉर्ड झालेला पहिला आवाज होता. त्यासंबंधीचे पुरुषोत्तमदासचे मनोगत या कवितेत आढळते :

लताच्या चौदापंधरा वर्षांच्या कोवळ्या
आवाजाचं
मोरपीस
तीन स्पीकर्समधून
अंगावर फिरू लागताच
अंग शहारतं मेंदूला झिणझिण्या येतात.

हा असा आणि अनेक अशा प्रकारचे अनेक प्रसंग... अनेक आठवणी... आठवणींची सहजतेने जमून आलेली मैफल त्यावरची कवीची मानसप्रतिक्रिया अशीः

तो भरभरून बोलत असतो
मी विस्मयचकित होतो
घाटात वसलेल्या त्या लहानशा गावात
पुरुषोत्तमदासनं जपलेला
पिन ठेवताच लखलखणारा
गरगरत दिपवणारा
खजिना पाहून
शतकाच्या सुरुवातीपासूनची
अर्धीअधिक दशकं

अनवट सुरेलपणे काळ्या गोल रेषांमध्ये
बंदिस्त झालेली

कवीच्या रसिकतेचे आणि या दुर्मीळ चिजांकडे पाहणाऱ्या तन्मय वृत्तीचे येथे दर्शन घडते.


या संग्रहातील 'वीस तुकड्यांची लेखकाच्या आत्मचरित्रातील पुस्तकविषयक काही नोंदी' ही महत्त्वपूर्ण कविता आहे. ही पुस्तके कवीच्या भावविश्वात सहजतेने वावरतात. ज्या मर्मदृष्टीने पुस्तकांच्या हालचाली त्याने न्याहाळलेल्या आहेत त्यावरून पुस्तकांविषयीचे त्याचे ममत्व व्यक्त झाले आहे. जीवनानुभूतीइतकाच त्याच्या कवित्वशक्तीचा परिपोष करण्यात पुस्तकांचा वाटा आहे. जैविक एकात्मतेचा येथे प्रत्येक तुकड्यातून जिवंत आणि रसरशीत अनुभव येतो.

पुस्तके जुन्या मित्राच्या आसुसतेने कवीचा शोध घेतात. एका क्षणी गाठतात पुढे येऊन शांतपणे उभी राहतात... पुस्तके हाती घेताच त्यांचे काळीज लकाकते. डोळे चमकतात... ती वाचली जात असताना श्वास रोखून धरतात. कवीची एकाग्रता भंग होऊ देत नाहीत... संपूर्ण वाचल्यानंतर पुस्तके थकून जातात. आतल्या आत मिटून कवीवर काय परिणाम झाला असेल याचा विचार करतात... पुस्तकांना रूप असते. डोळे मिटून स्पर्श केल्यावरही कवीला ते जाणवते... पुस्तकाला परिमळ असतो... पुस्तक येण्यापूर्वीच तो दरवळत येतो... पुस्तकाच्या प्रत्येक पानाची दारे सताड उघडी असतात... कुठूनही पुस्तकाच्या अंतरंगात शिरता येते. पुस्तके म्हातारी होतात... वयोवृद्ध बापासारखे त्यांना जपावे लागते.

पुस्तकांचा शतकानुशतकांपूर्वीचा उगम आणि त्यानंतर घडत गेलेला विकास यांची संस्मरणे या कवितेत येतात. ती नितांत रमणीय आहेत. सातव्या तुकड्यात कवी उद्गारतो :

पाचच सहस्रकांपूर्वी
अपौरुषेय पुस्तक
आवाजाच्या खांबांनी तोललेल्या
ओवरीत
राहत होती
वैशंपायनाच्या ओंजळीतून
याज्ञवल्क्याच्या ओंजळीत
नवजात अर्भकासारखी
सोपवली गेली

सगळी पवित्र वचने पुस्तकांमधून आली आहेत. मात्र सगळीच पुस्तके वचनांएवढी पवित्र नसतात हे वास्तव कवीने हेरलेले आहे. धर्माच्या, विचाराच्या आणि माणुसकीच्याही विरुद्ध जाण्याचे रसायन अवतीभवती खदखदताना दिसते अशा वेळी पुस्तके अनोळखी वाटायला लागतात हे कवीचे चिंतन आपल्याला अंतर्मुख करीत जाते. पुस्तकेदेखील विध्वंसक वृत्ती धारण करतात. धार्मिक दंगलीस भाग पाडतात. खुनास कारणीभूत होतात. असे अनेक दाखले कवी देत जातो. प्रतीकात्मक आशय व्यक्त करतो. इतिहासाचे अनेक दाखले देतो. उदा :



पुस्तकं
लेखकाला
दहशतीचं ओझं देऊन
परागंदा करतात
आयुष्यभराकरता
मायभूमीतूनच
हद्दपार करतात
लेखकाचं मुंडकं
छाटून आणणाऱ्यास
बक्षीस ठेवतात
पुस्तकं
पिसाटपणात
टराटरा फाडली जातात
पिसेपणातही
फार संयम ठेवून
पुस्तकंच कधीकधी
लेखकाच्या ऐवजी
जाळली जातात

कवीने चिंतनशीलतेच्या प्रवाही निवेदनशैलीतून उद्धृत केलेले तपशील लेखकाची स्पंदने आणि समाजव्यवस्था, शासन यांचे दबावतंत्र, लेखकाच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालण्याची त्यांची रणनीती यांचे दर्शन घडवितात. अल्पाक्षरांतून कवी खूप काही सांगून जातो :

पुस्तकं
इतिहासाचं गूढ हास्य
हसतात
इतिहास बदलू न शकणारे
पुस्तकंच बदलतात
त्यांचं पावित्र्य भंग करतात

मानवी जीवनातील पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करताना कवी मोजक्या आणि नेमक्या शब्दांची योजना करतो. तो म्हणतो की पुस्तकांना जेव्हा समूहमनाचा स्वर मिळतो तेव्हा ती समुद्राच्या लाटांसारखी रोरावतात. अफाट उंची गाठताना तेव्हा ताऱ्यांसारखी अढळ होऊन लुकलुकतात. डोळ्यांना दृष्टी देतात. आवाजाला स्वर देतात. जखडलेल्या हातापायांच्या शृंखला तोडून मोकळी हालचाल देतात. तणावाची काटेरी कुंपणे तोडणारी ती करवत होतात.

या कवितेतील अठरावा तुकडा कवीच्या भावकोमल स्वरामुळे रसिकाच्या हृदयात ठाण मांडून बसतो :

पुस्तकं
शिंपला होऊन
भाषा जपतात
उदक होऊन
कोंब रुजवतात
पेंग्वीन होऊन
मैलोन्‌मैल
प्रवास करीत येतात
सुगरणीसारखा
खोपाच नाही तर
सुतारासारखी
खोल घरंही करतात

विसाव्या तुकड्यात कवी उद्‌गारतो :

पुस्तकं
स्थितप्रज्ञासारखी
स्थितिशील
माणसांच्या जगात
ईश्वरानं
लुडबुड करावी
तशी
पुस्तकांच्या विश्वात
माणसं
आगंतुकासारखी
धडपडतात

संक्षेपाने सांगायचे झाल्यास या कवितेत व्युत्पन्नता, अभिरुचिसंपन्नता, वाचनप्रियता आणि उत्तुंग कल्पनाशक्ती यांचा स्वरमेळ आहे. ज्या शब्दनिष्ठ मनोव्यापाराशी कवी निगडित आहे त्याच्याशी असलेले दृढ नाते अधोरेखित करणारी ही कविता आहे.

कवीच्या कवितेतील समग्र जीवनजाणीव. सभोवतालच्या प्रखर वास्तवातही निर्धाराने आपली सत्त्वशीलता टिकवणारे मन आणि संवेदनशीलता 'पायी चालणार' या कवितेत पाहायला मिळते. कवी सुरुवातीला उद्‌गारतो :

कोट्यवधी वर्षांच्या प्रयत्नानं साधलेलं
ताठ उभं राहून पायी चालणं
मुश्कील होण्याच्या काळात
मी जगतो आहे
पायाखाली भरभक्कम उभी राहणारी माती
खचता खचता
पायी चालणं दुष्कर होण्याच्या काळात
मी जगतो आहे

चिंतनशील वृत्तीने आजवरच्या पायी चालणाऱ्यांचे जीवन अर्थपूर्ण कसे ठरले याचा मागोवा घेत घेत कवी आपली जीवनधारणा व्यक्त करतो :

राम काय नि पांडव काय
सीतेसोबत द्रौपदीसोबत पायीच वनवासाला गेले
बुद्धही पायीच निघून गेला राजवाड्यातून
गांधी पायीच गेला दांडीला
आणि विनोबा भूदान गोदान करीत पायीच हिंडला
हजारो पावलं पायीच जातात
टाळमृदंगाच्या जोडीत विठ्ठलाच्या ओढीनं
गुरंढोरं किडामुंगी जनावर सगळे पायी चालतात
जमिनीशी नातं जपणारा प्रत्येकजण

पृथ्वीचा खेळखंडोबा करण्याविरुद्ध
पायी चालत असतो.

कवीच्या जीवननिष्ठेचे नितळ आणि निखळ स्वरूप या कवितेत पाहायला मिळते. 'जगातला सगळ्यात स्वादिष्ट सगळ्यात महागडा पदार्थ बनविण्यासाठी या कवितेतील विषय साधा वाटत असला तरी त्यामागचे कवीचे चिंतन प्रगल्भ स्वरूपाचे आहे. त्याचे मानवतेविषयीचे आत्यंतिक प्रेम येथे अभिव्यक्त झालेले आहे.

मानवासोबत झिंग्यांचं असं विलक्षण साम्य आहे
फक्त नातं खाणाऱ्याचं आणि खाल्लं जाणाऱ्यांचं आहे


येथे आशय कणखरपणे व्यक्त झालेला आहे. पुढचे निवेदनही त्याला पुष्टी देणारे आहे. उपहासात्मकतेची त्याला धार आहे. 'तेहेतीस कोटी अपराध पोटात घालून' हीदेखील अर्थपूर्ण आशयाची कविता आहे. एकापरीने हे समष्टिचिंतन आहे.

'खूप माणूस होऊन' ही कविता कवीचे जीवनविषयक तत्त्वज्ञान व्यक्त करणारी कविता आहे. पण ती तात्त्विक भाषेत व्यक्त होत नाही. तिची शब्दकळा पूर्णतः काव्यात्म आहे :

आतून सारखा झिनझिनाट
खूप माणूस होऊन जगावं
खूप माणूस होऊन जगावं
कुणी पडताना दिसताच
धावून सावरावं
झडताना दिसताच
पाणी होऊन मुळापर्यंत पोहचावं

मानवी करुणेचे उत्कट स्तोत्रच येथे सामावले आहे. आदिस्वर तोच आहे. भाषा मात्र आधुनिक आहे.

• • •



'बहादूर थापा आणि इतर कविता': परिघाबाहेरच्या माणसांची कविता

वर्षा ढोके सय्यद

''**संतोषभाऊ,** मला मेल्यावर लोक जाळतील का पुरतील रे?''

प्रश्न तसा साधासाच.

पण तो हिराबाई जाफरमीयाँचा असतो आणि म्हणून परंपरागत मानसिकतेला कुरतडत राहतो. कुणाही वाचकाच्या मनात उलथापालथ होत राहावी आणि हरेक व्यक्तिरेखेमागे अलगद तरंग उमटत राहावे, असोशीने साहित्यातील पात्रे भिडत राहावीत असाच एकूण अनुभव येत राहतो. 'बहादूर थापा आणि इतर कविता' वाचताना.

संतोष पद्माकर पवार यांच्या साधना प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'बहादूर थापा आणि इतर कविता' ह्या कवितासंग्रहात पानापानांवर माणसे श्वास घेत आहेत असा भास होत राहतो. उसासे जाणवत राहतात.

भोवतालच्या माणसांच्या भोगवट्याच्या ह्या कविता आहेत. एकेका आयुष्याची कहाणी आहे.

कवी म्हणतात, ते ज्या खेड्यापाड्यांतून फिरले, जे बालपण अनुभवले त्या काळात आजूबाजूला असलेली, दिसलेली माणसे त्यांच्या सुखदुःखासह कवीच्या जगण्याशी समांतर चालत आलेली आहेत. संग्रहातली पंचवीस व्यक्तिचित्रे ही वेगवेगळी पंचवीस चिवट जीवनचित्रे आहेत. एकेक चरित्र म्हणजे संपूर्ण विद्यापीठच.

त्यांचं जगणं, त्यांची लढाई यात कुठेतरी कवी जुळून आहे. ही सर्व कवीची माणसं आहेत. त्यात वैविध्यही इतके आहे की ग्रामीण परिवेशातील जवळपास सर्वच व्यवसाय आणि सामाजिक स्तरांचे ते प्रतिनिधित्व करताना दिसतात. सामान्यांच्या असामान्य जीवनसंघर्षाचे चित्रण करतात.

गावखेड्यात हा संघर्ष कधी आपल्याच माणसांशी असतो. मनस्वी रंभाजी कडलगाच्या वाट्याचा हा छळवाद त्याचं जगणं घेऊनच संपतो.

बस्ता करून आलेल्या घराला सांजच्या वक्ताला
झाली तुझी आठवण
शोधाशोध झाली...
तर बरडाच्या वावरात तू मुठीत हरभरे घट्ट पकडून
पाभरीच्या मागं पडून, जीव गेलेला...
आणि तू कधी हैऽऽक म्हणतोस याची वाट पाहत बैल तिथेच उभे ठाकलेले

(पृष्ठ क्र. १३)

अनुक्रमणिका

कुठे आधुनिकीकरणाच्या, मानेवर घट्ट बसलेल्या भुताने परंपरागत व्यवसायांना लावलेल्या सुरुंगाच्या ठिणग्या उडताना दिसतात. हे आधुनिकीकरण रोडू बँडबाल्याला त्याच्या नकळत ढकलत कडेला लोटून देते.

तू भरास होतास नि तुला
आलेल्या ऑफर चाळीसगावच्या बँडच्या
वैजापूरच्या चाऊसच्या-स्ट्रीट सिंगरसाठी
पण गावाला बँड राहणार नाही
म्हणून नाही गेला बहुधा (पृष्ठ क्र. ७२)

तोच रोडू, जातीच्या स्तराचा दुहेरी मारही बिनतक्रार सहन करीत आलेला असतो. ज्यांच्यावाचून पर्यायच नाही अशी ही तळाची माणसं घेऊन पंक्तीत सर्वांत मागून जेवायला बसणारा रोडू.


पण बँडबाल्यांना एकदम शेवटी
कुठंतरी आडबाजूला जेवायला वाढतात
म्हणून भांडला नाही कुणाशी... (पृष्ठ.क्र. ७२)

घरादाराला हादरवणाऱ्या, काचा तडकवणाऱ्या आणि संडासचे चेंबर लीक करणाऱ्या बेसूर डिजेचा अवतार नाही आवडत रोडूला. बदलत्या काळाने मागे पडलेली, दुखावलेली ही माणसं असतात. परिस्थितीने लादलेले निर्णय मुकाटपणे मान्य करणारी ही माणसं आपल्या जीवनप्रेरणांशी मात्र बेइमानी करीत नाहीत. घुंगरांच्या जागेवर पोटाची भूक वाजणारी तमाशातल्या फडातली सहनर्तिका छबू... हौसा-मंजुळाचा फड मोडल्यापास्नं घरीच राहते. किडूकमिडूक जमापुंजीवर गुजराण करते.

तुझा जातधंदा गायचा-नाचायला
त्याची बरकत शहरवस्तीच्या लोकांना गेली
नऊवारीतली कला मुर्दाड?
नि दंड-बेंबी उघडी सोडणारांची आवक झाली
म्हणे छबू, तू करते ती कलेची घाण
त्यांच्या गाण्याची ''पद्मश्री झाली!''
(पृष्ठ क्र. ३९)

ही माणसं असतात मात्र दोन्ही बाजूंनी एकच पारदर्शी छाप असलेल्या खणखणीत नाण्यासारखी. जशी आत, तशीच बाहेर.

नैतिक-अनैतिकतेचं सोज्वळ बुजगावणं न उभारताही लंपट नागरी वृत्तीपासून लांब राहिलेली



तम्मा अगदी तळाची वाळू दिसावी इतकी आरपार स्वच्छ दिसायला लागते. साधारण जगण्याच्या चिखलात नाकापर्यंत फसलेल्या यांच्यापैकी शारदीसारख्या काहींमध्ये चिवट हिरवाईही डोकावताना दिसते अधूनमधून.

देवलशानं जिती पुरून टाकली शारदी तर
अंजाबाईच्या आयुष्यात सुखाचा काळ येईल
म्हटलेते
नि धुरपदे, तुझ्या नवऱ्याला
तेच खरे वाटू लागलेले
आमुश्या तोंडावर आलीती
नि शारदीला जिवंत पुरायची तयारी
बापानं घरातच चालवलीती
तव्हाच दारी शारदीला न्यायला सरलोकांची
जीप आली
नि सारी धावाधाव झालीअंजी नि तुझा नवरा
पळाले रानात
नि शोधाशोध करून सरलोकांना
शारदी घावलीती गोरात
अशी शारदी तिसऱ्या दिशी
नॅशनलची दौड धावणार होती...

आधीच रेकॉर्डब्रेक केलेली शारदी
नवा रेकॉर्ड रचणार होती
कारण ती लाकडाप्रमाणे वाळून मेलेल्या
मायच्या वेलावर आता उलून आलेलं फूल
होती! (पृष्ठ क्र. ७९)

त्यांचा जगण्याचा एकजात चिकटलेला झगडा. तो सुटता सुटत नाही. जगण्याची ही जद्दोजहत मृत्यूनंतर मागे राहिलेल्या आप्तांच्या जगण्यातही जन्म घेते.

पहिला निशाणा जॉनच होता
आणि नंतर मोर्च्यातले पुढचे साताठ लोक,
ते पळाले नाहीत
त्यांच्या छातीत बंदुकीतून गोळ्या घातल्या गेल्या
जॉनसहित आठ जण मारले गेले
जॉनला वाचवू पाहणारी इंदूबाई दुशिंग-
देखील मेली
....
जॉन गेला त्या वेळी
गौरी सात महिन्यांची गर्भार होती त्याच्यापासून
आता तिचा दुसराच लढा होता
आणि अशीच काहीशी कहाणी
जॉनच्याही जन्माची होती...
(पृष्ठ क्र.११४/११५)

इथे सोन्याबापूसारखी व्यवस्थेने पिचलेली शुद्ध माणसे भेटतात.

आता एकच प्रश्न बाकी होता माझ्यापुढं
तुला खरंच कुत्र चावलं होतं,
की इथली व्यवस्था?
(पृष्ठ क्र. ५७)

जगण्याचे हे चिकटलेले वाण गावपातळीवरच्या एवढ्यावर परिघात नाही तर ते सार्वत्रिक पसरलेले असते. या लढ्याला प्रांत आणि सीमांचे बंध नसतात. बहादूर थापाची पिळवणूक हा याचाच भाग.

शोषण होणारांचा कोणताही
स्वतःचा देश नसतो
ना नेपाळ, ना भारत,
ना ब्रिटन, ना अमेरिका!
(पृष्ठ क्र. १०३)

परिस्थितीचे हे फटके इतके सातत्याने पडतात की फ्रँकीसारखा कुणी शरणागती पत्करून हात टेकतो.

सतत जगाने फ्रँकीतल्या कवीचा खून केला
तो आज स्वतःच स्वतःचा खुनी म्हणून
समोर आला होता. (पृष्ठ क्र. १४२)

संतोष पवारांना एकाच प्रतलात भेटलेल्या ह्या माणसांचे जीवनानुभव मात्र एकमेकांपासून वेगवेगळे आहेत. एकेक कविता वाचताना त्या प्रसंगासह मनात चित्र सरकतं. त्या सगळ्यांसकट मग अलगद अगतिकतेच्या धाग्यात शेवटाला आपणही ओवले जाऊन गाठ मारली जाते. हात सोडून दिला तरी आहोत तिथेही त्या भोवताल कुणाकुणात तपशिलांच्या काही फरकाने दिसायला लागतात.

लहानपणी सापाचा खेळ दाखवणारे एक उंचसे म्हातारे आजोबा हातावर पाच पैसे ठेवायचे आणि आम्ही मुलं त्यांच्यामागे फिरायचो. चेहरासुद्धा आठवत नाही त्यांचाच पण बळ्या गारुड्याला वाचल्यावर सापांचा खेळ दाखवणारे ते आजोबा परत परत आठवायला लागतात. नाइलाजाने विषाच्या सान्निध्यात भाकरी कमवणारा बळ्या काय किंवा ते लहानपणीचे गारुडी आजोबा काय, शेवटी भाकरीसाठी त्याच विषाचे बळी ठरले.

या लोकांशिवाय एका पूर्ण 'गावा'चे अस्तित्व नसतेच. पंचवीस व्यक्तिचित्रे ही वेगवेगळी पंचवीस चिवट जीवनचित्रे आहेत.

गिरीश सहस्रबुद्धे यांच्या समर्पक चित्रांनी कवितेतल्या व्यक्तिरेखांना अधिक ठसठशीत केले आहे. वासनेच्या भिंतीत चिनली गेलेली शैली, भारताच्या अर्ध्या नकाशाच्या पार्श्वभूमीवर मरून पडलेला रंभाजी अशी चित्रे कवितेशी जोडून राहतात.

''हे लिखाण कधी गद्याकडे झुकते'' म्हणून बहादूर थापाविषयी बोलल्या गेलं. मला वाटतं, आहे ते तसं. पण मग लगोलग त्याहीपेक्षा महत्त्वाचा प्रश्न पडतो की भोवतालची भावलेली, त्यांचं बरंवाईट जगणं बोचलेली माणसं त्या समस्त बऱ्यावाईट तपशिलांसह अगदी होती तश्शीच, कसलाही मेकअप न चढवता कवीला मांडायचीच होती तर त्याने ती दुसऱ्या कुठल्या नादमय रूपात अशीच मांडली असती का?

कवी मनोगतात म्हणतात, ''मी पाहिलेले रंभाजीचे व्यक्तिचित्र कवितेत उतरले होते. कथेची बूज

राखत ते निवेदनरूप घेत, वाङ्मयप्रकार आणि त्यांच्या संकल्पनेची मोडतोड करीत होते. पण तसल्या गोष्टींची चिंता करण्याला अर्थच नव्हता. कारण जे सहजपणे बाहेर आले, त्याला आता मोजपट्ट्या लावत बसण्यापेक्षा ते येऊ देण्याला मी अग्रमहत्त्व दिले.''

'बहादूर थापा'च्या पहिल्याच वाचनातून ही माणसं जशी असू तिथे कोंडाल करून घेराव घालतात. तशी त्यांना पारंपरिक कवितेच्या चौकटीत मांडून ठेवल्यावर वाचणाऱ्याच्या आतवर पोहचू शकली असती का? आणि नसती तर केवळ आपल्या फॉर्मच्या रुजलेल्या कल्पनांना ती कुठेतरी धक्का देतेय म्हणून एका चांगल्या साहित्यकृतीचे अस्तित्वात येणे नाकारणे हा 'जगणं' मांडणाऱ्या लेखणीवर आणि ते वाचायला आवडणाऱ्या वाचकावरही अन्यायच झाला असता.



आहे तसं व्यक्त व्हायला फॉर्मचे बंध कुठे थोडे सैलसर झाले तरी 'बहादूर थापा' वाचून संपल्यावर फॉर्मसंबंधी काहीएक डोक्यात येत नाही. कवितेतली ही माणसं फक्त जाणवत राहतात आणि ''कविता वाचणाऱ्यांची होणं'' हे साध्य पूर्ण करून जातात.

रंभाजी, गुजाबाई, कमलाबाई, बाळू, कल्या, सोन्याबापू, सोनी, जॉन सगळ्यांना वाचल्यावर साताठ वर्षांपूर्वी ज्याच्या दहाव्याला गाव जेवला होता, ज्याचा रीतसर मय्यत दाखला सरकार दप्तरी जमा होता तो चांगू अचानक घरी परतल्यावर जसं गाववाल्यांना वाटलं होतं तसं वाटत राहतं. कारण ही माणसं आपल्या इथेतिथे असतातच. पण ती अशी अंगावरची कातडी सोलून आतल्या रूपानं सामोरी आली की दचकायला होतं. त्यांच्या जिवंत असल्याचा दाखला नजरेसमोर फडफडत राहतो. हळूहळू आपल्याही भोवताल ती आहेत हे जाणवायला लागतं.

अनिल अवचट यांची छोटेखानी पण तेवढीच कवितेच्या जवळ गेलेली प्रस्तावना आहे. ते म्हणतात तसं, आजूबाजूला अस्सल विविधता भरलेली आहे पण हिंदी, कन्नड, बंगाली साहित्यात ती येते तशी मराठीतून समोर येत नाही.

कथेच्या अंगाने गेलेले माडगूळकरांचे 'माणदेशी माणसं' आणि प्रज्ञा दया पवारांची 'आरपार लयीत प्राणातिक' ही दीर्घकविता असे काही मोजके प्रयोग झाले. त्या कडीचा पुढचा भाग म्हणजे बहादूर थापा.

आपल्या भोवतालच्या गर्दीतला एक ठिपका असलेली सामान्य म्हणून कायम दुर्लक्षिलेली ही माणसं 'बहादूर थापा आणि इतर कविता'मधून अशी अमर होऊन गेली आहेत.

संकोच न बाळगता साहित्यबाह्य जगण्याला धीटपणे भिडणारी संतोष पवारांची लेखणी बहरत राहो!

• • •



। ग्रंथचर्चा

धर्मशास्त्रांच्या अमानुष नोंदी : क्रौर्याने रक्ताळलेल्या अनुभवांची चिंतनकविता


डॉ. प्रकाश खरात

मराठी काव्याच्या इतिहासातील आंबेडकरवादी कविता ही सामान्य माणसाच्या जीवनातून वाङ्मयात व वाङ्मयातून जीवनात गतिमानतेने परिवर्तन करणाऱ्या सृजनशील कवींची कविता आहे. त्याचप्रमाणे सामाजिक न्यायाच्या प्रेरणेने प्रेरित झालेल्या वाचकांचीही कविता आहे. सामाजिक जाणीव हे मराठी कवितेचे गाभातत्त्व आहे. य तत्त्वाला विविध आयाम आहेत. त्यांपैकी धर्मचिकित्सा हे तत्त्व संपूर्ण मराठी वाङ्मयप्रकारांना व्यापणारे आहे. या तत्त्वाला अनेक प्रतिभावंतांनी आपापल्या वाङ्मयप्रकारांच्या माध्यमातून मांडले. धर्मचिकित्सेचा संबंध मानवाच्या अमानुष अत्याचारातून मुक्ती मिळविण्यासाठी विचारवंतांनी केला. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव या मूल्यनिर्मितीसाठी केला. ही धर्मचिकित्सा जशी प्राचीन वाङ्मयचे प्रवाहरूप आहे तशीच आधुनिक वाङ्मयातली आधुनिकतेचे मूल्यरूप आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक चिकित्सा हे मानवी प्रबोधनाचे तत्त्वज्ञान झाले. त्या तत्त्वज्ञानाला आपल्या सामाजिक अनुभवाला मांडणारे अनेक कवी उदयास आले. त्यांचाच विचार गतिमान करणारे मच्छिंद्र चोरमारे हे एक कवी होत. 'धर्मशास्त्रांच्या अमानुष नोंदी' या कवितासंग्रहात त्रेसष्ट कविता आहेत. आपला वास्तववादी वेदनांकित अनुभव त्या कवितेत मांडला. आपल्या अन्यायाचे, शोषणाचे मूळ त्यांनी धर्मशास्त्रांनी शिकविलेल्या अमानुष रक्ताळलेल्या क्रौर्याशी जोडून शोषणाच्या उगमावरच भाष्य केले. सामाजिक जीवनातील सत्य अधोरेखित करून नवी लोककल्याणकारी चिंतनाची दिशा गतिमान केली. आंबेडकरी जाणिवांचा व विचाराचा प्रत्यय म्हणजे शोषणवादी धर्मशास्त्राच्या अमानुष अनुभूती आहेत. मानवतावादी, विवेकवादी व लोकशाही जीवनमूल्यांची संवेदना आहे. शोषण झालेल्या माणसाच्या जीवनाला मुक्तीची दिशा देणारी डोळस जीवनदृष्टी आहे.

भारतीय समाज हा वर्णवादी व जातिवादी विचाराने साकारला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अतिशूद्र या वर्णांत येथील माणूस विभागला आहे. जन्मावर आधारित श्रेष्ठ-कनिष्ठत्व व आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय अधिकत्व प्रत्येक जातीला वेगवेगळे दिले आहेत. त्यामुळे बहुसंख्य लोक अत्याचाराचे, दारिद्र्याचे शिकार केले. मूठभर लोक अत्याचार करणारे व श्रीमंतीत लोळणारे सुखवस्तू ठरविले गेले. आधुनिक भारतीय चिंतनात फुले, आंबेडकर, आगरकरांनी सामाजिक न्यायाच्या परिवर्तन दिशा मांडल्या. मराठी कवितेत कवी केशवसुतांनी अन्त्यजाच्या मुलाचा प्रश्न, मजुरावर उपासमारीची पाळी, नवा शिपाई, तुतारी यासारख्या सामाजिक कवितांतून सामाजिक न्यायाची तुतारी फुंकली.

||धर्मशास्त्रांच्या अमानुष नोंदी||

डॉ. मच्छिंद्र चोरमारे



सामाजिक न्यायाला अधिक क्रांतिकारी आंबेडकरी कवितेने केले व मराठी कवितेला नवा क्रांती कवितेचा चेहरा दिला. त्याच क्रांतिविचाराला मच्छिंद्र चोरमारे यांनी धर्मशास्त्रांतील अमानुष नोंदी कोणत्या? धर्मशास्त्रांतील अमानवी अत्याचाराचा परिणाम कोणता? तो लोकजीवनाला दास्यात ढकलण्यात कसा झाला? तो प्रत्यक्ष अनुभव कवीने कविता लिहून वाचकाला दिला. मनुस्मृतीसारख्या धर्मशास्त्रात व त्यावर आधारलेल्या इतर धर्मग्रंथशास्त्रांतील अमानुष नोंदी यांनी माणसाच्या अत्याचाराचा कळस गाठला. तो अत्याचारी विचार हा शूद्र, अतिशूद्र, स्त्री या लोकसमूहाला कसा प्रत्यक्ष भोगावा लागला व आजही भोगावा लागतो त्याचे चित्रण त्यांच्या कवितेत आहे. कवीचे दारिद्र्य, अस्पृश्यतेमधून भोगलेला अत्याचार, धर्माचा जीवनाला व्यापणारा अपमान व त्यामधून बाहेर पडण्यासाठी दिलेला संघर्ष हे मराठी कवितेतील समाजजीवनचित्रण अद्‌भुत आहे. मराठी कवितेला नव्या जाणिवा व नवे परिमाण प्रदान करणारे आहे.

'सांगा धर्मशास्त्रांनो! सांगा!' या कवितेत कवीच्या मनातील वेदना मनाच्या धरणाची बांध-भिंत फुटावी व पाणी भरधाव फुटून वाहावं तशा वेदना प्रकटतात आणि अत्याचार करणाऱ्या धर्मग्रंथ, शास्त्रांना अनेक प्रश्न विचारतात

कोणी ओढल्या माणसावर जातीच्या रेघा?
कोणी पाडल्या समतेला विषारी भेगा?
सांगा धर्मशास्त्रानो! सांगा!

धर्मशास्त्रे कवीच्या प्रश्नांनी अबोल केली आहेत. कवीच्या चिंतनविचाराने धर्मशास्त्रे न्यायी आहेत की अन्यायी आहेत? या प्रश्नाचे उत्तरही कवी देतो :

नाक दाबून पाजले गढूळ पाणी की
खूपच जिव्हारी; लागतं धर्मशास्त्रांनो!

असंख्य लोकांच्या समाजजीवनाला धर्मशास्त्राने उद्‌ध्वस्त केले. असंख्य लोकांना जातीच्या कोंडवाड्यात बंदिस्त केले. असंख्य लोकांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अधिकार नाकारले. जे आजही गावकुसाबाहेर दास्याच्या रूपात भेटतात! जंगलात, अरण्यात कोंडलेल्या लोकांच्या दारिद्र्यात भेटतात! अज्ञानात व आर्थिक साधनांच्या अभावात वावरतात. कवीचे जीवन, त्याचा अनुभव, त्याची सामाजिक परिस्थिती, दारिद्र्य-अस्पृश्यतेच्या दलदलीच्या चिखलातून बाहेर पडण्यात गेली. आजही गावगाड्यात व शहरी झोपडपट्ट्यांमधून कवीच्या सामाजिक स्थितीचा अनुभव जिवंत आहे. त्या शोषणातून बाहेर पडण्यासाठी धर्मशास्त्राच्या अमानुष नोंदी समजून घेणे आवश्यक आहे. धर्मशास्त्रांचा अमानवी अत्याचार हा आशय कवितेतील प्राणतत्त्व आहे. या विचाराचा आशयच कवितेतील गाभातत्त्व आहे. आशय, विषय, संवेदना, भावना, अभिव्यक्ती यांचे रसायन म्हणजे मच्छिंद्र चोरमारे यांची कविता आहे.

'कवितेच्या कुशीतील अस्वस्थ धग', 'कुणाची शपथ घेऊन लिहायची कविता', 'संविधान पोखरणाऱ्या नोंदी', 'धर्म'; ....साठी कविता लिहिणाऱ्यांनो शस्त्राने अथवा निःशस्त्राने', 'हिटलर आणि क्रांतिविचार', 'गर्व', 'फसवणूक' इत्यादी कवितांमधून अत्याचाराचा अनुभव मांडला. त्या धर्मशास्त्राने व त्या धर्मशास्त्रानुसार चालणाऱ्या धर्माने लोकांचे जीवन व त्यांची विचारशक्ती कशी पंगू केली त्याचे समाजशास्त्रीय वास्तव मांडले. चोरमारे यांची कविता वाचून वाटते की अशी धर्मशास्त्रे ही 'धर्मशास्त्र' या पदवीला पात्र ठरतात का? 'शोषण' या पदवीची ती रूपे आहे का? याबद्दल चोरमारे यांची कविता विचार करावयास लावते. ही धर्मशास्त्रे अन्याय, अत्याचार,

अनुक्रमणिका

शोषण यांना जन्म देणारी विचारसरणी आहे हाच प्रत्यय कवी वाचकाला देतो. म्हणून चोरमारे यांची कविता ही विचारकविता जशी आहे तशीच मानवतावादी विचाराचे चिंतनकाव्य आहे. या चिंतनकाव्याने आंबेडकरी व समग्र मराठी भाषेच्या काव्येतिहासालाच प्रभावित केले आहे. कवितेची शीर्षके व त्यामधील काव्यजाणिवा मराठी कवितेला नवा आयाम देणाऱ्या आहेत. मराठी कवितेचे क्षितिज आंबेडकरी कवितेने विस्तारित केले. नव्या मानवतावादी व लोकशाही जाणिवांनी समृद्ध केले. शोषित भावभावनांचे व आशा-आकांक्षाचे चित्रण करून मराठी कवितेला नवे वळण दिले. त्यामध्ये कवी चोरमारे व 'धर्मशास्त्रांच्या अमानुष नोंदी' मधील कवितेचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी भोगलेले जीवन व त्यांना आलेला अनुभव हा समकालीन भारतीय समाजाचा आरसा आहे. त्यांनी तो काव्यात्म अनुभूतीतून मांडला आहे. ते 'संविधान पोखरणाऱ्या नोंदी' या कवितेत त्या अनुभवाचा प्रत्यय देतात. तो अनुभव धर्मशास्त्राच्या क्रौर्याचा आविष्कार आहे, कवीला पटलेला रक्ताळलेल्या वेदनेचा आहे. अनुभवाला व्यक्त करताना त्यांनी धर्मशास्त्र व समाजवास्तवाची अनुभूती दिली. ते म्हणतात :

अशा धर्मांध रानात जन्मलो की
इथे हवा जहर भरलेली
धर्मशास्त्रांच्या अमानुष फूत्काराने
माणसे द्वेषात मुरलेली
वाढता वाढता इतक्यांदा छाटला गेलो की
नव्या पालवीत येतो आहे छाटणीचाच रंग
धर्मशास्त्रांची वाळवी पोखरते संविधानाचे अंग



अशा काव्यात्म ओळींतून त्यांनी आपला समाजजीवनाचा अनुभव मांडला. आपल्या वाट्याला जगताना आलेले शोषण मांडले. धर्मशास्त्रे ही शास्त्रे मानवता, प्रेम, करुणा या विचारांची शिकवण न देता, माणसामाणसाला परस्परांचा जातीय श्रेष्ठ-कनिष्ठतेचा द्वेष शिकवितात आणि जे भारतीय संविधान समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, न्यायाची स्थापना करू इच्छिते, माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठित करू इच्छिते त्यालाही जातिवाद, शोषणवादी विचार वाळवी लागल्यासारखा पोखरतो. हे आजचे समकालीन समाजवास्तव कवी वाचकाच्या समोर ठेवतो. त्याला विचार करावयाला लावतो. विचारांची वलये वाचकाच्या मनात प्रस्फुटित करतो. म्हणून चोरमारे यांची कविता विचार कवितेचे रूप ठरते. आंबेडकरी कवितेने जे मराठी कवितेला समतेचे तत्त्वज्ञान दिले; नवे आशय, विषय, अभिव्यक्ती, जीवनदर्शनाचे नवे वळण दिले; समीक्षेचा नवा दृष्टिकोन दिला; साहित्याची भूमिका व प्रयोजन दिले त्या काव्य-साहित्यविचाराला ताकद देण्याचे कार्य कवी चोरमारे यांचीही कविता करते.

चोरमारे यांच्या कवितेत लोकशाहीवादी मूल्यांची दृष्टी आहे. सभोवतालच्या सामाजिक वास्तवाचे चित्रण आहे. कवी समाजजीवनात व शोषणवादी समाजस्तरातून कसा जगला, शिक्षण घेताना निरनिराळे अनुभव कसे आले, दास्यातून बाहेर पडण्यासाठी बौद्ध धम्म विचाराची कशी क्रांतिप्रेरणा मिळाली इत्यादी अनेक अनुभव विविध कवितेच्या विषयातून त्यांनी मांडले. धर्मशास्त्रांचा, समाजिक जीवनाचा, आर्थिक-अस्पृश्यतासारख्या जगण्याचा, शैक्षणिक जीवनाचा, प्रेमाच्या अनुभवाचा, नागपूरसारख्या शहरातील वास्तवाचा असे अनेक अनुभव त्यांच्या कवितेत आहेत आणि ते त्यांनी समर्थ काव्याविष्कारामधून मांडले आहेत. अनुभव व्यक्त करण्यासाठी त्यांच्या कवितेत ज्या प्रतिमा साकार झाल्या त्या संवेदनाक्षम आहेत. भावनांची वलये व विचारांची वलये वाचकांच्या मनात त्या समर्थपणे साकारतात.


धर्मांध रानात, अमानुष फूत्काराने इथे हवा जहर, नव्या पालवीत छाटणीचाच रंग, धर्मशास्त्रांची वाळवी, माणूस रुजवणारं सूक्तन्सूक्त, क्रांतीचं शिल्पकाम, जोहार, फडकं, झाडू, मडकं, क्रूर व्यवस्थेचा अंधार, झपाटलेल्या लेखण्या, सृजनाचं नवं गीत,

करुणामय हाक, क्रांतिलेखण्या, पूर्वजांचं दुःख, धर्माचे शेपूट, मुक्तीची मूळाक्षरे, फुलपाखरांचे लवलवते पंख, भुकेची कैफियत, वेदोक्त ऋ चाचं मोहळ, तारुण्य अभ्यासाच्या भट्टीत, गावची काटेरी वाट, अभ्यासाची किंगरी, प्रतिक्रांतीची रूढी- अशा कितीतरी प्रतिमा त्यांच्या कवितेत काव्यानुभवाची अनुभूती देतात. ही समग्र प्रतिमासृष्टी मोठी देखणी आहे. वाचकाला अस्वस्थ करून नवे चिंतन करावयास लावणारी आहे. खरेतर आंबेडकरी कवितेतील प्रतिमासृष्टीचा स्वतंत्र अभ्यास व्हावा, त्यामधील प्रतिमांद्वारे समाजजीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास मांडावा, सभोवतालच्या समकालीन जगण्याचा व धर्मशास्त्र-धर्म यांचा अन्वयार्थ लावावा एवढे सामर्थ्य आंबेडकरी कवितेच्या प्रतिमासृष्टीत आहे. त्या प्रतिमासृष्टीला योगदान देण्याचे कार्यही 'धर्मशास्त्रांच्या अमानुष नोंदी' हा कवितासंग्रह करतो.

'धर्मशास्त्रांच्या अमानुष नोंदी' हा संग्रह एकविसाव्या शतकाच्या आरंभीच्या काळात उदयास आला. २०१३ मध्ये प्रकाशित झाला. त्यामधील कवितेने भारताच्या प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक जीवनातील शोषित माणसाचे अंतरंग उलगडले. इतिहास, धर्मशास्त्र, समाजशास्त्र यांचा वाङ्मय जीवनाशी परस्परसंबंध असतो. ही भूमिका यामधून व्यक्त केली आहे. क्रांतिकारी जीवनदृष्टीचा प्रत्यय हा कवितासंग्रह देतो. म्हणून प्रस्तुत कवितासंग्रहातील कविता मराठी कवितेलाच निराळेपण प्रदान करणारी आहे. कवीच्या सामाजिक अनुभवाचे काव्यात्म चिंतनरूप ठरावे असेच तिच्या संवेदनांचे स्वरूप आहे.

• • •

अनुक्रमणिका



। ग्रंथचर्चा

शून्य एक मी :
आत्मपरीक्षणाचं अध्यात्म

▫ नीलिमा कुलकर्णी

प्रत्येक कवीचा स्वतःचा असा एक पिंडधर्म असतो. कवीने त्यानुसार पिंडधर्माच्या निष्ठेला जागून कविता लिहिली तर ती अक्षर ठरते. उत्तमच असते. पी. विठ्ठल यांच्या कवितेबाबत हेच घडलं आहे. कवी आपल्या पिंडधर्माला जागून कविता लिहितो आणि त्यांची कविता अंतरंगात उतरत जात नाही तर घुसत जाते. ही कविता स्वतःला व त्याबरोबर स्वतःच्या काळजाला खोल खोल खोदत जाते. आत्मप्रतिष्ठेला अक्षरशः सोलत जाते. उपहासाची जळजळीत किनार लाभलेली ही कविता अंतर्मुख केल्याशिवाय राहात नाही. 'शून्य एक मी' हा पी. विठ्ठल यांचा कॉन्टिनेंटलने प्रकाशित केलेला भारदस्त कवितासंग्रह.

'प्रार्थनास्थळात भरेल अॅटमबाँबचे प्रदर्शन
शाळा-कॉलेजात रेखाटली जाईल बुलेट्सची रांगोळी
बसमध्ये, ट्रेनमध्ये बलात्काराची प्रात्यक्षिकं होतील'

(अहंकाराचा, पृ. १०३)

असं भयाण वास्तव मांडून संपूर्ण मानवजातीलाच सावध करू पाहणारा एक चिंतनशील कवी या पुस्तकात प्रकट झाला आहे.

'बे फाटक्या... अनुभवाची
प्रतारणा न करणाऱ्या
विलक्षण प्रतिमा वापरणाऱ्या रोमँटिक
दुर्बोध सामाजिक बोक्या.
सोडून दे लिहिणं
कवितेच्या कागदावर मुततो कोण?... ' (पृ. १०८)

अशा प्रचंड उपहासाने कवी बदलत्या अभिरुचीबद्दलचा अगतिक वैताग प्रकट करतो तेव्हा या बदलाची 'डेंजरता' काळजात घर करते. पी. विठ्ठल यांची कविता सर्वसमावेशक कविता आहे. या कवितेला प्रचंड झेप आहे. प्रत्येक छोट्या प्रसंगापासून ते मृत्यूपर्यंतचा अवकाश ती आपल्या प्रतिभास्पर्शाने भरून काढते. उदा. 'सिग्नल बंद झाल्यावर' पासून 'आपण सारे शून्य'पर्यंतचा प्रवास ही कविता लीलया, एका झपाट्यात आत्मवंचनेचे बुरखे फाडत करते. हा झपाटा विलक्षण आहे व वाचकांना तो झपाटणार आहे.

'अभिव्यक्तीचे चोरटे डोळे परत परत बघत राहतील
भास-आभासांच्या पोकळ सावल्या परत परत छळत राहतील
गरजांच्या शब्दकोशातच जर पेरून ठेवली असेल खजुराहो

अनुक्रमणिका

तर अनुभवाच्या हजार शब्दांचे हवन केले तरी
मनातला राक्षस मरेल काय?...'
(मनातला राक्षस, पृ.२५)

पी. विठ्ठल यांच्या कवितेला आत्मपरीक्षणाचं एक उदात्त अध्यात्म लाभलेलं आहे. ही कविता सतत स्वतःला, स्वतःच्या पिढीला, या पिढीच्या उच्चवर्गीय जाणिवांना, मध्यमवर्गीय भावनांना, आपल्या बदलत्या अभिरुचीला, तुकाराम, कबीरांपासून न्यूडपर्यंतच्या आपल्या डिग्रेडेशनला सतत तपासत राहते, तासत राहते. हे आत्मपरीक्षण वैश्विक होत जातं, अधिकाधिक व्यापक व सखोल होत जातं. अत्यंत संयत, सखोल, चित्रात्मक अशी शैली आहे. पी. विठ्ठल यांची कोणत्याही अभिनिवेशाशिवाय, आकांताशिवाय ही कविता आधुनिक पिढीच्या, काळाच्या जगण्यातलं बाजारीकरण, आत्मकेंद्रित वृत्ती, संस्कृतीपासून तुटलेपण, ओलाव्याचा अभाव, वैतागसुद्धा व्यक्त करते.


म्हाताऱ्या कोताऱ्याची
समर्थ विद्यापीठं कालबाह्य
झाल्यापासून
संस्काराचं शिक्षण मिळत
नाहीय कुठल्याच खाजगी वा
सरकारी शाळा-कॉलेजातून

ही खंत व्यक्त करत असताना 'काहीही असो सुरुवात तर करायलाच हवी आपण' असं उगवतीचं चित्र काढायला कवी धजावतो. सगळं उद्ध्वस्त होत आहे. ऱ्हास पावत आहे. अंतर्बाह्य पडझडीतही आणि 'केव्हाही आपल्या आवाजाचं एन्काउंटर होईल' हे माहीत असूनही कवी जेव्हा म्हणतो :

आपण आपल्या तळाशी थोडं डोकावून बघू या
आपण एखादी कविता लिहू या

तेव्हा पी. विठ्ठल यांच्या उद्विग्नतेमागे, वैतागामागे, उद्ध्वस्तेच्या व मूल्यऱ्हासाच्या चित्रणामागे ठाम उभा असलेला कवितेचा आशावादच आहे हे अधोरेखित होते; किंबहुना आपण काहीतरी केले पाहिजे, सुरुवात केली पाहिजे, भाषा, संस्कृती, मूल्य, आत्मभान, बापाचं थोरपण आणि हृदयाशी हृदयाचा दोन मिनिटं तरी होणारा संवाद टिकवलाच पाहिजे. यासाठीच ही पडझडीची दाहकता, मूल्यऱ्हासाचा, बाजारीकरणाचा, आत्मकेंद्रीपणाचा, आत्मवंचनेचा पसारा कवी स्वतःला व स्वतःच्या पिढीला दाखवतोय.

या कवितासंग्रहातील प्रत्येक कवितेवर स्वतंत्र लेखन करता येईल. अशा त्या उत्तम व आशयगर्भ आहेत. 'तर सांगायची गोष्ट ही की', 'श्रद्धांजलीचे मौन पाळताना', 'आपण मध्यमवर्गीय झालो आहोत' अशा सगळ्याच कविता उपहासात्मकता, चित्रशैली, संयत मांडणी व आशयाच्या दृष्टीने अत्यंत सरस आहेत. कवीला कोणत्याही विषयाचे वावडे नाही, हे विशेष आहे. 'जेव्हा एकटे असतो आपण'सारखी नितांत सुंदर कविता लिहितानासुद्धा पी. विठ्ठलची शैली अति रोमँटिक, उधाणलेली, हळविली वगैरे होत नाही आणि तरीही तिचा अनुभव गोड वाटतो. 'अवघड असतं खूपच तिच्याशिवाय घरातलं अबोल जगणं' हे साधं वाटणारं वाक्यही असह्य एकटेपणाची अनेक वलयं अंतर्मनात उठवू शकतं इतकी ही शैली परिणामकारक आहे. 'मनातला राक्षस' सारखी कविता 'एवढ्या निःस्पृह नैतिकतेची खरंच गरज असते काय संस्कृतीला?' या एका प्रश्नाने संस्कृतीचा भंपक डोलारा नजरेसमोर उभा करते. 'खरंच एवढी निःस्पृह नैतिकता असते का संस्कृतीत?' हा अंतर्भूत प्रश्न डोक्यात उभा करते. मुली, चिमुकल्या मनात, भाषा या मिताक्षरी कविताही छान परिणाम साधतात.



'अहंकाराचा ऑक्टोपस माणसाला गिळत जाईल' ही कविता दाहक वास्तव, भयाणता, निर्जीव नाती, चंगळवाद, क्रूरता या सगळ्यांचा परिपाक आहे आणि हे सगळं भाकीत खरं ठरणारा काळ फार दूर नाही. हाकेच्या अंतरावर आलाय याची सुन्न करणारी जाणीव ही कविता देते. पण समाजाला भान आहे का? अहंकाराच्या ग्लोबलायझेशनच्या सुखवस्तुपणाच्या गरगरत्या वादळात स्वतःचा चेहरा हरवलेला समाज बरं-वाईट ओळखण्याच्या सगळ्या हद्दी पार करतोय याची

अनुक्रमणिका

हतबलता पी. विठ्ठलची कविता उभी करते. दोन जगांची न सांधणारी दरी कवीला व्याकूळ बनवते. पण ही व्याकुळता डोळे पाणावणारी नाही तर 'घरापेक्षा थोर असतो बाप' असं खडसावणारी, अंबानीच्या सत्तावीस मजली महालाची गुळगुळीत चर्चा करणारे, सचिन, सलमान, करिना किंवा बिग बीच्या फिटनेसचं कौतुक करणारे बोलत नाहीत दुसऱ्या जगताच्या माणसाबद्दल' असं झणझणीत अंजन घालणारी आहे. दुसऱ्या जगातली माणसं अगदी किड्यामुंगीसारखी मरतात व तसंच जगतात याचं जराही स्मरण न ठेवणारं एक उन्मत्त, आत्मकेंद्री, स्वतःच्या मुळांपासून तुटून अधांतरी जगणारं एक जग कवी तंतोतंत डोळ्यांसमोर उभं करतो आणि तेही कुंचल्याच्या एका फटकाऱ्यानं चित्रकाराने रंगवावं इतक्या सहज.

'हार्ट अटॅकनं सासरा मेला
गुरं राखून राखून चुलत मेला
इतका क्रूर कसा असतो सामान्यांचा मृत्यू?'
आणि
'कपाटातल्या हँगरला टांगून ठेवावा
महिनोन्महिने... इतके अधांतरी जगणे'

या दोन जगातलं तुटलेपण इथं किती विदारकपणे व्यक्त झालंय ते मुळातूनच पाहायला हवं. धर्मश्रद्धेच्या बाजारीकरणाचा, अंधश्रद्धेचा, देवभोळ्या कल्पनांचा व सामान्यांच्या धर्मश्रद्धेचा गैरफायदा घेणाऱ्याचा एक प्रांत या कवितेत आहे. कवीने हे वास्तव खूप वेगळ्या पद्धतीने कवितेत व्यक्त केलं आहे.

'शेवटी अध्यात्माकडूनच करून घेतात
ब्रेनवॉशिंग... करते असते अखेरीस
असं कोडं त्याला न उमगणारं आहे'


'बाजारू प्रवचनांच्या भ्रामक उपदेशातून' ही कविता अनेक प्रश्न उभी करते. 'मग कुणी लादून दिले माणसाच्या मेंदूवर हे भक्तीचे विश्वव्यापी ओझे' असं विचारून कवी हजारो काळापासून होत जाणारं धर्माचं भांडवलीकरण मांडतो.

या कवितेची भाषा काळाला साजेशी आहे. सहज व संवादी आहे. प्रतिमा, प्रतीकं नवी पण अनोळखी नाहीत. ती दुर्बोध नाहीत. उदा. गुंतागुंतीचा समुद्र, कौतुकाच्या कवट्या, डौलदार गढी, कविता थेट मेंदूपर्यंत पोहचवणारी आहेत. काही कविता जरा जास्त दीर्घ आहेत आणि काही थोड्याशा गद्यात्म पण तरीही कवितेची आंतरिक लय हरवत नाही. पूर्ण कवितासंग्रहाचा एकच एक असा सेंद्रिय परिणाम वाचकांवर होतो. हे विशेष. कारण कविता वेगवेगळ्या विषयांवर असतात व त्यांचा एकत्रित परिणाम व्हावा ही अपेक्षा नसते.

ग्लोबलायझेशन, बाजारीकरण, चंगळवादी वृत्ती, कुठल्यातरी अनामिक भयाण आणि भपकाऱ्यानं पछाडलेपण हे सगळं कवी व्यक्त करतो; पण त्याला याही पलीकडे पाहायचं आहे ही भूमिका या संग्रहात जाणवते आणि ती फार महत्त्वाची, आशावादी व कुठल्याही संवेदनशील माणसाला हलवून जाग करणारी आहे.

'नव्या वसाहतीचे अंदाज बांधणारा' हा कवी जग असं आहे म्हणून नुसती हेटाळणीवादी प्रतिक्रिया नोंदवत नाही तर त्याला सृजनाची आस आहे. नवं निर्माण करण्याची त्याची तयारी झालेली आहे. म्हणूनच तो 'मला तर मांडायचंय माणसाच्या भाषेचं आदिम दुःख' म्हणतोय, 'त्याच्यापर्यंत पोचलेला निःशब्द मनाचा आकांत' तो रसिकांपर्यंत पोचवतोय. 'हंगाम जरी बेभवरशाचे' असले तरी त्याला एक नवी सुरुवात करायची आहे. आज जरी फेसबुकवरच्या निर्जीव चेहऱ्यांशी दोस्ती करणारी मुलं त्याला अस्वस्थ करीत असली तरी दृष्ट लागू नये म्हणून जपणारं गणगोत त्यांना समजून सांगण्याची सुरुवात त्याला करायची आहे. आरोग्यदायी जगण्यासाठीच्या लहानसहान कृती तो सुचवू पाहतोय. 'व्यभिचाराची घाण गाडून टाकावी उकिरड्यात' या पुढच्या पायरीच्या जर्दानं पिवळे झालेले दात घासून पुसून स्वच्छ करण्याची महत्त्वाची कृतीसुद्धा तेवढ्याच काळजीनं कवी सांगतो. मानगुटीवरचे देव काढून सरळ सरळ माणुसकीची प्रतिष्ठापना करण्याचे संकेत देणारी ही कविता आहे. बोकडाच्या डोळ्यांतल्या असीम करुणेला व निरागसतेला न विसरणारी व ती कोवळीक जपली जावी, तुटणारी माणसं पुन्हा मुळांकडे परतावीत व ओल कायम राहून सृजन घडत राहावे. यासाठी या भयाण काळाच्या उंबरठ्यावर एक कोवळी कविता ठेवणारा हा कवी नक्कीच 'शून्य एक मी'. मुलं, पुढची पिढी, त्याच्यानंतरची प्रगल्भ पिढी अशी क्रमांकाची व उत्थानाच्या स्वप्नाची चढती कमान रेखाटण्याचा प्रयत्न करत असावा, असे वाटते.

• • •



| ग्रंथचर्चा

'काळोख गडद होत चाललाय' : अस्वस्थ मनाचा कोलाहल

डॉ. पंडितराव शा. पवार

तरल प्रतिभेचे कवी गिरीश सपाटे हे नाव मराठी साहित्य क्षेत्रात आपली स्वतंत्र नाममुद्रा घेऊन प्रसिद्ध आहे. 'मर्मबंध' या कवितासंग्रहाच्या निर्मितीनंतर काव्यरसिकांच्या त्यांच्यासंबंधीच्या अपेक्षा वाढल्या तर प्रा. कृष्णा चौधरी यांच्या समग्र साहित्य समीक्षेमुळे एक विलक्षण आणि समतोल समीक्षक म्हणून साहित्यप्रेमींना त्यांचा परिचय झाल्यावर आता 'काळोख गडद होत चाललाय' या समाजजीवनातील विविध क्षेत्रांतील कोलाहलाला शब्दबद्ध करणाऱ्या कवितासंग्रहामुळे एक व्यापक सामाजिक जाणीव असलेला समाजमनस्क आणि प्रगल्भ कवी म्हणून त्यांची ओळख अपरिहार्य आहे.


व्यक्तिगत आणि समाजजीवनातील भल्याबुऱ्या अनुभवांशी प्रामाणिक राहून सहज सोप्या व्यवहारातील भाषा, प्रतिमांच्या माध्यमातून त्यांची कविता येथे अभिव्यक्त झालेली आहे. कवितासंग्रहाच्या शीर्षकातूनही एकंदर काव्याशयांचा वाचकांना प्रत्यय यावा इतके हे नाव अन्वर्थक आहे. उण्यापुऱ्या पन्नास कविता असणाऱ्या या संग्रहात कुटुंब, प्रेम, निसर्ग अशा विषयांवरील नितळभाव व्यक्त करणाऱ्या काही कविता आहेत. पण त्या कवितांत ते फारसे रमलेले नाहीत. समाजजीवनातील अस्वस्थता आणि भयावहता पाहून कवीचे मन गोंधळून जाते. ही अस्वस्थता निर्माण होण्यामागची जीवनाची प्रचंड गती, स्पर्धा, नीतिमूल्यांचा ऱ्हास आणि पर्यायाने या सर्वांना सजग ठेवणारे ग्लोबलायजेशन यामुळे हा कवी माणसाच्या आंतर्बाह्य विश्वाचा शोध घेऊन त्याला दिसलेले भडक वास्तव येथे सामान्य माणसांच्याच भाषेत व्यक्त करतो. सभोवतालचेच नव्हे तर प्रत्यक्ष गावाचेही 'भोगल्या आसक्तीचे' वास्तव व्यथित करते.

माझ्या गावचे मांगल्य शुचित्व। अन् अंतरीच्या शांततेला तडे देतात।
आता कोणते अस्त्र धारण करू नग्नतेचे?।
काळोख गडद होत चाललाय गावाभोवतीचा। (पृ. २६)

या काव्यपंक्तीतून कवीच्या सामाजिक जाणिवेचा प्रत्यय येतो.

घराचे घरपण जपणारी, मायेचा सागर बनणारी, घराचे गोकुळ करणारी 'आई' आज नसताना हा कवी निर्वासिताचा अनुभव घेतो. घराच्या बागेत बायकोने जोपासलेला 'मनिप्लांट' कवीने कापताच बायकोचे हंबरणे आणि किंचाळणेही असह्य व्हावे आणि भावनिक नाते तुटल्याची उणीव भरून काढण्यासाठी कवीनेच मनिप्लांट व्हावे; हा कौटुंबिक नात्याचा भावबंध मनाला चटका लावणारा आहे. 'लेहंगा' ही त्यांच्या विविध अवस्थांतून काव्यविषय होतो. सुखाचे ढग पांगल्यावर हा कवी दुःखाशी जुळवून स्वप्नांच्या हत्तीवरून 'गाळ' उपसून जीवनात सुख आणू पाहतो.

विश्वाला बिलगून एकरूप होऊ पाहतो. 'मज झिंग नव्या व्यथेची। तुला चंद्राचे गं लाड' हा प्रेमानुभव कवी सृजनशीलतेतूनच घेतो. त्याची शब्दव्याकुळता त्याला अस्वस्थ करते. श्रद्धा-अंधश्रद्धेच्या आवर्तात सापडलेला कवी पिंडाला कावळा शिवत नाही हा श्रद्धाभाव तर अनादी आहे, अखेरीस 'मीच शिवतो आता माझ्या पिंडाला कावळा बनून' असे म्हणून कर्मविपाकाच्या कोंड्यातून स्वतःची सुटका करून घेतो. येथील कवीचा भावनिक कोंडमारा भूत-वर्तमानातून सजग करतो. दीपपर्वाचे महत्त्व, आनंद आणि व्यवहार त्यांचे प्रत्ययकारी चित्रण कवी 'माझं बारकं पोर' या आत्मनिष्ठ कवितेतून करतो. दिवाळीतील आनंद घेणारे खेळकर मूल आणि समाजातील जटिल, व्यामिश्र आणि निर्दयी व्यवहारी माणूस यांचे विरोधाभासात्मक चित्रण कवी आत्मप्रत्ययाच्या पातळीवर करतो एकीकडे प्रकाशाचा उत्सव आणि दुसरीकडे 'विचारांची ड्रेनेज सिस्टीम फेल' हा अनुभव घरातही आता अटळ झाला आहे. वरील- सारख्या काही आत्मनिष्ठ कविता कवीने प्रासादिक शब्दांत लिहिल्या असल्या तरी, हे जग कवीला अपुरे मर्यादित वाटते हे मात्र खरे - समाजमनातील विसंगती, राजकारणातील बेगडी वर्तन आणि दिखाऊ राष्ट्रप्रेम या विषयांकडे हे कविमन अधिक तीव्रपणे अभिव्यक्त होताना दिसते.



आज ग्रामीण भागातील शेतकरी दुष्काळ, नापिकी, बिगरमोसमी पाऊस, शेतमालाला भाव नसणे इत्यादींमुळे आत्महत्या करीत आहेत. जागतिकीकरणाची झळ या भागाला बसून शेतजमिनीचे बिगरशेतीत रूपांतर होऊन शेतकरी अल्पभूधारक होऊन कफल्लक होत आहे. दुष्काळाची काहिली नष्ट होण्यासाठी हा कवी -

'गर्भात ऋतूंच्या नवी। केव्हा पाणावेल ओस कोरड्या ह्या डोंगरांचा। कसा फिटेल नवस (पृ.७२)

अशी आस बाळगतो आणि तिकडे शहरात, निमशहरात जागतिकीकरणाने हैदोस घातला आहे. माणूस आपले माणूसपण विसरत चालला आहे. स्वार्थ आणि चंगळवादात तो हरवत चालला आहे. नीतिमूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. त्यामुळे भावनाप्रधान माणूस संवेदनाविरहित वस्तू झाला आहे. यामुळे संस्कृती सपाट होऊन सवंग राजकारणाला प्रतिष्ठा प्राप्त होत आहे, हे आजचे समाजातील दाटलेल्या काळोखाचे भयावह चित्र वाचकांनाही अंतर्मुख करते :

'बुवाचे कीर्तन बाईचे नर्तन। मुलांचे वर्तन, प्रेमाचा संग, पाण्याचा तरंग। भाकरीचा गंध। ज्ञानेश्वराची ओवी। तुक्याचा अभंग। मायेचा स्पर्श, भाषेचा उत्कर्ष। जगण्याचे आदर्श। जीवनाचे संदर्भ। सारेच बदलताहेत भराभर। जगाच्या गतीने... (पृ. ७)

जगाची एकंदर स्पर्धेची, स्वार्थाची आणि माणुसकीशून्यतेची गतीच येथे कवीने अधोरेखित केली आहे. जागतिकीकरणाच्या 'गती'ने सर्व समाजच गिळंकृत होतो आहे. या जागतिकीकरणाच्या भवतालात 'गाव' त्रस्त होत असताना 'कुणीच कसं हलत-डुलत नाही?' हा प्रश्न कवीला सतावतो. कारण 'आमचं ग्लोबल गावकूस' आजही उघड्यावरच आहे. गॅट करार, इलेक्ट्रॉनिक साधने इत्यादींनी गावावर नको तितका अंमल बसविला आहे. त्याचा गावाला अर्धामुर्दाच लाभ होत असून गावकरी ना घरचे ना घाटावरचे अशी ही कुचंबणा. कवी समुद्रमंथनाच्या अपेक्षेतून दारिद्र्य दूर करू पाहतो. पण तेही आता स्वप्नच ठरणार आहे. कारण पुस्तककेंद्री शिक्षणही आज मुकेच झाले आहे. जीवनात श्वास घेण्यासाठी, सुखाच्या शोधासाठी माणसं आज -

लखलखाटाला भुललेली। यंत्रवत रोबोटसारखी।
माणूसपण हरवलेली। अगदी रोबोटसारखी।
केवळ बदलते लोकेशन। किती धावताहेत हे रस्ते?।
किती पळताहेत ही माणसे। (पृ. १२)

या काव्यपंक्तीतून कवीने सामान्य माणसांच्या जीवनातील आक्रोश नेमक्या शब्दांत व्यक्त केला आहे. आजच्या 'सेल्फी'च्या जमान्यात माणूस स्वतःच्या संकुचित दृष्टीने 'स्व' आणि 'स्वत्वा'चा अर्थ लावून 'सेल्फीच्या रूपानं सेल्फीश' झाला आहे. हा कवीचा निष्कर्ष म्हणजे आजच्या समाजाचे सूक्ष्म निरीक्षण आहे. या माणसाचे सर्वच जगणे, वागणे, पाहणे, मरणेही

अनुक्रमणिका

'सुपरफास्ट' झाले आहे. यात कुणाचेही दुमत होणार नाही. खरेतर काही कवी प्रतिभेच्या साहाय्याने कल्पना-विश्वात रमतात; पण हा कवी मात्र सभोवतालचे रखरखते आणि भडक वास्तव प्रज्ञेच्या साहाय्याने बोलते करतो. मोठी माणसेच नव्हे तर शाळेतील चिमुरडी मुले आणि त्यांची इवलीशी बोटेही आता लॅपटॉप, इंटरनेट इत्यादी साधनांनी 'व्हर्चुअल सेक्सच्या जमान्यात' प्रवेश करतात. त्यांच्यात ई-वाऱ्यामुळे 'हिंसा' शिरल्याने पालक मात्र 'हतबल' कमजोर आणि 'एनर्जी' हरवून बसू लागलेत. हाही विज्ञानाचा शाप की वरदान? - हा प्रश्न कवीला अस्वस्थ करतो :

ज्याम टेंशन घेतात लोक।
अन् ज्याम टेंशन देतात लोक।
कुणालाही, कुठेही अन् कसेही। (पृ. २०)

'हप्त्याहप्त्यांमध्ये विभागलं गेलंय जीवन।
जीवन हप्तामय, हप्तामय जीवन।
मरेन झटक्यात की हप्त्याहप्त्याचे मरण।
मी ग्लोबल होत चाललोय हप्त्याहप्त्यानं...
(पृ. २१)

भाकरीचा प्रश्न आऊट ऑफ कव्हरेज।
दारिद्र्याच्या प्रश्नाला रेंज मिळत नाही।
बेकारीच्या प्रश्नाचे तर टावरच नाही।
मजुरांचा प्रश्न भोसडा उदास।
शेतकऱ्यांचा प्रश्न भोसडा उदास (पृ. २७)

धक्क्यानं एका भुईसपाट होईल घर कधीही अन्
उरेल एक निर्जीव तुकडा जमिनीचा
(पृ. २९)

काहीही होत असतं घरात अन् वातावरणात
कुणीच कसं उरलं नाही भरवशाचं? (पृ. ३८)

वरील काव्यपंक्तीतून आजच्या समाजजीवनाचे, सांस्कृतिक, राजकीय जीवनाचे विदारक सत्य कवीने अतिशय भेदक शब्दांत व्यक्त केले. त्यावर भाष्य करण्याची गरज वाटत नाही. प्राप्त परिस्थितीचा स्वीकार करून ती सुखावह जीवनासाठी परावर्तित करण्याऐवजी आजच्या ग्लोबल जीवनाने सामान्य माणूस घायाळ झाला; एवढेच नव्हे तर, तो या प्राप्त परिस्थितीच्या हातचे बाहुले झाला आहे. परिस्थितिशरणतेपेक्षा त्यावर मात करण्यासाठी तोच अधिक गर्तेत बुडत आहे, हेच कटुसत्य कवीने प्रकट केले आहे.

देश म्हणजे देशातील माणसे. देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी अनेकांनी जीवन समर्पण केले. त्यांची साधी आठवणही आता केली जात नाही. स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताकदिन या दिवसांच्या नावाने 'पार्टी-शार्टी' करण्यात येते. अशी बेगडी राष्ट्रभावना आज व्यक्त केली जाते. समाजातील वास्तवदर्शन घडविताना कवीने देशाची आणि नागरिकांची वास्तवता येथे प्रखर शब्दांत व्यक्त केली आहे. आपला संस्कृतिसंपन्न देश आता अर्थहीन रेघोट्यांसारखा गिचमिड झाला आहे. दिल्लीत-गल्लीतील भांडणे, चैनलवरील उथळ राष्ट्रप्रेम आणि युद्धाचे आवाज यामुळे देशाचे स्वत्वच नामोहरम होत आहे. अतिरेकी, उग्रवादी, नक्षलवादी यांच्या कारवाया आणि भ्रष्टाचार, बुवाबाबा, घोषणाबाज राजकारणी, मवाली इत्यादींमुळे देशाची आज अवकळा कशी झाली याचे चित्रण निव्वळ विशेषणांनी कवीने यथार्थपणे अभिव्यक्त केले आहे. माणुसकीची मुले मुळासकट दडपली जात आहेत. प्रचंड लोकसंख्या, त्यातून निर्माण होणारे असंख्यप्रश्न, परग्रहावरही वास्तव्याची स्वप्ने पाहणारी, रस्त्यांवर किड्या-माकोड्यांसारखी वळवळणारी माणसे हे आजच्या 'डिजिटल इंडिया'चे चित्र कवी शब्दबद्ध करतो. 'मूल्यहीनतेच्या अस्मानी-सुलतानीच्या'प्रचंड दबावात जागतिकीकरणात आपल्या देशाचे काय होईल हा प्रश्न कवी पुढे करतो. लिव्ह इन रिलेशनशिप, स्वैराचार, व्हॉट्सॲपचा दिवस, टेन्शनग्रस्त माणसे हे आपल्या देशाचे असुरक्षित वास्तव कवीने समाजातील रस्ते, बस स्टॅन्ड, गल्ली, रेल्वे स्टेशन येथील सर्व प्रकारच्या माणसांच्या भाषेत मांडले आहे. समाजातील इंग्रजी शब्द कवितांत योजून समाजवास्तव अधिक उघडे केले आहे. हे वास्तव व्यक्त करण्यासाठी आवश्यक उत्कट संवेदनशीलता आणि व्यापक समष्टीच्या मनाचा वेध घेण्याचे बौद्धिक सामर्थ्य या कवीजवळ आहे. आत्मनिष्ठेबरोबरच बाह्य समाजचित्रण करण्याची व्यापकता लक्षणीय आहे.

सामान्य माणसाचे मन निकोप राहणे आणि समाजजीवन सुखी, आश्वासक असणे हे खऱ्या कल्याणकारी व्यवस्थेचे फलित असते. सर्वच स्तरांतील समाजजीवन आज उद्ध्वस्त होत आहे, याचे यथार्थ चित्रण करण्यात कवीला यश आले आहे. त्यामुळे ते

अनुक्रमणिका

मुक्तशैलीत व्यक्त झाल्याने काही ठिकाणी व्याख्यानात्मक झाले आहे. त्याचा परिणाम कवितेच्या अंतर्गत लयीवर काहीसा झाला आहे. विचारांची साखळी सलग असली तरी ती काही ठिकाणी तुटते. मात्र त्यांची प्रेमभावना, निसर्गदृश्यांची सौंदर्यवादी कविता गेय झाली आहे. त्याचप्रमाणे 'साय', 'कालसर्प' या अभंग वृत्तातील कविता सुंदर आहेत.

'चंदनाचे लेप। बाहेरी लिंपावे।
आत उगवावे। कालसर्प'

हा विरोधी विचार व व्यूह अर्थबहुल झाला आहे. डॉ.पी. विठ्ठल या सुप्रसिद्ध कवी आणि समीक्षक यांच्या शब्दांत सांगायचे तर, 'ही कविता बाजारीकरणाने निर्माण केलेल्या विविध पैलूंच्या मनोविकारांचे विश्लेषण करते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय कोलाहलाने हवालदिल झालेल्या वर्तमानाला शब्दबद्ध करते. सामान्य माणसाचा पेच हा कवितेच्या केंद्रस्थानी आहे. या माणसाचे विकल, परात्म आणि असहाय होत जाणे कवीला अस्वस्थ करणारे आहे.' डॉ.पी. विठ्ठल यांनी अर्थपूर्ण शब्दांत कवितेचे मूल्यमापन केले आहे.

ग्रंथाचे निर्मितिमूल्य आकर्षक असून श्री. प्रदीप खेतमर यांचे काळोखाची पार्श्वभूमी असलेले मुखपृष्ठ काव्याशय सूचित करण्याच्या दृष्टीने अन्वर्थक आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर १९९२ नंतर अनेक कवींनी अर्थवाही आणि समर्थ कविता लिहिल्या आहेत. त्या कवींच्या मालिकेत गिरीश सपाटे या उमेदीच्या आणि प्रतिभावंत कवीची आणि त्याच्या आशयघन कवितेची भर पडली आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

• • •

लेखकांसाठी सूचना

- साहित्य कागदाच्या एकाच बाजूने व सुवाच्य अक्षरांत लिहिलेले किंवा संगणकीय अक्षरजुळणीच्या स्वरूपात पाठवावे.
- लेखकांनी 'युगवाणी'साठी लेखन पाठविताना एक स्थळप्रत आपल्याजवळ राखून ठेवावी.
- 'युगवाणी'साठीचे लेखन इतरत्र प्रकाशित झालेले नसावे. लेखनाची छायाप्रत (Xerox) पाठवू नये.
- पत्रव्यवहारासाठी पुरेसे टपाल जोडावे. भ्रमणध्वनी क्रमांक वा ई-मेल दिल्यास उत्तम.
- आपले लेखन मराठी प्रमाणलेखनाच्या नियमांनुसार असावे. तसेच संपादकांना संबोधणारे पत्र जोडावे.
- 'युगवाणी'ला नव्या प्रवाहांचे, नव्या जाणिवांचे आणि सर्जनाच्या नव्या शक्यता धुंडाळणारे सशक्त लेखन हवे आहे.
- लेखकांनी आपले लेखन 'संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर - ४४० ०१२' या पत्त्यावर पाठवावे.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे **ग्रंथ** ॥ सहवास ॥ वाचन संस्कृतीचे निवांत स्थळ

महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी स्मृती सार्वजनिक वाचनालय आणि
विद्वत्‌रत्न डॉ. के. ल. (भाऊजी) दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय
ह्यांचा संयुक्त उपक्रम : ग्रंथसहवास

कार्यवृत्त

(ऑक्टोबर २०१७ ते डिसेंबर २०१७ या काळातील)

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१७

१४ ऑक्टोबर २०१७ - भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन, 'प्रिय डॉ. कलाम' यांना अनौपचारिक समस्याविषयक पत्र, या स्पर्धेचे आयोजन शालेय विद्यार्थ्यांसाठी करून साजरा करण्यात आला. अध्यापक विद्यालय, नागपूरच्या दीक्षा उके व मनोज्ञा वैद्य यांनी विभागून प्रथम क्रमांक प्राप्त केला. डॉ. अनिल नितनवरे यांनी परीक्षक म्हणून पत्रांचे परिशीलन केले.

दुसऱ्या उत्स्फूर्त अभिव्यक्ती या स्पर्धात्मक पातळीवर कलामांचे 'अग्निपंख' व त्यातील प्रसंग या विषयावर विविध वयोगटांतील विद्यार्थी व शिक्षक यांनी सहभाग घेतला. परीक्षक म्हणून अरविंद पुराणिक, डॉ अरुंधती वैद्य आणि जयश्री रॉबर्ट यांनी काम बघितले. सोमलवार हायस्कूल, रामदासपेठ या शाळेची गार्गी भाकरे हिला प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव खोडे व प्रतिमा पाटील यांनी संयुक्तपणे केले. पुरस्कार म्हणून विजेत्यांना मराठी शब्दकोश भेट देण्यात आला. कार्यक्रमाच्या अतिथी डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांनी उपस्थितांशी वाचन संस्कृतीविषयी दिलखुलास संवाद साधला. कार्यक्रमात साम्राज्या देशमुख, सारीका वंजारी, मेघा ठाकरे, सुमेध तायडे, संध्या देशपांडे, सीमा गोडबोले, अनुजा सहस्रबुद्धे इत्यादी उपस्थित होते.

२५ ऑक्टोबर - ग्रंथपूजन

विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथसहवासामध्ये पंचमीला ग्रंथपूजनाचे आयोजन करण्यात आले. त्यात भारतीय संविधान, ज्ञानेश्वरी, भगवत्‌गीता, रामायण व महाभारत अशा सिद्ध ग्रंथांचे दस्तुरे दाम्पत्य व पांडित दाम्पत्य यांच्या हस्ते ग्रंथपूजन करण्यात आले. स्मिता खनगई यांनी ग्रंथाची विधिवत पूजा केली. ग्रंथपूजनाला कार्यालयातील पदाधिकारी तसेच ग्रंथालयातील वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

२४ नोव्हेंबर - संविधान दिवस

संविधानदिनाच्या पूर्वसंध्येला वि.सा. संघाच्या ग्रंथसहवासमध्ये संविधानदिनानिमित्त 'दिव्यांगताविषयक कायदा आणि संविधान' आणि 'आमचा समाज आणि दिव्यांगता' या विषयावर अनंत ढोले आणि उत्तरा पटवर्धन यांनी आपले अनुभव आणि विचार व्यक्त केले. अनंत ढोले स्वतः अपंग असल्यामुळे त्यांच्या अनुभवकथनाला सत्याची दाहकता होती.

उत्तरा पटवर्धन या गेली २२ वर्षे कर्णबधिर मुलांना शिकवण्याचे कार्य करीत आहेत. दिव्यांगांमध्ये खरेतर खूप क्षमता असते, पण त्यांना संधी दिली जात नाही. दिव्यांगांना समाजाची दया नको, त्यांना आपला हक्क हवा, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाची सांगता डॉ. ईश्वर नंदपुरे यांच्या 'लोकतंत्र लोकतंत्र है धर्म हमारा। धर्मग्रंथ 'संविधान' या कवितावाचनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन ग्रंथालय संचालक डॉ. अरुंधती वैद्य यांनी केले. कार्यक्रमाला सर्जेराव गलपट, रेवती जोशी, कृष्णदास सरोदे, अनंत मुळे, स्मिता कंगले, किशोर पाटील हे उपस्थित होते.

२३ व २४ डिसेंबर - अभिवादन कुसुमानिल

विदर्भ साहित्य संघाचे ग्रंथसहवास आणि आकाशवाणीचे नागपूर केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अभिवादन कुसुमानिल हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. 'सायंतारा' यात निवडक पत्रांचे अभिवाचन झाले.

'साहित्याची सार्थकता हे मी मूल्य मानतो, कारण सार्थकता ही कालसापेक्षी आहे.' आजचा कार्यक्रम या वर्षीचा श्रेष्ठ कार्यक्रम म्हणून गणल्या जाईल असे उद्‌गार भारतीय प्रसारण सेवा, आकाशवाणी नागपूर केंद्राचे सहायक निदेशक डॉ. हरीश पाराशर यांनी अभिवादन कुसुमानिल या कार्यक्रमांतर्गत काढले.

कार्यक्रमाला उपस्थित असलेले डॉ. वि. स. जोग म्हणाले, आजच्या कार्यक्रमाने अपूर्व अनुभव दिला. या कार्यक्रमाचे सूत्रधार दिलीप म्हैसाळकर, संजय भक्ते यांचे विशेष अभिनंदन करतो. कवी अनिल आणि कुसुमावतीबाई यांचा उल्लेख करावा लागेल. आयुष्यात या दाम्पत्याने अनेक चढउतार बघितले. कुसुमानिल हा त्यांच्या आयुष्याचा केवळ एक भाग होता. या पत्रांतील उभयतांचे दर्शन हृदयस्पर्शी आहे. नव्या कलावंतांना घेऊन कुठलंही औचित्य नसताना सादर करण्यात आली 'अभिवादन कुसुमानिल - २०१७' ही सरत्या वर्षातली अत्यंत सुखद झुळूक म्हटली पाहिजे.

सभारंभाचे आणि मराठी साहित्य महामंडळाचे विद्यमान अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी आपल्या अध्यक्षीय समारोपात म्हणाले, 'मला अनिलांचा नेहमीच अभिमान वाटे. ते महामंडळाचे पहिले कवी-अध्यक्ष, मीदेखील कवी आणि आजचा अध्यक्ष. कुसुमानिल हे मराठी साहित्यातली या दाम्पत्याने दिलेली मूलभूत आणि चिरकाल अशी देणगी आहे.

सुरुवातीला 'कुसुमानिल'मधील निवडक पत्रांचे 'सायंतारा' हे अभिवाचन सादर करण्यात आले. आकाशवाणीच्या उद्‌घोषिका श्रीमती श्रद्धा भारद्वाज यांचे अभिवाचनास मार्गदर्शन लाभले. डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी अभिवाचनाची संहिता बांधली. प्रा. विवेक अलोणी आणि प्रतिमा पंकज या तरुण पिढीच्या प्रतिनिधींनी अभिवाचनाचा नेटका प्रयोग उपस्थित श्रोत्यांपुढे सादर केला. त्याला आभास पेंढारी व सुप्रिया राजगुरू यांनी पाश्वर्संगीताची साथ दिली तर अनिल इंदाणे यांनी दृकश्राव्य माध्यमातून कुसुमानिलांच्या छायाचित्रांना उजाळा दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक समितीचे नितीन सहस्रबुद्धे यांनी, श्रोत्यांशी संवाद साधणारे अभय नवाथे यांनी आपली भूमिका चोख पार पाडली. कार्यक्रमाला कवी अनिलांचे चिरंजीव शिरीष, नातू उन्मेष, नातसून जयंती आणि साहित्य रसिक परिवार उपस्थित होता. उपस्थित पाहुण्यांचे उदय पाटणकर, विलास मानेकर, दिलीप म्हैसाळकर यांनी पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वागत-सत्कार केला.

दुसऱ्या दिवशी निवडक अनिलांच्या कविता सादर करणारी 'माझ्या प्रीतीच्या फुला' ही सुगम संगीत सभा सुचिस्मिता आणि अवनिंद्र शेवलीकर या विशेष पाहुण्यांच्या उपस्थितीत सुरू झाली. कवी अनिलांचे एकेक गीत शर्वरी ठोकळ पडद्यावर दाखवीत होती. कवी अनिलांच्या कवितेचा नृत्यातून रसिकांना अर्थ समजावून सांगण्याचा प्रयत्न नृत्यांगनेने केला. तिला मनमोकळी दाद श्रोत्यांनी दिली. गायनासाठी सुपरिचित असलेल्या डॉ. साधना शिलेदार (शास्त्रीय गायक), मंजिरी वैद्य-अय्यर यांना चाली लावायला दिलेल्या दोन कविता त्यांनी अप्रतिम बांधल्यात. त्यालाही लोकांनी उचलून धरले. गुणवंत घटवई यांच्या खड्या आवाजातील अनिलांच्या कविता आणि अनिलांची अप्रकाशित 'धीर सरे' ही अर्धदशपदी या गायकांनी जाणकारीने रसिकांच्या सेवेत रुजू केल्या. अनिलांच्या कवितेचे अभ्यासपूर्ण रसाळ विवेचन डॉ. विनिता हिंगे यांनी प्रथमच प्रस्तुत केले. तर प्रा. रेखा दंडिगे-घीया यांनी सूत्रसंचालन केले. सुरुवातीला सुचिस्मिता शिवलीकर यांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेला माल्यार्पण झाल्यावर सभेला सुरुवात झाली.

• • •

अनुक्रमणिका


विदर्भ साहित्य संघ

मकर संक्रांत १९२३

आमची प्रकाशने

• **मराठी वर्णोच्चार विकास** : डॉ. द . ह. अग्निहोत्री	१००.०० रु.
• **लोकसाहित्य संपदा** : संपादक : ना. रा. शेंडे	१००.०० रु.
• **आणखी गडकरी** : डॉ. मधुकर आष्टीकर	२५.०० रु.
• **तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७** : डॉ. र. शं. केळकर	६०.०० रु.
• **'प्रातिभ' : प्रातिनिधिक लघुकथासंग्रह (१९८०)** : संकलन : प्रा. ज. रा. फणसाळकर	१००.०० रु.
• **समग्र बजाबा** : संपादन / संकलन - द. भा. प्रधान	१००.०० रु.
• **ज. के. उपाध्ये यांची कविता (१८८३ - १९९३)** : संपादन : डॉ. आशा सावदेकर	१००.०० रु.
• **दक्षिणेतील दोन आचार्य** : तर्कतीर्थ लक्ष्मशास्त्री जोशी	२०.०० रु.
• **कविता विदर्भाची** : संपादन : डॉ. आशा सावदेकर	१२५.०० रु.
• **छंदःशास्त्र : एक अध्ययन** : कुंदर दिवाण	४०.०० रु.
• **वसंतवैभव : (कै. व. कृ. वऱ्हाडपांडे)** : संपादन : डॉ. सौ. कुंदा केळापुरे/डॉ. मदन कुलकर्णी	१५०.०० रु.
• **धन्यतेची थाप** (निवडक प्रस्तावना) : डॉ. वि. भि. कोलते	१००.०० रु.
• **वक्ता दशसहस्रेषु** : (प्रा. राम शेवाळकर यांची भाषणे) - संपादक : डॉ. वि. स. जोग	१५०.०० रु.
• **विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड १** : संपादक : सा. भू. तु. ना. काटकर	२००.०० रु.
• **विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड २** : संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी	२५०.०० रु.
• **विविध प्रवाही साहित्य संमेलनांची अध्यक्षीय भाषणे** : संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी	३००.०० रु.
• **युगवाणी साहित्य सूची** : संपादक : केशव जोशी	१००.०० रु.
• **युगवाणी साहित्य सूची** (पुरवणी) : संपादक : केशव जोशी	७५.०० रु.
• **वैदर्भीय मराठी प्रबंध सूची (१९३९-९८)** : संपादक : डॉ. व. वि. कुलकर्णी	१००.०० रु.
• **कै. वा. ना. देशपांडे यांचे स्फुटलेखन, ३ खंड : तुलाधर, चित्रगुप्त, त्रिविक्रम** : संपादक : प्रा. राम शेवाळकर	१०००.००रु.
• **विदर्भ साहित्य संघ - अमृत महोत्सवी स्मरणिका (१९९९)** : संपादन : वामन तेलंग	२००.०० रु.
• **युगवाणी : ग. त्र्यं. माडखोलकर विशेषांक १९९८** : संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर	१००.०० रु.
• **युगवाणी : कुसुमावती देशपांडे जन्मशताब्दी विशेषांक (२००४-०५)** : संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर	१००.०० रु.
• **युगवाणी : वसंत आबाजी डहाके विशेषांक** : संपादक - प्रा. अजय देशपांडे - २०११-१२	१००.०० रु.
• **युगवाणी : ग्रेस विशेषांक** : संपादक : प्रा. अजय देशपांडे २०१२-१३ (आवृत्ती संपली)	
• **युगवाणी : नामदेव ढसाळ विशेषांक** : संपादक : प्रा. अजय देशपांडे - २०१३-१४	१००.०० रु.
• **निवडक युगवाणी भाग १** : संपादक : वामन तेलंग - २०१४-१५	३५०.०० रु.
• **निवडक युगवाणी : भाग २** : संपादक : वामन तेलंग - २०१५-१६	३५०.०० रु.

विदर्भ साहित्य संघाने आजवर प्रकाशित केलेल्या दुर्मिळ २० ग्रंथांचा संच २००० रुपयांत उपलब्ध (पार्सल खर्च वेगळा). महाविद्यालये, ग्रंथालये आणि अभ्यासकांनी संपर्क करावा.



शशि कपूर

~~~

अरुण हळबे

~~~

मालतीबाई रूईकर

~~~

पं. उल्हास बापट

~~~

वसंतराव डावखरे

~~~

डॉ. सुनील पारसे

~~~

डॉ. श्रीराम गुंदेकर

~~~

तुलसी बेहरे

~~~

मुकुंद गोखले

~~~

दुधनाथ सिंह

~~~

रजनी महाजनी

अनुक्रमणिका



With Best Compliments From...
Pt. Shankarprasaad Agnihotri
Chairman
Shri Sachin S. Agnihotri
Secretary
Jai Mahakali Shikshan Sanstha
AGNIHOTRI GROUP OF INSTITUTIONS, WARDHA
Agnihotri College Campus, Bapuji Wadi, Sindi (Meghe) Wardha 07152 661111, 243575
Running Various Courses in the field of
• Engineering
• Pharmacy
• Polytechnic
• Computer Science
• Management
• Law
• Physical Education
• Colleges of Education
• Public School (CBSE Board)
• Junior College
• State Board Schools
A temple of learning which
open the Doors to New Era of Education...

अनुक्रमणिका